## पुरस्कार

**॥ श्रीराम ॥**

माझे पितृदेव ती.प.पू. श्री. दासराममहाराज केळकर यांच्या अगदी अंतरंगातील एक ज्येष्ठ व श्रेष्ठ साधक प्रा.डॉ. के.वा. आपटे तथा आमचे ती. केशवकाका यांनी आमच्या श्री दादांचे आत्मचरित्र त्यांच्याच वाङमयाचा अभ्यास करून त्यात जे नमूद केलेले आढळले त्याच्या आधारे लिहिले आहे. ती. केशवकाकांचा अभ्यास व साधना फार मोठी आहे. आमचे ती. दादा म्हणजे ती. केशवकाकांचा आत्माच आहेत. त्यामुळे हे नुसते आत्मचरित्र नसून आत्म्याचे आत्मचरित्र आहे. ते चांगले झाले असणार यात संदेह नाही.

अशा या ती. दादांच्या आत्मचरित्राला भगवान श्रीसद्‌गुरु निंबरगीकरमहाराज यांचा आशिर्वाद लाभावा अशी भगवान श्रीसद्‌गुरु तात्यासाहेब महाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू. श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू. श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी शतशः प्रार्थना आहे.

प्रा.डॉ. के. वा. आपटे तथा आमचे ती. केशवकाका यांना अशा या वाङ्‌मयीन सेवेसाठी व भक्तीकरता उदंड असे दीर्घायुरारोग्य लाभावे अशी श्रीमहाराजांच्या चरणी शतशः प्रार्थना आहे.

राजाधिराज सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।

शेष श्रीराम स्मरण !

सांगली<br>
२६/१०/२००९<br>
श्री.तात्यासाहेबमहाराज कोटणीस जयंती

श्रीदादांचा कृपाभिलाषी,<br>
चंद्रशेखर<br>
(चंद्रशेखर रामराय केळकर)

श्री दासराम ग्रंथमाला : पुष्प १४

# श्रीदासराममहाराज :

# आत्मचरित्र

♦ संकलक आणि संपादक ♦

**प्रा. डॉ. के. वा. आपटे**

♦ प्रकाशिका ♦

**सौ. माया के. आपटे**

आवृत्ती पहिली  सांगली  इ.स. २०१०

• **श्रीदासराममहाराज आत्मचरित्र**

• **प्रकाशिका : सौ. माया के. आपटे**
यजुर्वेद अपार्टमेंट,
एस.टी. कॉलनी रोड,
विश्रामबाग- सांगली. ४१६ ४१५

© सर्व हक्क प्रा. नारायण केशव आपटे यांचे स्वाधीन

भ्रमणध्वनी – ०९४२३८२९५९१
nkapte@rediffmail.com
**प्रा. के. वा. आपटे, फोन – ०२३३/ २३०१६९९**

• **प्रथम आवृत्ती :** २०१०

• **प्रसाद मूल्य** : रू ५० फक्त

Also books available on :
vacanamrut@googlepages.com

• **मुद्रक** : अनिल लोखंडे
'श्रीदासराम ऑफसेट', सांगली.
फोन : ०२३३-२३२२७२९



## प्रकाशकीय

सांगलीत नुकतेच होऊन गेलेले श्रीसंतश्रेष्ठ श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरित्र माझे पती प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी लिहिले होते, व ते प्रकाशितही झाले होते. श्रीदासराममहाराजांनी निरनिराळ्या वेळी लिहिलेल्या लिखाणांत स्वत:बद्दल आणि आपले गुरु, संप्रदाय इत्यादीबद्दल लिहिले आहे. ते एकत्र करून ''श्रीदासराममहाराज आत्मचरित्र''या प्रस्तुत ग्रंथाचे संकलन व सटीप संपादन डॉ. आपटे यांनी केले आहे. ते श्रीदासराममहाराजांच्या भक्तगणाला निश्चित आवडेल.

''श्रीदादामहाराज केळकर यांचे आशीर्वाद माझ्या लेखनामागे आहेत, तसेच माझे शिक्षक शंकरराव गोखले आणि प्राध्यापक त्रिं. गो. माईणकर यांचे प्रोत्साहन आहे,'' असे डॉ. आपटे सांगतात, ते मला येथे नमूद करावेसे वाटते.

प्रस्तुत ग्रंथाला श्रीदासराममहाराजांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ चिरंजीव चंद्रशेखर-अण्णामहाराज यांनी पुरस्कारवजा लिखाण दिले, याबद्दल मी त्यांची कृतज्ञ आहे.

कच्ची मुद्रिते तपासणेचे काम माझे चिरंजीव प्रा. नारायण आणि त्यांची पत्नी चि. सौ. पद्मावती यांनी आपुलकीने केले आहे. मी त्यांचे कौतुक करते.

'श्रीदासराम ऑफसेट' या मुद्रणालयाने छपाईचे काम केले आहे. त्यानां धन्यवाद!

सौ. माया के आपटे.

E/Atmcrita maste setting 1 (/2)

E/Atmcrita maste setting 1 (3)



# प्रास्ताविक

माणूस हा समाजात राहणारा आणि अर्थयुक्त शब्दांचा उच्चार करून बोलणारा प्राणी आहे. तो जसा स्वत:खेरीज इतर माणसे, प्राणी, वस्तु इत्यादीबद्दल बोलतो तसाच तो स्वत: विषयीही बोलतो. स्वत:च्या क्रिया, सुख-दुःख, भावना, विचार इत्यादि इतरांना सांगावेत असे त्याला वाटते. त्याचे असले हे स्वत:विषयीचे बोलणे म्हणजे एक प्रकारचे स्वत:चे अल्प असे चरित्र अथवा आत्मचरित्र होय.

काही माणसे रोजनिशी, स्मरणवही इत्यादी लिहितात. काहीजण आपल्या मित्रांना अथवा जवळच्या नातेवाईकांना पत्रे लिहितात. त्यामध्ये त्या त्या व्यक्ति स्वत:विषयी काही लिहित असतील तर तोही एक प्रकारे त्यांचा आत्मचरित्राचा एक लघु भाग होऊ शकतो.

काही माणसे नियमितपणे लेखन करतात. त्यांचे लेखन गद्यात अथवा पद्यात असू शकते. अशा लेखनात जर त्यांनी स्वत:विषयी काही लिहिले असेल तर तोही एका प्रकारे त्यांच्या आत्मचरित्राचा भाग होऊ शकतो.

काही पुरुषांनी तर व्यवस्थितपणे आत्मचरित्रेही लिहिलेली आहेत.

स्वत:विषयी लेखन करण्याच्या संदर्भात काही साधुसंतमंडळीही अपवाद ठरली नाहीत. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, बहिणाबाई, निरंजनरघुनाथ इत्यादि संतांनीहि आपल्या लेखनात सहजगत्या स्वत:विषयी काहीतरी सांगितलेले आढळते. श्रीदासराममहाराजांच्या उर्फ श्रीदादांच्या गद्य तसेच पद्य लेखनातही तसे झालेले दिसून येते. काही काळ श्रीदादांनी रोजनिशी लिहिण्याचा परिपाठ ठेवला होता. तसेच त्यांनी इतरांनाही अनेक पत्रे लिहिली होती. या सर्वांत श्रीदादांनी स्वत:विषयी थोडेफार लिहिले असल्यास त्यात नवल वाटण्याचे कारण नाही.

श्रीदादांच्या महानिर्वाणानंतर मी त्यांचे चरित्र लिहिले. त्यावेळी श्रीदादांच्या लिखाणाचा थोडाफार उपयोग मी केला होता. पण त्यावेळी त्यांची पत्रे उपलब्ध न झाल्याने त्यांचा उपयोग मला करता आला नव्हता. श्रीदादांचे चरित्र लिहिताना जी जमवलेली आणि जमलेली सामग्री होती, ती पाहिल्यावर माझ्या लक्षात आले होते की श्रीदादांनी स्वत:बद्दल बरेच लिहिलेले होते. उदा. स्वत:चे कुळ, कुलदेव, कुलपरंपरा, आजी-आजोबा, माता-पिता, कोटणीस महाराजांचा अनुग्रह, पत्नी, पुत्र, सद्‌गुरू, आपला चिमड संप्रदाय व त्यातील

सत्पुरुष, श्रीदादांच्या संपर्कात आलेले साधू, काही समारंभ इत्यादि विषयांना त्यांच्या लेखनात स्पर्श झाला होता. त्यावरून श्रीदादांच्या चरित्रातील अनेक गोष्टी कळून येत होत्या. त्याच वेळी मला असे वाटून गेले होते की या सर्व उल्लेखांच्या आधारे श्रीदादांचे आत्मचरित्र तयार होऊ शकेल, पण त्यावेळी हे निर्देश एकत्र करण्याचे काम होऊ शकले नाही.

श्रीदादांचे चरित्र लिहून झाल्यावर काही काळाने मला प्रेरणा होऊ लागली की हे सर्व उल्लेख एकत्र करून त्यांची सुसंगत मांडणी केल्यास श्रीदादांचे त्यांच्याच शब्दांतले अल्पसे आत्मचरित्र तयार होईल. या प्रेरणेनुसार मी प्रयत्न केला आणि त्याचे दृश्य फळ म्हणजे म्हणजे येथे प्रस्तुत केलेले श्रीदासराममहाराजांचे म्हणजे श्रीदादांचे आत्मचरित्र होय. (आम्ही श्रीदासराम-महाराजांना श्रीदादा असे म्हणतो.)

श्रीदादांचे लिखाण सुसंगतपणे एकत्र करून मांडताना, त्यांच्या लिखाणातील व्यक्ति, घटना, प्रसंग यांचा संदर्भ आणि कधी स्पष्टीकरण देणे आवश्यक होते. ते मी दिले आहेत आणि ते मी ( ) अशा गोल कंसात ठेवले आहेत. तसेच श्रीदादांच्या प्रत्यक्ष लेखनात अर्थपूर्तीसाठी काही शब्द घालणे आवश्यक वाटले. ते शब्दही मी ( ) अशा गोल कंसात ठेवले आहेत. या कंसामुळे माझे शब्द व श्रीदादांचे लिखाण हे वेगळेपणाने कळून येतात.

श्रीदादांच्या लेखनात मला एक गोष्ट आढळली ती अशी की एकच प्रसंग/घटना इत्यादि श्रीदादांनी आपल्या लेखनात भिन्नभिन्न स्थानी वेगवेगळ्या शब्दांत दिले आहेत. त्यातील काही भाग येथे मी टीपांत दिला आहे. तसेच श्रीदादांच्या लेखनातील काही व्यक्ति, गावे, संदर्भ स्पष्ट करणे आवश्यक वाटले. असे स्पष्टीकरण मी टीपांत दिले आहे.

श्रीदादांचे हे आत्मचरित्र प्रस्तुत करताना श्रीदादांची वचने जेथून घेतली आहेत त्या त्या लेखनाचे संदर्भ लगोलग कंसात दिले आहेत. त्यामुळे चिकित्सक आणि जिज्ञासू वाचकांची सोय होईल.

श्रीदादांच्या आत्मचरित्राचे हे लेखन वैशाख शुद्ध ३, अक्षय्यतृतीया, शके १९३१, सोमवार दि. २७-४-२००९ या दिवशी समाप्तीस गेले. श्रीदादांनी हे लेखन मजकडून करवून घेतले त्यांच्याच पवित्र पदकमली मी ते अर्पण करीत आहे.

**के. वा. आपटे**

# – अनुक्रम –


प्रकाशकीय ............ १
पुरस्कार ............ २
प्रास्ताविक ............ ३

१. कुल, कुलदेव आणि कुलपरंपरा ............ १
२. आजी आणि आजोबा ............ ४
३. माता पिता ............ ९
४. जनन आणि बालपण ............ २०
५. सातारा येथे गमन, विवाह इत्यादि ............ ३१
६. संतांची दर्शने ............ ४१
७. साठीशांती ............ ५०
८. पंचाहत्तरी ............ ५८


**परिशिष्टे**


१. स्वत:च्या काही लेखनाविषयी श्रीदादांचे निवेदन ............ ६४
२. श्रीदादांना कीर्तनाचा आशिर्वाद आणि कुळात आलेली कीर्तन परंपरा ............ ६६
३. गरु गौरव ............ ६९
४. चिमड संप्रदाय, परंपरा, चिमड हे देवस्थान आणि उत्सव .... ७४
५. चिमड संप्रदायातील श्रेष्ठ संतांचा गौरव ............ ७८
६. श्रीदादांची संस्मरणीय वचन ............ ८३

संदर्भ-ग्रंथ-सूची ............ ८४
संक्षेप ............ ८६
आरत्या ............ ८८


E/Atmcrita maste setting 1(4)

E/Atmcrita maste setting 1 (5)

# १. कुल, कुलदेव आणि कुलपरंपरा

(श्रीदादा हे केळकर नावाच्या कुळात अवतरले. केळकर हे कुळ मूलत: कोकणातले. या केळकर कुळाची अनेक घराणी होती. त्यापैकी एक घराणे हे कोकणातील आचरे नावाच्या गावी येऊन स्थायिक झाले. आचरे घराण्यातील गंगाधर नावाचा एक गृहस्थ सांगलीत आला आणि येथेच राहू लागला. या गंगाधराच्या वंशातच श्रीदादांचे जनन झाले. आचरे येथील केळकर घराण्यात सोमेश्वर, रामेश्वर, बांदेश्वरी इत्यादि कुलदेव तसेच कुलदेवता होत्या. त्यातील काहींचे उल्लेख श्रीदादांनी आपल्या लेखनात केलेले आहेत.)

**१) रामेश्वर :-**

आता वंदू कुलस्वामी । श्रीरामेश्वर अतिप्रेमी ।
ज्यांचे योगे अंतर्यामी । प्रगटली भक्ती ।। (सिकसा १.८)

**२) बांदेश्वरी :-**

तैसेची श्रीकुळस्वामीनी । साक्षात्कार-स्वरूपिणी ।
माता बांदेश्वरी मनी । वंदीतसे ।। (सिकसा १.९)

**३) रामेश्वर आणि सोमेश्वर :-**

(श्रीदादांनी कुलदेव रामेश्वराची जी आरती केली आहे तीमध्ये रामेश्वर आणि सोमेश्वर या दोघांचा उल्लेख आहे.)

रामेश्वर सोमेश्वर ब्रह्म स्वये अससी ।
आदि शक्ति तूचि जगरूपे नटसी ।
तूची मायबाप माहेर जीवासी ।
कुळस्वामी तू, आमुचा तारक आम्हासी ।।१।।
जयदेव जयदेव जय रामेश्वरा ।
आरती ओवाळू गौरीशंकरा ।।ध्रु।।
आचरे गावी तुमचा अवतार जहाला ।
राम ईश्वर एक रूपे प्रगटला ।
जड मूढ भक्ता भक्तिमार्ग दावियला ।
गोविंदसुत राम वंदीत चरणाला ।।२।। (चिनि, पृ.२)

# २. आजी आणि आजोबा

(आचरे गावच्या केळकर कुलातील गंगाधर या नावाचा पुरुष सांगली गावी येऊन राहिला. त्यांना अनंत नावाचा मुलगा होता. हे अनंतरावजी श्रीदादांचे आजोबा. श्रीदादा आपल्या आजोबांना नाना म्हणत. श्रीदादा सांगतात:-)

१) ती. नानांचे वडील ती.कै. गंगाधरपंत व मातोश्री सौ.कै. पार्वतीबाई होत (पद्यावली, पृ.१)

(आपले आजोबा आणि आजी यांच्या विषयीची माहिती श्रीदादांनी पद्यावली या ग्रंथाच्या प्रस्तावनेत पुढीलप्रमाणे दिली आहे.)

२) माझे ती.प.पू.कै. आजोबा अनंत गंगाधर ऊर्फ अंताजीपंत केळकर. आमचे आजोबांना आम्ही नाना म्हणतो (पद्यावली, पृ.१). नानांचे शिक्षण फायनलपर्यंत झाले असून, ते सांगलीस एज्युकेशन इन्स्पेक्टर ऑफिसमध्ये हेडक्लार्कचे काम करीत होते. ३० वर्षे सर्व्हिस झाल्यानंतर त्यांनी पेन्शन घेतली. ते मोठे मातृभक्त होते. आपल्या आईला[१] भात आवडतो म्हणून त्यांनी बेळगावजवळ कलखांब येथे भाताची जमीनच खरेदी केली. त्यांनी सांगलीत[२] घर बांधले आणि आपले मातोश्रींचे स्मृतिप्रीत्यर्थ घरी असलेल्या विहिरीचा जीर्णोद्धार केला (पद्यावली, पृ.१)

माझे ती.प.पू. आजोबा श्री. अंताजीपंत केळकर तथा नाना हे श्री.लक्ष्मण दीक्षित यांचे परम भक्त होते (नि.पा.,पृ.८४-८५). आमचे नानांना सांगलीचे श्री. लक्ष्मण दीक्षित या सत्पुरुषाचा अनुग्रह असून, त्यांचेकडून नानांनी पार्थिवपूजा[३] घेतली होती. संध्या, पार्थिव पूजा, रोज बाराहजार[४] शंकराचा जप व सोमवारचा उपवास त्यांनी आमरण केला. पूर्वी ते वैश्वदेवही करीत (पद्यावली, पृ.१)

गुरुघराण्याकरता त्यांनी तन, मन, धन वेचले यात प्रश्नच नाही. त्यांनी आपल्या गुरूंची विष्णुघाटावर[५] समाधि बांधली. त्याची पूजा ते नित्य नेमाने करीत. सद्गुरूंची पुण्यतिथि दीक्षितांचे घरी साजरी करून, पद्यात[६] गुंफलेले श्री लक्ष्मण दीक्षितांचे चरित्र ब्राह्मण भोजनास बसले म्हणजे भावपूर्ण असे उभे राहून म्हणत व नंतर आपण प्रसाद घेत (पद्यावली, पृ.१)

## कुळाचे आणि संप्रदायाचे मूळ

(श्रीदादा हे चिमड संप्रदायाचे अनुयायी होते. चिमड संप्रदाय हा सोमेश्वरापासून सुरू झाला. त्यामुळे श्रीदादांच्या बाबातीत कुलदेव आणि गुरुपरंपरेचा[१] मूळ देव हे एकच झाले. म्हणून श्रीदादा म्हणतात :-)

''श्रीरामेश्वर सोमेश्वर आमची कुलदैवते. सोमेश्वरापासून रेवणसिद्धांचा अवतार. मरुळसिध्द, काडसिद्ध आणि आमचे निंबरगीचे महाराज की ज्यांनी या (चिमड) संप्रदायाची चिमड येथे मुहूर्तमेढ रोवली. पुढे रघुनाथप्रिय साधुमहाराज, चिमडचे रामभाऊमहाराज, तात्यासाहेब महाराजानंतर आमचे श्रीमामा[२] अशी परंपरा आहे. त्यामुळे कुलदैवते व गुरुपरंपरा यांचे एकच मूळ आहे. (सातु, पृ.२९)

## कुळाचा मूळ पुरुष आणि कुलपरंपरागत आचार व धर्म

१) आमचे मूळ पुरुष केशव. भक्तीची परंपरा त्यांच्यापासूनच सुरू झाली (सातु, पृ. २९)

२) आमचे घराण्यात दहा पिढ्या श्रीज्ञानेश्वर माऊलीचा श्रीज्ञानदेवतेहत्तिशी[३] हा ग्रंथ नित्य पाठात आहे (रापा,पृ ११६)

३) आमच्या घरी दहा पिढ्या मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशीस श्रीहनुमान व्रत साजरे होते. हे व्रत तेरा वर्षांचे आहे (नित्यपाठामृत, पृ. १२९). आमचे कुळातील मूळ पुरुष केशव यापासून हे व्रत, श्रीज्ञानदेवतेहत्तिशी या ग्रंथाचे वाचन, आणि सोमवारचा उपवास या गोष्टी परंपरागत आल्या आहेत (निपा, पृ. १३०)

४) सोमवारचा उपवास व नाम स्मरण पूर्वीपासून चालत आलेले आहे (सातु,पृ २९)

(मिरजेच्या वेणाबाईंच्या मठातील मारुतीची मूर्ति श्रीदादांचे पिताजी मामामहाराज केळकर यांचे कारकीर्दीत श्रीदादांच्या घरी आली. आणि मग)

५) तेव्हापासून आमचे घरी ''भीमरूपी स्तोत्र[४]'' हे नित्यपाठात आले (निपा, पृ. १३०)

(मामामहाराज केळकर हे ज्ञानेश्वमहाराजांचे एकनिष्ठ भक्त होते. ते ज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ नित्य म्हणत.)

६) श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ श्रीमामांच्यामुळे आमच्या घरात आला (सातु, पृ. २९)



**टीपा**

१. श्रीदादांची सांप्रदायिक गुरुपरंपरा अशी आहे :- सोमेश्वर-रेवणसिद्ध-मरुळसिद्ध-काडसिद्ध-निंबरगीकरमहाराज-रघुनाथप्रियसाधुमहाराज-चिमडमहाराज-तात्यासाहेब कोटणीसमहाराज-श्रीदादा उर्फ श्रीदासराम.

२. श्रीमामा म्हणजे श्रीदादांचे पिताजी गोविंद अनंत केळकर उर्फ मामामहाराज केळकर.

३. आणखी पहा :- (आमचे घराण्यात) ज्ञानदेवतेहत्तिशी हा ग्रंथ १० पिढ्या वाचनात आहे (साप्ताहिक तुतारी, पृ. २९). श्रीज्ञानदेवतेहत्तिशीवर श्रीदादांनी लिहिलेली सानंद टीका प्रकाशित झालेली आहे.

४. ''भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुति । वनारी अंजनी सुता रामदूता प्रभंजना'' असा प्रारंभ आसणारे समर्थ रामदासस्वामींचे मारुति स्तोत्र.

B B B

E/Atmcrita maste setting 1 (6)

घाट हा विष्णुघाट म्हणून ओळखला जातो.

६. आणखी असे :– ''नानांचे नंतर बरीच वर्षे आमचे वडिल ती.प.पू.कै. श्रीमामा हे दीक्षित यांचे घरी याच श्रद्धेने म्हणत असत'' (पद्यावली पृ.१)

७. आणखी पहा :– ''त्यांनी (=टेंबेस्वामी व दीक्षित स्वामी यांनी) आमचे नानांना प्रसाद म्हणून एकेक रुपया दिला होता. तो प्रसाद आमचे घरी तेव्हापासून जीवापाड जपला असून, त्यांची वार्षिक पूजा आमचे येथे होत असते (पद्यावली,पृ.) श्रीतात्यासाहेबमहाराज व श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे हातचे श्रीनानांना व श्रीमामांना प्रसाद म्हणून मिळालेले रुपये भक्ति–भावाने जपून ठेवले आहेत. त्यांचीच पूजा आमचे घरी प्रतिवर्षी लक्ष्मीपूजनाचे दिवशी होत असते. आजतागायत तो क्रम चालू आहे (निपा, पृ.८५)

८. दादांच्या तीर्थरूपाचे – मामांचे–बापू हे घरगुती नाव होते.

९. आणखी पहा :– माझ्या आजी सौ. लक्ष्मीबाई केळकर या श्रीतात्यासाहेबांच्या कीर्तनास नित्य जात असत (सांमा पृ.१६)

१०. आणखी पहा :– माझ्या आजी सौ. लक्ष्मीबाई केळकर या ब्रह्मचैतन्य महाराजांच्या अनुगृहीत (होत्या) (सांगली माहात्म्य, पृ.१६). त्यामुळे त्यांचे व नानांचे श्री ब्रह्मचैतन्य महाराजांचेकडे वारंवार येणे जाणे सुरू झाले (सा.तु.पृ. २९)

११. आणखी असे :– नानांनी तात्यासाहेबमहाराजांचे वर्णन करणारे ''अज्ञ जन ताराया'' हे पदही केले होते (पद्यावली पृ..३)

१२. आणखी पहा :– केव्हा केव्हा ते (=कोटणीस महाराज) आमचे आजोबा कै. अंताजीपंत केळकर यांना ''मौज दिसती रे'' हे महीपतींचे पद म्हणणेची फर्मास करीत (निपा, पृ.९२)

१३. आणखी पहा :– अंताजीपंतानी साथ दिली । त्रयोदश वर्षे भली ।। (गोदा.८५)

१४. हे स्वामी श्रीमामांचे नित्य कीर्तनास येत असत (पद्यावली पृ.४)

१५. अंताजीपंत नाना ज्यावर्षी गेले त्यावर्षी दोन आषाढी एकादश्या आल्या होत्या.

B B B



अनेक संतांचे दर्शनाचे भाग्य नानांना लाभले होते (पद्यावली, पृ.२) श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथे श्रीटेंबेस्वामी व त्यांचे अधिकारी शिष्य श्री दीक्षित स्वामी आले की त्यांचे दर्शनास (नाना) मोठ्या भक्तिभावाने जात असत (निपा, पृ.८५). श्रीटेंबेस्वामी व त्यांचे अधिकारी शिष्य श्रीदीक्षितस्वामी यांचेही आमचे नानांचे वर फार प्रेम होते (पद्यावली, पृ.२). त्यांनी (=टेंबेस्वामींनी) व श्रीदीक्षित स्वामींनी आमचे श्रीनानांना देवापुढील एकेक रुपया प्रसाद म्हणून दिला होता. हे दोन रुपये आमचे येथे मोठ्या दक्षतेने जतन करुन[७] ठेवले आहेत (निपा, पृ.८५)

(अनंतरावांचे दोन विवाह झाले होते. त्यांच्या पहिल्या पत्नीचे नाव राधा असे होते. या जोडप्याला गोविंद आणि गंगू अशी दोन अपत्ये होती)

माझ्या तीर्थरूपांच्या जनक मातोश्री सौ.कै. राधाबाई (माझी आजी) तीर्थरूपांचे लहानपणीच कैलासवासी (झाल्या होत्या) (पद्यावली, पृ.२). (या आपल्या जनक मातोश्रींची आठवण या स्वरूपात) त्यांची चांदीची वाटी मामांनी जीवापाड जतन केली (पद्यावली, पृ.१)

(अनंतरावांच्या दुसऱ्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई. या सावत्र मातोश्रींना श्रीदादांचे तीर्थरूप मामा हे माई असे म्हणत)

आमचे मामा अत्यवस्थ आजारी असताना, माईंनी ''आपले आयुष्य तू बापूला[८] दे'' अशी ईश्वराची प्रार्थना केली व तसेच घडले (पद्यावली, पृ.१)

भगवान् श्रीसद्गुरु तात्यासाहेब कोटणीसमहाराज[९] यांचे नित्याचे कीर्तनास माझ्या आजी ती.सौ.कै. माई (=लक्ष्मीबाई) या रोज जात असत. त्यांच्या व श्रीतात्यासाहेबमहाराज यांच्या पत्नी ती.प.पू. श्रीसद्गुरु मातोश्री लक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेब यांचा फार घरोबा होता. आमचे घरी एखादा पदार्थ केला तर तो कोटणीसांचेकडे जावयाचा व तेथे काही पदार्थ केला तर तो आमचेकडे यावयाचा (पद्यावली, पृ.२)

माझ्या आजी कै.सौ. लक्ष्मीबाई यांना ब्रह्मचैतन्यमहाराजांचा अनुग्रह (होता) (साप्ताहिक तुतारी, पृ.२९). आमच्या आजी ती.सौ. लक्ष्मीबाई केळकर या श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांच्या अनुगृहीत असल्याने, त्या वारंवार गोंदवल्यास जात.[१०] त्यामुळे श्रीनानांचेही जाणे होत असे (निपा, पृ.८५). श्रीब्रह्मचैतन्य

E/Atmcrita maste setting 1 (7)

गोंदवलेकरमहाराज यांचा अनुग्रह आमचे नानांच्या द्वितीय पत्नी ती.सौ.कै. लक्ष्मीबाई (माझी आजी) यांना असून, त्यांच्यामुळे नाना गोंदवल्यास महाराजांच्याकडे जात. आणि महाराज त्यांना ठेवून घेत, सोडत नसत, कितीही राहिले तरी 'एवढी काय गडबड आहे? रहा,' असेच (महाराज) म्हणत. मग अगदी केव्हातरी नानांनी ''आता गेलेच पाहिजे'' असे म्हटले मग ''या तर'' असे (महाराज) म्हणत (पद्यावली, पृ.२)

श्रीतात्यासाहेबांचेकडून नानांनी मार्गदर्शनही करून घेतले होते (पद्यावली, पृ.३). श्रीतात्यासाहेबमहाराजांचा नानांना[११] अनुग्रह असून (निपा, पृ.८), आमचे नानाही वरचेवर श्रीतात्यासाहेबांचे कीर्तनास जात असत व ते त्यांना ''मौज दिसती रे'' हे पद्य म्हणावयास[१२] सांगत (पद्यावली, पृ.२). श्रीतात्यासाहेबांचे कीर्तन श्रवण केल्याने नानांची कीर्तन भक्तीवर नि:सीम भक्ति होती (पद्यावली, पृ.३).

श्रीतात्यासाहेबांनी देह ठेवल्यावर आमचे ती.प.पू.कै. वडील श्रीमामा यांना नित्य कीर्तन करणेची आज्ञा प्रत्यक्ष प्रगट होऊन दिली व त्याप्रमाणे श्रीमामांनी हे नित्य कीर्तन आपले देहावसानापर्यंत केले. या कीर्तनात नाना झांज घेऊन[१३] साथ करीत. नानांनी याप्रकारे एक तप श्रीमामांचे कीर्तनास साहाय्य केले (पद्यावली, पृ.३).

त्यांनी (=नानांनी) आपला अंतकाल उत्तमच साधला (पद्यावली, पृ.३). नानांना आपला अंतकाळ समजलेला होता. एक वर्ष त्यांनी घरातील संपूर्ण लक्ष काढले होते. आमचे मामेबंधु (आते बंधु) ती.रा. नारायणराव पटवर्धन यांना ''तुझा तू व्यवहार पहा'' असे सांगितले. आमच्या ती. आत्याबाई बोलली ''नाना, असे का म्हणता?'' नाना म्हणाले, ''माझा आता नेम नाही.'' पुढे त्यांना घशाचा कॅन्सर झाला होता. औषध-पाणी व सेवाशुश्रूषा माझे ती. मामा व ती.सौ.मातोश्रींनी फार उत्तमपणे केली, असे नानांचीच उद्‌गार काढले. श्री. बाबूरावजी करमरकर यांचेवर नानांचा फार लोभ होता. त्यांना ''बापूकडे लक्ष ठेवा'' असे नानांनी सांगितले व लिमये मामींनाही ताईकडे लक्ष देण्याबद्दल सांगितले (पद्यावली, पृ.४)

(मृत्यूपूर्वी नानांनी) ब्रह्मणांना हजार पाचशे रुपये तरी दानधर्म केला.



गु. शंकर भटजी आले असता, त्यांना दूध प्यावयास दिले व त्यांतील थोडे वगळणेस सांगून तो शेषप्रसाद आपण ग्रह्य केला. सहस्रबुद्ेस्वामींना [१४]''आता येतो'' म्हणून नमस्कार केला (पद्यावली, पृ.४)

(पुढे) पहिली [१५]आषाढी एकादशी (आली). (मामांचे) कीर्तनात ''शंकरा अंत करावा बरवा'' हे पद नानांनी म्हटले, व रात्री ते निजले. तेथून एकदम त्यांचे जास्तच वेगळे दिसू लागले. डॉ. जोशी आले होते. ''येतो आता'' असे म्हणून (नानांनी) डॉक्टरांना नमस्कार केला (पद्यावली, पृ.४)

श्री. अंतोबा म्हैसकर यांनी (नानांना) विचारले,''नाना, स्मरण आहे ना?'' तेव्हा नानांनी ताडकन ''ॐ नम: शिवाय'' ही अक्षरे उच्चारली. रात्री तीन वाजेपर्यंत हा घोष चालू होता. पुढे त्यांना घोर लागला. तोंड बंद झाले. पण हातातील माळ चालू होती. सकाळी ६ वाजता हातातील माळ गळून पडली (पद्यावली, पृ.४)

दुसरी आषाढी[१५] एकादशी (उजाडली). वार सोमवार (होता). सकाळी ८ वाजता भ्रूमध्यावर दृष्टि स्थिर करून, नानांनी शिवस्मरणात आपला देह ठेवला. त्यांचे आठवणीने अजूनही अंत:करण हेलावून जाते (पद्यावली, पृ.४)

**टीपा**

१. यावरुन गंगाधरपंतांचे निधनानंतर पार्वतीबाई काही काळ होत्या, हे कळून येते.

२. पहा :- ''आमचे नानांनी येवढे घर बांधून ठेवले म्हणून मला कीर्तन करणेची सोय झाली. माझ्या आईचा आशीर्वाद व श्रीतात्यासाहेबांची कृपा अशी मोठी दुहेरी शक्ती यामागे आहे'' असे मामा वारंवार म्हणत असत (पद्यावली, पृ.३). आपले परंपरागत घरातच श्रीमामामहाराज आपले सायंकाळचे नित्याचे कीर्तन करीत असत.

३. आणखी पहा :- ''पार्थिवपूजा त्यांनी श्री. लक्ष्मण दीक्षित यांच्याकडून घेतली. ती त्यांनी अगदी शेवटच्या दिवसापर्यंत चालविली (साप्ताहिक तुतारी, पृ.२९); त्यांनी श्रीलक्ष्मण दीक्षित यांचेकडून पार्थिव पूजा घेतली होती (निपा, पृ.८४-८५); श्री लक्ष्मण दीक्षित । अंताजीपंतांना पार्थिव देत । ती पार्थिव पूजा शेवटपर्यंत । चालविली तयांनी ।। (गोद, ६)''

४. आणखी पहा :- आमचे नाना म्हणजे आजोबा. (ते) दररोज शंकराचा जप १२००० करीत असत (साप्ताहिक तुतारी). (नाना हे दररोज ॐ नम: शिवाय या षडक्षरी मंत्राचा १२००० जप करीत.)

५. सांगलीजवळून कृष्णानदी वहाते. तिला अनेक घाट आहेत. गावभागाजवळ असणारा

E/Atmcrita maste setting 1 (8)

४) शत्रूचेही त्यांनी (= मामांनी) आपल्या आयुष्यात कधीही शत्रुत्व केले नाही (संसना, मनोगत, पृष्ठ बारा)

५) आमचे मामा सिटी हायस्कूल मध्ये शिक्षक होते व ते नीतिशास्त्र शिकवीत होते. त्या शाळेस विद्यार्थी ''आमची पारमार्थिक शाळा'' असे अभिमानाने म्हणत असत (निपा, पृ.७)

६) (मामा शाळेत शिक्षक होते, त्यावेळी)

साडेतीन कोटि रामनामाचे पुरश्चरण चालू असताना, आमचे मामांची बदली तासगावला झाली. परान्न घ्यावयाचे नाही व वेस ओलांडायची नाही असा त्या पुरश्चरणात कटाक्ष होता. आमचे मामा सांगली सिटी हायस्कूलमध्ये त्यावेळी लाइफ मेंबर बोर्डाचे चेअरमन होते. पण त्यांनी आपले नोकरीचा राजीनामा दिला आणि पुरश्चरण पूर्ण केले (रा पा, पृ.४६)

७) (विवाहानंतर मामांचा प्रपंच चालू होता. श्रीदादांचा जन्म झाल्यावर मामांनी ब्रह्मचर्यव्रत स्वीकारले. श्रीदादा सांगतात :-)

माझा जन्म झालियावर । मामांची प्रतिज्ञा भयंकर ।।८२।।
त्यांनी स्वीकारले वानप्रस्थ । आणि नाही वाढविले प्रस्थ ।
आपण राहिले स्वस्थ । काय बोलो ।।८३।। (गोद)

८) (सिटी हायस्कूल मध्ये नोकरी चालू असतानाच तात्यासाहेबकोटणीस[५] महाराजांच्या आदेशाप्रमाणे मामा चिमड क्षेत्री गेले आणि तेथे त्यांनी नारायणमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह घेतला. त्यानंतर )

नित्य नेमाने मामा नऊ नऊ तास साधन करीत. मामा हे (आपल्या) घराचे पडवी समोरील अंगणात रात्र[६] रात्र नेम करीत. उन्हाळा, हिवाळा, पावसाळा काही असो, अंगावर उपरणेही नसे. एका धोतरावर ते पायरीवर बसलेले असत (तुनिपा, पार्श्वभूमि, पृ.३)

(या संदर्भात गोविंद दर्शन ग्रंथात दादा म्हणतातः-)

पडवी समोर दगडावर । वस्त्र न घेता पाठीवर ।
साधना बैसती रात्र रात्र । हे सकळांनी पाहिले ।। (गोद, ७१)

# ३. माता पिता

(श्रीदादांचे आजोबा श्री. अनंत गंगाधर केळकर हे होत. त्यांचे चिंरजीव गोविंद. गोविंद हे बापू, बापूराव, मामा, मामामहाराज या नावांनी ओळखले जात. मामा हे श्रीदादांचे पिताजी. श्रीदादांची माता सौ. इंदिरा. मामांचा प्रारंभी विचार होता की, प्रपंच न करता परमार्थ करावा. मामांनी विवाह करावा असा त्यांच्या माता-पित्यांचा आग्रह होता. या बाबतीत ज्ञानेश्वर महाराजांचा कौल घेण्याचे मामांनी ठरविले. त्यांनी आळंदीस जाऊन अनुष्ठान केले. त्यांना ज्ञानेश्वरमहाराजांचे साक्षात दर्शन झाले. ''प्रपंच करून परमार्थ कर'' अशी ज्ञानेश्वर[१]महाराजांनी आज्ञा केली. त्याचवेळी ज्ञानेश्वर महाराज जसे दिसते तसे त्यांचे रेखाचित्र मामांनी काढले. पुढे मामा सांगलीस आले. कागवाड गावच्या फाटक नामक कुटुंबातील रंगू नावाच्या मुलीशी मामांचा विवाह झाला. सासरी वधूचे नाव इंदिरा असे ठेवण्यात आले. गोविंद व इंदिरा या दांपत्याला प्रथम एक मुलगी झाली. पण ती लहानपणीच देवाघरी गेली. त्यानंतर औरवाड गावचे अवलिया वजीरबाबा यांचा आशिर्वादानुसार, गोविंद इंदिरा या जोडप्याला एक पुत्र झाला. या मुलाला वयाचे चौदावे दिवशीच तात्यासाहेब कोटणीस महाराजांचा अनुग्रह लाभला व त्यांच्याच सांगण्यानुसार मुलाचे नाव राम असे ठेवण्यात आले. हे राम म्हणजेच आमचे श्रीदादा अथवा श्रीदादामहाराज. श्री दादांनी आपल्या माता-पित्याबद्दल पुढीलप्रमाणे लिहून ठेवले आहे.)

१) मम माता इंदिराबाई । (रादाबो १३.१३). माझी ती.सौ. आई इंदिराबाई केळकर श्रीतात्यासाहेबांच्या कीर्तनास नेमाने जात असे (सांमा. पृ.१६).

(इंदिराबाईंना हणमंत पांडुरंग उर्फ तात्यासाहेब कोटणीस महाराजांचा अनुग्रह होता)

माता इंदिरा भाग्यवंत । तिजला अनुग्रह प्राप्त । हनुमत्प्रभूचा ।।
(गोदा.४)

श्री मामांनी माझे ती.कै.सौ. आईस हे बारा[२]अभंग म्हणणेस सांगितले होते. ते ती बारा अभंग रोज तेरा वेळा म्हणत असे (तुनिपा, कन्नूर, पृ.६६). माझ्या प.पू. मातोश्री सौ. इंदिरादेवी यांना मामांनी ''हे बारा अभंग म्हणत जा. तुझे कल्याण होईल.''म्हणून सांगितले.त्या बारा अभंग सारखेच म्हणत होत्या. शिवाय साधनही करत होत्या व ''माझे हातून साधन होत नाही'' असे मोठ्या विनयाने म्हणत होत्या (तुनिपा, पार्श्वभूमी, पृ.४). माझे सौ. आईंनी हे (बारा) अभंग आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत म्हटले होते (तुनिपा, कन्नूर, पृ. ६६)

E/Atmcrita maste setting 1 (9)

(इंदिराबाईनी हे बारा अभंग अनेक वर्षे नेमाने म्हटले. त्या पठणामुळे त्यांना पुढीलप्रमाणे दृष्टांत झाला)

श्रीतुकाराम महाराज सदेह वैकुंठास विमानात[३] बसून चालले आहेत. ते जिजामाऊली वर तोंड करून पहात आहेत. त्यांना मोठे आश्चर्य वाटते आहे. आणि तुळसी मंजिरींचा मोठा सुगंध दरवळला आहे, असा अनुभव, हे अभंग नेमाचे वेळी म्हणत असताना आमचे सौ. आईस आला आणि आश्चर्य म्हणजे श्रीरामनिकेतन[४] मध्ये हा सुगंध नेमाचे वेळी बसलेल्या साधकांनाही आला होता (तुनिपा, कन्नूर, पृ.६)

शेवटी शेवटी हे अभंग म्हणताना माझे आईला धाप लागली, ''अग आई, आता राहू देत अभंग, पुष्कळ वेळा म्हणून झाले'' असे (मी) म्हटले की, ''रामजी तू म्हण. मग मी थांबते'' असे (ती) म्हणायची (तुनिपा, पार्श्वभूमि, पृ.४)

(इंदिराबाईनी बारा अभंग म्हणतच देह ठेवला. त्यांचे अंत्ययात्रेचे वेळीही इतर लोक बारा अभंगच म्हणत हाते, असे श्रीदादा सांगतात :-)

शेवटी तिची अंत्ययात्राही बारा अभंग म्हणतच निघाली ( तुनिपा, पार्श्वभूमि, पृ.४). सौ. आईचे निर्वाणानंतरही लगेच सर्वांनी हे बारा अभंग म्हणूनच तिची अंत्ययात्रा निघाली. (तुनिपा, कन्नूर, पृ.६६)

(गोविंद हे अनंतरावांचे चिरंजीव. ते श्रीदादांचे पिताजी होत. आपल्या पिताजींच्या-गोविंदाच्या - जन्माबाबत श्रीदादांचा अभंग असा आहे :-)

श्री रामेश्वरासी साष्टांग नमन । द्या आशीर्वचन भक्तालागी ।।१।।
करीन वर्णन गोविंदचरित्र । अत्यंत पवित्र साधकासी ।।२।।
ऐका हो सज्जन अठराशे दहात । फाल्गुन शुद्धात दशमीस ।।३।।
पर्वकाळ आला जन्मोत्सव झाला । गोविंद या आला भूमीवरी ।।४।।
अंताजीपंतांना गगन ठेंगणे । राधा म्हणे लेणे जीवीचे हे ।।५।।
श्रीराम जयराम जय जय राम । गोविंद विश्राम दासालागी ।।६।।
(वही १२६)

(गोविंद उर्फ मामामहाराज केळकरांचे गोविंददर्शन नावाचे चरित्र श्रीदादांनी



लिहिले आहे. तसेच मामांचे गुणवर्णन करणारे त्यांचे सुमारे ८० अभंग आहेत, तसेच एक आरती व त्यांचे निर्वाणाचा अभंग आहे. आपल्या पिताजीबद्दल श्रीदादा लिहितात :-)

१) गोविंद अनंत केळकर । ऐसे मम पितयाचे नाम साचार । त्यांचे बालक मी राम गोविंद केळकर ।। (रादाबो, १३.१४); बापूराव केळकर । धन्य पिताजी मम थोर ।। (दागा ८८९.१); धन्य धन्य माझे पिताजी गोविंद ।। (दागा ८०१.१, ८०२.१); रामभक्त हनुमंत । (दागा १५४०.१) त्यांचे शिष्य ते गोविंद (दागा १५५४.९), तयापोटी जन्म माझा ।। (दागा १५५४.३)

२) (ज्ञानेश्वर महाराजांचे मामा हे भक्त होते.त्यांना आळंदी क्षेत्री ज्ञानेश्वरांचे साक्षात् दर्शन झाले.)

श्री ज्ञानेश भक्त गोविंद (चां .पा., ६५.१८). (आळंदी येथे) श्रीज्ञानेश्वरी पारायणी । पितृदेव गोविंदरायालागुनी । ज्ञानेश्वर दिसले नयनी (चांपा, ६५.१६). प.पू. मामांना आळंदी क्षेत्री श्रीज्ञानेश्वर महाराजांचे साक्षात् दर्शन झाले. त्याचे त्यांनी चित्रांकन केले (ज्ञास्तो, आशिर्वाद, पृ.३)

(नमनस्तोत्र या ग्रंथावरील टीकेत, ज्ञानेश्वरमहाराजांना उद्देशून असणाऱ्या ओव्यांमध्ये, श्रीदादांनी वरील प्रसंग असा वर्णिला आहे :-)

तुवा मज तीर्थरूपा देऊनी दर्शन । तया दिले आशिर्वचन ।
प्रपंच परमार्थ पूर्ण । गुरुकृपे होतील ।।४।।
आपुले नाम नित्य वदनी । डोळ्याचे ना खळे पाणी ।
ऐसे मामा समरस जीवनी । आपुलिया ।।६।।
जयाचे गोविंद हे नाव । लोक म्हणती बापूराव ।
केळकर उपनाव । शोभविले ।। ८।।
आपुले दर्शन जे झाले । ते छायाचित्रचि ज्यांनी रेखाटले ।
स्वगृही[४] स्थापिले । सांगली ग्रामी ।।९।।
(नस्तो, भावार्थ नमन हृदय, पृ.१)

३) (मामांचे काळी म. गांधींचे बरेच प्रस्थ होते.)

महात्मा गांधींचेवर श्रीमामांची अतीव निष्ठा होती

(संसना, मनोगत, पृष्ठ बारा)

E/Atmcrita maste setting 1 (10)

(श्रीमामांचे कीर्तन इतके रंगावयाचे की – )

बुधगावचे विदेही साधु गुंडुबुवा.... आमचे श्रीरामनिकेतनमध्ये माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांचे कीर्तनात नाचावयाचे व ''परमार्थात गोंदा' पुरा आहे ''असे म्हणावयाचे (सांमा, पृ.२५-२६)

१३) (आपल्या दैनिक कीर्तनात मामा नामाचे महत्व सांगत. एकदा -)

साहित्यसम्राट् न. चिं. केळकर यांनी श्रीमामांना विचारले, ''तुम्ही रोज कीर्तनात काय विषय घेता ?'' मामा म्हणाले, ''नाम हा विषय असतो.'' पुनः न. चिं. केळकर म्हणाले, ''रोज नामावर बोलता ?'' मामा म्हणाले, ''हा विषय या जन्मात संपेल असे वाटत नाही'' (निपा, पृ.१६)

(आणखी एकदा असे घडले :-)

श्रीनारायण महाराज यरगट्टीकर यांनी एकदा चिमड येथे आपले कीर्तनात साधक मंडळींना प्रश्न केला, ''पुण्य म्हणजे काय बोला.'' कोणाला सांगता आले नाही. मग ''बापूराव, तुम्ही रोज कीर्तन करता. तुम्ही सांगा'' असे आमचे श्रीमामांचेकडे बोट करून म्हणाले. मामांनी हात जोडून सांगितले, ''नाम हे पुण्य आणि अनाम हे पाप.'' यावर सारेच निरुत्तर झाले
(रापा, पृ. १७).

आमचे मामांना जर कोणी गीतेत काय सांगितले आहे असे विचारले असते तर त्यांनी ''नाम'' म्हणूनच सांगितले असते (निपा. पृ.१२९).

श्रीमामांचे नित्य कीर्तनातून सर्व धर्म आणि संप्रदाय यांचेबद्दल आदर प्रगट होत असे (संसना, मनोगत, पृ.बारा)

(मामांची नित्य कीर्तननिष्ठा पाहिल्यावर असे म्हणता येते की – )

माझे पितृदेव हे कीर्तनावतारच होते व त्यांच्या रूपाने कीर्तनच अवतीर्ण झाले (निपा, पृ.६)

१४) (वयोमानानुसार आणि शारीरिक व्याधींनी मामा आजारी होते. त्या संदर्भात श्रीदादा म्हणतात :-)

श्रीमामा हे १९६० साली दिवाळीपासून अगदी अंथरूणावरच निजून होते. (तरी) श्रीमामांनी शेवटच्या क्षणापर्यंत नामसाधन आणि कीर्तन यांत



९) माझे प.पू. पितृदेव श्रीमामा केळकर यांना श्रीतात्यासाहेबांनी नित्यनेमाने पंचपदीप्रमाणे हे (तुकाराममहाराजांचे नित्यपाठाचे) बारा अभंग रोज म्हणणेची आज्ञा १९२० साली केली होती. त्याप्रमाणे ते नित्यनेमाने त्रिकाल नेमाबरोबर बारा अभंगही म्हणत असत (तुनिपा, पार्श्वभूमी, पृ.३)

सांगलीचे श्रीसद्गुरु तात्यासाहेब महाराज कोटणीस यांचे आज्ञेप्रमाणे माझे परमपूज्य पितृदेव श्रीमामा केळकर यांनी प्रत्यही त्रिकाल नेमांचे वेळी हे बारा अभंग न चुकता कटाक्षाने म्हटले आहेत (तुनिपा, कन्नूर, पृ.८०). माझे पितृदेव श्रीमामा केळकर हे रोज साधनाबरोबर आणि कीर्तन, नित्याचे पंचपदीप्रमाणे हे बारा अभंग त्रिकाल साधनाचे वेळी पठण करीत असत (तुनिपा, कन्नूर, पृ.६५)

परमार्थातील कोणी काही विचारावयास आले किंवा प्रापंचिक अडचण कोणी विचारली तर आमचे मामा बारा अभंग म्हणावयास सांगत आणि तसे केल्याने त्यांना प्रचीति येत असे. किंवा संकट निवारणही होत असे (तुनिपा, कन्नूर, पृ. ९०-९१)

१०) माझे ती.प.पू. वडिल कै. श्रीगोविंद अनंत उर्फ श्रीबाबूरावजी केळकर यांची श्रीज्ञानेश्वर माऊलीवर अपार निष्ठा होती. श्रीज्ञानेश्वरी व श्रीअमृतानुभवाची त्यांनी १०८ पारायणे केली होती. श्रीज्ञानेश्वर महाराज यांचा हरिपाठ प्रतिवर्षी त्यांचे नित्याचे कीर्तनात ते (निरूपणास) घेत असत. श्रीज्ञानेश्वर माऊलीचे भजनात ते देहभानही विसरून जात. माऊलींनी केलेले हे नमनस्तोत्र ते माऊलीचे पुण्यतिथीस प्रतिवर्षी वाचीत (नस्तो, श्रीमाऊलीची कृपा, पृ.५)

११) (इ.स. १९२३ साली श्रीमामांनी कोटणीसमहाराजांना आपल्या घरी भोजनास बोलाविले होते. त्यावेळी काय घडले हे श्रीदादा असे सांगतात :-)

शके अठराशे पंचेचाळीस । माघ वद्य तृतीयेस ।
पाहोनी शुभ रविवारास । पर्वणी घडली ॥
गोविंद पितयाचे मनीचे जाणोन । हनुमंतजी आले धावून ।
नानबा पुंडलीक शामराव घेऊनि । बरोबरी ।

E/Atmcrita maste setting 1 (11)

परमानंद उसळला । भोजनाचा थाट केला ।
तो घडला सोहळा । अनुपम ।।
हात जोडोनी अंताजीपंत । गहिवरोन अकस्मात ।
म्हणती प्रसन्नचित्त । श्लोक ऐका ।। (गोद, ३४-३७)

‘‘जनी रामसेवा मनी रामसेवा । तया रामनामी जयाला विसावा ।
हनूमंत हे नाम साजे जयाला । नमस्कार साष्टांग माझा तयाला ।।’’

मागुनी जोडोनिया कर । होवोनिया विनम्र ।
गोविंदजी म्हणती सादर । सुश्लोक हा ।। (गोद, ३८)

‘‘सदा सर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणी देह माझा पडावा ।
उपेक्षू नको गुणवंता अनंता । रघूनायका मागणे हेचि आता ।।’’

प्रसन्न होवोनी सद्गुरुवर । श्लोकेचि दिले उत्तर ।
तो श्लोक हृदयांतर । व्यापिलासे गोविंदी ।। (गोद, ४०)

‘‘बुडो ही धरा की लया विश्व जावो ।
पडो काळ हस्ते शिरी वज्र धावो ।
विसंबू नको सर्वथा नाममाळा ।
मुखी रामचंद्र स्मरा वेळोवेळा.’’

१२) (श्रीमामांचे मुख्य कार्य म्हणजे त्यांचे दैनिक हरिकीर्तन. ते तात्यासाहेबकोटाणीस महाराजांच्या आज्ञेने घडले. ते कसे घडले हे श्रीदादा असे सांगतात :-)

आमचे मामा प्रतिवर्षी माघ वद्य प्रतिपदेपासून माघ वद्य दशमीपर्यंत श्रीदासबोध ग्रंथाचे पारायण रात्री ९वाजता बसून करीत (निपा, पृ.१६८)

(तसे ते चालू असताना)

शके अठराशे पंचेचाळीस । माघ वद्य तृतीया पर्वास ।
शुक्रवारी मध्यरात्रीस । हनुमत् सद्गुरु प्रगटले ।।
गोविंदजी दासबोध । वाचीत होते सानंद ।
तो घडले अगाध । गुरुकृपे ।।
नित्यकीर्तनाची आज्ञा दिधली । कृपाहस्त ठेवोनी भाळी ।



ते तंतोतंत पाळिली । गोविंदजींनी ।।
स्वरूपाकार होईपर्यंत । कीर्तन चालले अविरत ।
त्रिकाळ साधनासहित । नित्यनेमे ।। (गोद, ६१-६४)

(तात्यासाहेबांच्या आज्ञेचा हा प्रसंग श्रीदादांच्या दृष्टीने अति महत्वाचा होता. म्हणून त्याचा उल्लेख श्रीदादांनी वारंवार पुढीलप्रमाणे केला आहे.)

(अ) हनुमंत सद्गुरुराय । भक्तावरी वोळली माय । आज्ञा झाली पाहे । नित्य कीर्तन करण्याची ।। तैसे नित्य करिती कीर्तन । त्यात न पावती कधी शीण ।। (दा.गा. ६८४.७-८)

(आ) ती.प.पू. मामांनी श्री सद्गुरु[७] श्रीहणमंतरावजी कोटणीसमहाराज यांचे आज्ञेने, आपले घरी, गुरुसेवा म्हणून, एकही दिवस खंड न होता, आपले निर्वाणापर्यंत अडतीस वर्षे हरिकीर्तन केले (श्रीरामपाठ, प्रकाशकाचे चार शब्द, दुसरी आवृत्ती, मुंबई, पृ.७)

(इ) श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचे आज्ञेने माझे वडील ती.प.पू. श्रीगोविंद अनंत उर्फ श्रीबापूरावजी केळकर (श्रीमामा) हे आपले घरी रोज कीर्तन करीत (सिस्तु, मनोगत, पृ.१)

(ई) श्रीहनुमंतसद्गुरु आज्ञेकरून । सांगली स्वगृही नित्य कीर्तन । शके १८४५ पासून । अखंडित पितयांनी चालविले (चांपा एनाक, पृ.६२)

(कोटणीस महाराजांच्या आज्ञेने मामांनी नित्य कीर्तन सुरू केले. तथापि)

पिताजी प्रसिद्धिपराङ्मुख (गोद, ९)

(असल्याने, त्यांनी कोटणीस महाराजांच्या कीर्तन करण्याच्या आज्ञेची वाच्यता केली नव्हती. श्रीदादांनासुद्धा ही गोष्ट १९३७ साली हणमंतरावजी कोटणीसांचे चरित्र वाचल्यावर कळली)

(नित्य कीर्तन पार पाडण्याची मामांची निष्ठा इतकी जबरदस्त होती की)

ब्रह्मदेव आला येथ । म्हणे जाऊ सत्य लोकात ।
त्यांना मामा सांगत । होऊ दे कीर्तन ऐसी ही कीर्तन निष्ठा ।।
(गोद, ९६-९७)

E/Atmcrita maste setting 1 (12)

## ४. जनन आणि बालपण

(सौ. इंदिरा या मातोश्री आणि गोविंद हे पिता फार पुण्याईने आणि भाग्यामुळे आपल्याला लाभले आणि त्यांच्यामुळेच तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे सद्गुरु मिळाले अशी श्रीदादांची मनोभूमिका होती. ती त्यांच्या भिन्न भिन्न लिखाणांत पुढीलप्रमाणे व्यक्त झाली आहे.)

(१)

१) हरिदासांचिये घरी । मज उपजवा जन्मांतरी ।। बोलती निर्धारी । संतराज
तुकोबा ।। काय भाग्य मज जोडले । तेचि सत्य आज झाले ।।
(दागा ६८४.१-२)

२) इंदिरा गोविंद[1] मला पिता लाभले ।
दासरामी लाभले पूर्व पुण्ये ।। (दागा ५६९.५)

३) इंदिरा गोविंद दोघे भले । माता पिता मज लाभले ।। (गोद,८८)
ऐसे हे गुरुभक्त पिता । तैसीच प्रेमळ इंदिरा माता ।
लाभले म्हणोनी हनुमंता । भेटी माते ।। (चांपाएनाक, पृ. ६३)

४) काय भाग्य मज जोडले । भक्तराज भले ।
पितृदेव लाभले ।। (दागा ६८४.२)
माझा योगचि अपूर्व । म्हणोनि तुम्ही[2] पितृदेव ।
येता घेवोनी आलो ठेव । अध्यात्माची ।। (गोद,२)
गोविंदजी ऐसे पिता । म्हणोनी श्रीहनुमत् कृपाकर माथा ।
ते सामर्थ्याची सर्वथा । आगळे असे ।। (ज्ञामुप्र, हृद्गत, पृ.१२)

(२)

(सौ. इंदिरा आणि गोविंद यांना प्रथम एक मुलगी झाली होती. ती अकाली गेली. साहजिकच इंदिरामातेला दुःख झाले. तिच्यासाठी तिचे मामा हे वजीरबाबा या साधूकडे गेले. वजीरबाबांनी एक खारीक प्रसाद म्हणून इंदिरेसाठी दिली आणि विष्णुभक्त असा पुत्र होईल असा आशीर्वाद दिला. त्यानंतर कुरूंदवाड गांवी श्रीदादांचा जन्म झाला. त्यावेळी कोटणीसमहाराज कुरूंदवाडला कीर्तनासाठी आले होते. श्रीदादांच्या आजोबांनी महाराजांना इंदिरेच्या घरी बोलाविले. त्यावेळी श्रीदादांना कोटणीसमहाराजांचा दृष्टिद्वारा अनुग्रह झाला. हा सर्व भाग श्रीदादांच्या लेखनात पुढीलप्रमाणे प्रगट झाला आहे).



खंड पडू दिला नाही (निपा, पृ.१६३)

सोमवार, माघ शुद्ध नवमी, शके १८८३, तारीख १२-२-१९६२ रोजी रात्री ११ वाजून ५० मिनिटांनी आमचे मामा ब्रह्मस्वरूपी विलीन झाले. त्याचे आदले दिवशी, सकाळी ६ वाजता, (मामांच्या) नाड्या सुटलेल्या होत्या. अशास्थितीत, संध्याकाळी ५ वाजता, त्यांचे नित्याचे कीर्तनाची वेळ झाली मात्र, त्यांनी आपले डोके वर उचलले, आणि माझेकडे पाहून व त्यावेळी (उपस्थित) असलेल्या शेकडो लोकांचेकडे दृष्टि फिरवून, ''श्रीराम जय राम जय जय राम म्हणा'' असा शेवटचा संदेश दिला. असाध्य अशा पाच सात दुखण्यांनी जर्जर केले असता, त्यांनी शेवटपर्यंत कीर्तन केले. (रामपाठ, दुसरी आवृत्ति, प्रकाशकाचे चार शब्द, पृ. ७).

(तात्यासाहेब कोटणीस महाराजांचे निर्वाणानंतर त्यांचे दहनभूमीवरच गंगाधरराव सिंग यांनी कोटणीसमहाराजांची समाधी बांधली होती. या समाधीच्या कृष्णा नदीकडील पश्चिम बाजूला बरीच मोकळी जागा होती.)

श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज व त्यांची भक्त मंडळी यांचे संकेताप्रमाणे या समाधी मंदिराचे मागे, श्रीतात्यासाहेबांच्या अधिकारी ज्येष्ठ कन्या श्रीकल्लव्वाक्का यांचे हातून, जमिनीत खोल खड्डा खणून, श्रीतात्यासाहेबांच्या अस्थि व रक्षा सुरक्षित ठेवून, त्यात माणिक, पाचू, पोळे, हिरा, सोने व निरनिराळ्या (तीर्थ) क्षेत्रातील माती, गंगा व काही तीर्थे घालून, त्यावर बंदिस्त भाग करून, वरील बाजूस औदुंबर वृक्ष लावला (सां. मा. पृ.२२). माझे पितृदेव श्रीमामा केळकर इ.स. १९६२ साली स्वरूपाकार झाले. त्यांचा अस्थिकलश श्रीगंगाधर सिंग यांनी खोल खणून या औदुंबराखाली ठेवला (सांमा, पृ. २२-२३).

(म्हणून गोविंद दर्शन या ग्रंथात श्रीदादा म्हणतात :-)

हनुमत् समाधि मंदिर । कृष्णाकाठी सुंदर ।
तयामागे औदुंबर । वृक्ष असे ।।
तेथ श्रीमामांच्या अस्थि । अंतरी धरोनी भक्ती ।
गंगाधरराव प्रतिष्ठिती । औदुंबरापारी ।। (गोद, १०१-१०२).

E/Atmcrita maste setting 1 /(13)

(श्रीमामांचे निर्वाणाचा श्रीदादांना स्फुरलेला अभंग असा :-)

शालिवाहन शके अठराशे त्र्याऐंशीत । प्लव संवत्सरात उत्तरायण ।।१।।
माघ शुद्ध नवमी आणि सोमवार । रात्रौ द्वितीय प्रहर तिसरे तासी ।।२।।
गोविंदरायांनी केलेसे निर्वाण । अखंड कीर्तन सत्य केले ।।३।।
एकांती लोकांती देहांतीही नाम । प्रचीती उत्तम स्वये दिली ।।४।।
श्रीराम जयराम जय जय राम । संदेश परम निर्वाणीचा ।।५।।
हनुमंतरूपी मिळोनिया गेले । कीर्तिरूपे उरले दासरामी ।।६।।

(अशाप्रकारे मामांच्या संपूर्ण चरित्राकडे पाहिले तर असे दिसते :-)

श्रीमामांचे सारे जीवनच श्रीज्ञानेश्वर महाराजांचे कृपेने, श्रीब्रह्मचैतन्य[९] महाराज व श्रीभाऊसाहेब महाराज[१०] यांचे आशीर्वादाने, श्रीनारायण [११]महाराज यांचे अनुग्रहाने व भगवान् श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे कीर्तनानुग्रहाने साममय झाले होते. (निपा, पृ. १६२)

(असे होते श्रीदादांचे पिताजी. श्रीदादा त्यांचेकडे केवळ वडिल म्हणून पहात नसत. श्रीदादांना मामा हे प्रत्यक्ष ''गोविंद'' परमात्मा या स्वरूपातच दिसत. म्हणून श्रीदादा म्हणतात :-)

रामकृष्ण हरी गोविंद । तेचि मूर्तिमंत गोविंद ।
हाची मनी माझा आनंद । जन्मापासूनी ।। (गोद, १)

(श्रीमामांचे निर्याण झाल्यावर लगोलग श्री. नरहरि दा. दिवेकर यांनी गोविंदचरितमानस या शीर्षकाखाली मामांचे चरित्र लिहिले. ते पूर्ण झाल्यावर श्रीदादांच्या स्वप्नात मामा आले. श्रीदादा म्हणतात :-)

एकदा माझिये स्वप्नी मामा आले ।
बहुपरी झाले बोलणे त्यांचे ।।१।।
अण्णांनी[१२] चरित्र लिहिलेले कथिले ।
तव ते म्हणाले ऐकिले की ।।२।।
''नरहरीचे[१२] तसे आहेच'' म्हणोनी ।
रंगले कीर्तनी हनुमंत सेवे ।।३।।
बालरामा नाही वाटले ते स्वप्न ।
मागुते कळोन आले त्यासी ।।४।। (गोचमा, पृ. १४७)



## टीपा

१. पहा :- श्रीज्ञानेश्वर माऊलींची कृपा हेच श्रीमामांचे प्रपंचाचे आणि परमार्थाचे मूळ असून, परमार्थाला प्रपंच हा पूरक कसा होतो आणि प्रपंच परमार्थरूप कसा करता येतो, हे श्री मामांनी आपल्या कृतिपाठानेच...... स्पष्ट करून दाखविले आहे (निपा, पृ. १०३)
२. हे बारा अभंग म्हणजे तुकाराम महाराजांचे नित्यपाठाचे म्हणून प्रसिद्ध असलेले, ''जन्माचे मूळ'' इत्यादि बारा अभंग होत.
३. आणखी पहा :- आईला तुकोबाराय विमानातून चाललेले दिसले. जिजाबाई व रामेश्वर भट्ट ओणवे होऊन आश्चर्याने वर पहात आहेत व तुळसीमंजिऱ्यांचा वास सुटला आहे, असे तिने अनुभवले. घरच्या आम्हा सर्वांना मंजिऱ्यांचा सुगंध जाणवला हे विशेष (तुनिपा, पार्श्वभूमि,पृ.४).
४. श्रीरामनिकेतन हे श्रीदादांच्या रहात्या घराचे नाव आहे.
५. हनुमंत पांडुरंग कोटणीस उर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस.
६. साधन साधती । रात्रंदिवस ।। (गोद, ७०); करिती स्मरण साधन । देहभान विसरोनी ।। (दा.गा. ६८७.८)
७. पहा :- तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचे पट्टशिष्य की ज्यांचेवर खडतर साधनाने सद्गुरुंची पूर्ण कृपा झाली असून, महाराजांचे आज्ञेप्रमाणे, ज्यांनी आज पंधरा वर्षे नित्य कीर्तनभक्ती, वाटेल तितके अडथळे आले तरी, फार काय नोकरीचीही पर्वा न करता, चालविली आहे, अशा माझे परमपूज्य वडिलांनी म्हणजे तीर्थरूप गोविंद अनंत उर्फ बापूरावजी केळकर यांनी प्रत्यक्ष श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे प्रेरणेनेच हा रामपाठ लिहिला (रामपाठ, दुसरी आवृत्ती, पहिल्या आवृत्तीतील प्रकाशकाचे चार शब्द, पृ. ५)
८) गोंदा म्हणजे गोविंद अनंत उर्फ मामामहाराज केळकर.
९) ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराज यांची व मामांची पूर्वी बुधगाव स्टेशनवर भेट झाली होती. त्यावेळी त्यांनी मामांना आशीर्वाद दिला होता.
१०) भाऊसाहेब उमदीकर व श्रीमामा यांची पूर्वी तेरदाळ या गावी गाठ पडली होती. त्यावेळी भाऊसाहेब महाराजांनी मामांना आशीर्वाद दिला होता.
११) नारायण महाराज यरगट्टीकर यांचेकडून मामांनी उपदेशानुग्रह घेतला होता.
१२) म्हणजेच नरहरि दा. दिवेकर.

B B B

E/Atmcrita maste setting 1 (14)

कीर्तनात श्रीदादा साथही करीत.)

मामांचे नित्य कीर्तन । बालपणापासून ।
साथ करीतसे धणी । बालराम ।। (गोद, ८०);
राम करी कीर्तन । आणि साथही करी प्रेमे भरून ।। (गोद, ८७)

(श्रीदादांचे पिताजी मामा हे चिमड संप्रदायातले. श्रीदादांचे गुरु कोटणीसमहाराज हे चिमड संप्रदायातले. चिमड संप्रदायाला श्रीदादा स्वरूप संप्रदाय म्हणत. (तात्यासाहेब महाराज कोटणीस, दासराम, पुणे प्रथमावृत्ती, १९८३, पृ.२७). या स्वरूप संप्रदायाची परंपरा श्रीदादांना लाभली. म्हणून ते म्हणतात :-)

अशा परंपरेतच सहजगत्या माझा जन्म झाल्याने, ही परंपरा सहजच मला लाभली आहे, हे माझे फार मोठे भाग्य आहे. या सर्व परंपरेची कृपा मजवर आहेच. तशीच ती अखंड राहो ही प्रार्थना (दीपलक्ष्मी मासिक, श्रीमामामहाराज केळकर विशेषांक, १९७१, पृ. २८, ६५)

(४)

(श्रीदादा पाचवे वर्षीपासूनच कीर्तन करत. श्रीदादा आठनऊ वर्षाचे असताना, त्यांचे कीर्तन श्रीरामानंदमहाराज खटावकर यांनी ऐकले. त्यांना ते फार आवडले. ते स्वतः तर श्रीदादांचे कीर्तन आवर्जून ऐकत इतकेच नव्हे तर ते इतरांनाही श्रीदादांचे कीर्तन ऐकण्यास सांगत :-)

कीर्तन ऐकोनी रामानंद तोषिले ।। (दागा ६६७.५); बाल भगवताचे ऐकावे कीर्तन । रामानंद बोलून गेले सकळा ।। (दागा, ६६७.६).

(पुराणातील प्रल्हादाप्रमाणे श्रीदादा लहानपणीच कीर्तन करतात. हे पाहून रामानंद आनंदित झाले व ते श्रीदादांना प्रल्हाद म्हणू लागले. दादा म्हणतात :-)

दासरामा[१४] रामानंद । म्हणती कवतुके प्रल्हाद ।। (दागा ६८७.१); बालाचे कीर्तनी पावोनी आनंद । म्हणितले प्रल्हाद कौतुकाने ।। (दागा ६६५.३); कवतुके रामानंद । मज म्हणितले प्रल्हाद ।। (दागा ६७७.२),

( रामानंद श्रीदादांना प्रल्हाद असे प्रथम म्हणाले. नंतरच्या काळात नागाप्पाण्णा महाराज निंबरगीकर आणि पाटीलमहाराज यांनीही श्रीदादांना प्रल्हाद म्हटले. )

नागाप्पाण्णा[१५] महाराज । मूळ पीठीचे अधिराज ।। रामा बोलिले



माझे जन्माचे पूर्वी । बहीण गेली पुण्यपर्वी ।
जिचे पायी आघवी । संपत्ति होती ।।
मम माता करी रुदन । तिला दुःख झाले दारुण ।
समाचारे समाधान । होईना तिचे ।।
महादेव[३] मामावरी । मळणगावकर[४] कृपा करी ।
गाठी बांधोनि शिदोरी । औरवाडासी[५] पातले ।
वजीरबाबा महानुभाव । तेथे राहती सदैव ।
धरोनिया सद्भाव । चरणा नमिले ।।
सांगती आपुली व्यथा । इंदिरामातेची कथा ।
प्रसन्नता चित्ता । बाबांच्या आली ।।
तेधवा बाबांनी खारीक । मामांच्या[३] हाती दिली बारीक ।
म्हणती हा प्रसाद एक । मातेसी द्यावा ।।
भक्षण करिता येईल फळ । सांगतो हे प्रांजळ ।
पोटी पुत्र[६] लडिवाळ । असे माऊलीच्या ।।
तो विष्णुभक्त होईल । हर्ष शोक जाईल ।
कधी न पस्तावेल । आयुवरी ।।
माझे मामा सद्गद । झाला बहु आमोद ।
पावोनिया स्वानंद । खारीक दिली ।।
पुढे जन्मला दासराम[७] । हनुमत्[८] सद्गुरु कृपा परम ।
श्रीगुरुलिंग जंगम[९] । वोळले स्वये ।। (गोद, १०-१६)

(सौ. इंदिराबाई श्रीदादांचे वेळी गर्भवती असताना :-)

माता इंदिरा भाग्यवंत । पतिव्रता निष्ठावंत ।
तिजला अनुग्रह प्राप्त । हनुमत्प्रभूचा ।।
शिरी आला सद्गुरुहस्त । बालराम असे गर्भात ।
तो निजगर्भ अनाहत । कानी पडला ।। (गोद, ४-५).

(कुरुंदवाडी श्रीदादांचा अवतार झाला. त्या संदर्भात श्रीदादा सांगतात :-)

माझे आजोळ कुरुंदवाडचे. त्यामुळे माझा जन्म कुरुंदवाड येथे झाला.

E/Atmcrita maste setting 1 (15)

याच वेळी श्रीतात्यासाहेबमहाराज श्रीमंत कुरुंदवाडकर (संस्थानिक) यांचेकडे कीर्तनास आले होते. माझे आजोबा नाना (तात्यासाहेबमहाराजांचे) निस्सीम उपासक. त्यांनीच त्यावेळी महाराजांना माझ्या आजोळी आणले होते. ''या बाळावर कृपा असावी'', असे म्हणून नानांनी मला माझे चौदावे दिवशी महाराजांचे मांडीवर ठेवले. त्यावेळी महाराज म्हणाले, ''आहेच मुळी हा[१०] आमचा'', असे म्हणून, माझ्या मस्तकावरून अमृतहस्त फिरविला, ''या मुलाचे नाव राम ठेवा'' असे सांगितले. ''हा अगदी लहानपणापासून कीर्तन करू लागेल'', असा कृपाशीर्वाद दिला. या त्यांच्या कृपाशीर्वादाप्रमाणे लहानपणापासून (माझे) कीर्तन होऊ लागले. (सातु, पृ. २८).

(वरील भागच श्रीदादांनी ओव्यांमध्ये पुढीलप्रमाणे दिला आहेः-)

अंताजीपंत आजोबा । कुरुंदवाडी पातले ।।१७।।
श्रीमंत अण्णासाहेब कुरुंदवाडकर । गणेशोत्सव करिती सुंदर ।
हनुमत् सद्‌गुरु पातले सत्वर । हरिकीर्तना ।।१८।।
तो अंताजीपंत आले । धरिती हनुमंत पाऊले ।
आणि सगद्‌गद विचारिले । विनम्र भावे ।।१९।।
आपली कृपा परिपूर्ण । नातू लागला आम्हा लागून ।
तया द्यावे आशीर्वचन । करूनी कृपा ।।२३।।
हनुमत्प्रभु आले घरी ।।२४।।
होवोनिया सस्मित वदन । बालका मांडीवरी घेऊन ।
मस्तकी हस्त ठेवून । दृष्टीसी दृष्टी दिधलीसे ।।२६।।
प्रेमे बालका कुरवाळून । म्हणती हा बालपणापासून ।
करू लागेल हरिकीर्तन । वेदांत सांगेल ।।२७।।
जे असे माझे अंतरी । ही प्रभु रामाची कृपा खरी ।
उमटली बाळाचे अंतरी । काय सांगो ।।२८।।
म्हणोनी या बालकाचे नाम । अंताजीपंत ठेवा राम ।
ऐसे बोलून सप्रेम । सांगितले ।। (गोद)

(वरील भाग एका गद्यवाक्यात श्रीदादा पुढील प्रमाणे सांगतात :-)



भगवान् सद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांनी मला चौदावे दिवशी, कुरुंदवाडास आलेवेळी, घरी येऊन मांडीवर घेतले व मस्तकावर आपला वरदहस्त फिरवून, दृष्टिद्वारा कृपानुग्रह केला व ''हा राम आमचाच आहे, हा बालपणापासून कीर्तन करू लागेल'', असा कृपाशीर्वाद दिला.
(नीभाच, आशीर्वाद, पृ.३).

(श्रीदादांच्या वरील वचनावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात :- (अ) श्रीदादांना वयाचे चौदावे दिवशी कोटणीसमहाराजांचा दृष्टिद्वारा अनुग्रह झाला.(आ) श्रीदादा लहानपणापासून हरिकीर्तन करू लागतील. या दोन गोष्टींचे वारंवार निर्देश श्रीदादांच्या लेखनात पुढील प्रमाणे देतातः-)

((अ) दृष्टिद्वारा अनुग्रह )

चौदावे दिनी जहालासे बोध । दासरामा आनंद प्रसादाचा[११] ।। (दागा ६५३.८); चवदावे दिवशी कैची कृपा केली । दृष्टीसी दिधली दृष्टि त्यांनी ।। (दागा ६६७.४); हनुमंत रामदूत । कोटणीस ते विख्यात । शिरी ठेवोनिया हस्त । चोखट मार्ग दाविला ।। (दागा ६८४.१०).

((आ) बालपणीचे कीर्तन )

हनुमंतराय बोलिले वचन[१२] । करील कीर्तन बालराम ।। (दागा ६५३.१) अनाथ लेकरू अनाथ पामरू । कथेचा बडिवारू संती दिला ।। (दागा ६८६.२)

(३)

(इ.स. १९२४ साली श्रीमामांनी कोटणीसमहाराजांना आपल्या घरी भोजनास निमंत्रण दिले होते. कोटणीसमहाराज आल्यावर -)

रामजी[१३] बाजूसी उभा राहून । प्रेमे पाहतसे न्याहाळून ।
आनंद मावेना पूर्ण । बोलता नये ।।
दंगा करू नको काही । ऐसे सांगतसे तया आई ।
हे साचले ह्रदयी । दासरामाच्या ।।
दासरामे नमस्कारिता । कर ठेविला त्याचे माथा ।
ऐसी ही अद्‌भुत सत्ता । हनुमंताची ।। (गोद, ४२-४४).

(श्रीदादा वयाचे पाचवे वर्षीपासूनच साधनाला बसू लागले अणि कीर्तन करू लागले. त्यावेळी त्यांचे पिताजी मामा यांची रोजची नित्याची कीर्तने चालू झाली होती. या

E/Atmcrita maste setting 1 (16)

आले. त्यांनी मला तपासले, पण त्यांनाही काही बोध झाला नाही. तरी त्यांनी माझ्या पाठीतील मणक्यात एक इंजेक्शन दिले. काही वेळ गेला. हळुहळु माझा श्वास खाली आला. मग श्वासोच्छवास नियमितपणे सुरू झाला. गार पडलेले अंग बेताबेताने गरम होऊ लागले. मग मला बोलता येऊ लागले. मामांनी मला विचारले,''रामजी, तुला अचानक काय झाले होते''? मी सांगितले ''मामा, गेले काही दिवस मी श्वास रोखून धरण्याचा अभ्यास करीत होतो. आत्ता माझा श्वास वरच्या वरच राहिला.'' हे ऐकताच मामांनी मला बजावले, ''रामजी, यापुढे श्वास रोखून धरण्याचा अभ्यास ताबडतोब बंद कर.'' मग मी श्वास रोखून धरण्याचा अभ्यास बंद केला. पण एक सांगावेसे वाटते की त्या स्थितीतही मला आनंदच होत होता (दामच, प्रथम आवृत्ति, पृ.२३).

(वयाचे चौदावे दिवशी श्रीदादांना कोटणीसमहाराजांचा दृष्टिद्वारा अनुग्रह लाभला होता. त्याप्रमाणे श्रीदादा साधनास बसू लागले. पण आपले साधन बरोबर होते की नाही ही शंका त्यांना आली. तेव्हा -)

हनुमत्कृपेकरून । माझे बालपणापासून । चालिले जे साधन । ते न्यून की खरे ।। म्हणोनिया एक वेळ । पिताजींना आदरे पुसिले । तव ते म्हणाले । प्रेम भरे ।। आपण दोघे जाऊन । विचारू बाबूरावजी[१८] लागून । ते गुरुपुत्र महान । म्हणोनी ।। बाबूरावजींना विचारले । बैसोनी दाखविले । तव ते म्हणाले । ऐसेची चालू दे ।। (गोद, ७५-७८)

(हाच प्रकार श्रीदादांनी गद्यात असा सांगितला आहे :-)

अगदी लहानपणी श्रीतात्यासाहेबमहाराजांचा कृपाशीर्वाद लाभला. तो आत (मनात) उमटला. पण ही साधनाची कृति बरोबर आहे की नाही हे कोण[१९] सांगणार ? म्हणून मी आमच्या श्रीमामांना विचारले. त्यांनी मला गु. दादासाहेब[१८] कोटणीसमहाराज यांचेकडे नेले. यांना साधनाला बसून दाखविताच त्यांनी '' बरोबर'' म्हणून सांगितले. तसेच साधन[२०] पुढे चालू झाले. यामुळे श्रीतात्यासाहेबमहाराज, श्रीमामा व श्रीदादामहाराज कोटणीस यांच्यात मला काहीही फरक वाटत नाही. (सातु, पृ.२९).



हृद्‌गद । काय आहेसी प्रल्हाद ।। (दागा ६८२.१,७)

(पाटील महाराजांनीही )

प्रल्हाद या नामे हाक दिली निकी (दागा ५७३.६),

(रामानंदमहाराज श्रीदादांना ज्याप्रमाणे प्रल्हाद म्हणत त्याचप्रमाणे ते श्रीदादांना ''हरिनामप्रेमी'' असेही म्हणत. दागा ६६५ या रामानंदाच्या बाबतीतील अभंगात श्रीदादा सांगतात :-)

हरिनामदास हरिनामप्रेमी । भूषण हे रामी संती दिले ।। (दागा ६६५.१); हरिभक्तांकित हरिनामप्रेमी । भूषण हे रामी संती दिले ।। (दागा ६६७.१)

(५)

(एकदा श्रीदादा रामानंदमहाराजांचेपुढे कीर्तन करीत होते. त्यावेळी चिमड संप्रदायाचे प्रवर्तक निंबरगीकरमहाराज हे सिद्धानंद रूपाने प्रगट झाले. या सिद्धानंदांनी श्रीदादांना ''हरिनामदास'' हे नाव दिले)

हरिनामदास राम । म्हणती सिद्धानंद परम ।। (दागा ६७७.४, ६८३.४),
हरिनामदास म्हणती सिद्धानंद । पावोनि हरिकथे ।। (दागा ६७६.२).

(म्हणूनच आपल्या तीन अभंगांत श्रीदादांनी स्वतःचे संदर्भात हरिनामदास हा शब्द वापरला आहे. ते म्हणतात :-)

तेथे लीन हरिनामदास राम ।। (दागा ७२५.४); हरिनामदास राम । स्वात्मरूप परंधाम ।। (दागा ७१९.४); हरिनामदास राम । संतपदी घे आराम ।। (दागा १००२.८).

(एके समयी श्रीदादा रामानंदमहाराजांचे समोर कीर्तन करीत होते. त्यावेळी निंबरगीकरमहाराज हे सिद्धानंदरूपाने अवतीर्ण झाले. त्यावेळी सुगंध दरवळला होता. असाच प्रकार पुढे श्रीदादा हे पाटील[१६]महाराजांचे समोर कीर्तन करीत असताना घडला. या संदर्भात श्रीदादा सांगतातः-)

श्रीमुकुंदराजपंथी सुप्रसिद्ध संत श्रीरामानंदमहाराज खटावकर यांचे पुढे बालपणी माझे कीर्तन चालू असता, सुगंध दरवळल्यावेळी, श्रीनिंबरगीकरमहाराज हे सिद्धानंदरूपाने प्रगट झाले आहेत, असे उत्स्फूर्त उद्‌गार (रामानंदांनी) काढले. त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र नरसोबावाडीस.... श्रीदत्तयोगी श्रीमहादबामहाराज पाटील यांचे उभारलेल्या वास्तूत, वास्तुशांतीचे प्रसंगी, माझे निरूपण झाले. त्यावेळी

E/Atmcrita maste setting 1 (17)

सुगंध पसरला असता, श्रीपाटीलमहाराज यांनी श्रीरामानंदाचे प्रमाणेच उद्गार काढले (संपा, पृ.५).

(एकदा हेच सिद्धानंद श्रीदादांचे स्वप्नात आले. ते काय म्हणाले हे श्रीदादांच्या पुढील अभंगात ग्रथित केलेले आहे :-)

तुझे कुळामध्ये पूर्ण हरिभक्ती । आली ऐसी ख्याती संती झाली ।।१।।
हनुमंत सद्गुरु आज्ञा ते प्रमाण । कराया कीर्तन तव पितया ।।२।।
गोविंदराव कंठी प्रसादाची माळ । घातिली सोज्वळ पांडुरंगे ।।३।।
हरीचे कीर्तन नाम निरूपण । करी उद्धरण श्रोतयांचे ।।४।।
सिद्धानंद स्वप्नी प्रेमे आज्ञापीत । दासराम चित्त शुद्ध होय ।।५।।
(दागा ६७३.१-५).

(६)

(एकदा रामानंदमहाराज खटावकर श्रीदादांना म्हणाले, ''प्रल्हादा, तू संतवचनांचे हृद्गद सांगशील काय ?'' ''गुरूच्या कृपेने सांगीन'', असे म्हणून श्रीदादा घरी आले आणि त्यांना ''रामदासबोध'' हा ग्रंथ स्फुरला. या संदर्भात दादा म्हणतात :-)

१) सद्गुरुंची करणी अगाध । म्हणोनी मम वाचे रामदासबोध ।। माझे वयाचे नववे वर्षी अगाध । सद्गुरूंनी प्रगटविला ।। (रादाबो, १३.१२)
२) भगवान् श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या परम कृपेने अगदी लहानपणी माझे हातून ''श्रीरामदासबोध'' हा ग्रंथ लिहिला गेला. हा श्रीरामदासबोध म्हणजे रामाने केलेला बोध नव्हे तर दासरामास झालेला बोध आहे. या दृष्टीने यातील विषयाकडे आपण पहावे. हे श्रीसद्गुरूंचे बोधामृत आहे की जो बोध भेटला की साधन करावे लागत नाही, ते सहज साधन होते, आणि तो साधक सहज लीलया उद्धरून जातो अशी स्थिती आहे. (रादाबो, आशीर्वाद).

(अन्य एका प्रसंगी रामानंदमहाराज खटावकर श्रीदादांना म्हणाले, ''प्रल्हादा, तू साधनाचे अभंग करशील[१७] काय ?'' ''तात्यासाहेबमहाराजांचे कृपेने हे काम मजकडून होईल'' असे बोलून, श्रीदादा घरी आले आणि त्यांना साधनाचे अभंग स्फुरू लागले. या संदर्भात श्रीदादा आपल्या अभंगात म्हणतात :-)

१) रामानंद महाराज बोलिती माते । करी अभंग ते साधनाचे ।।



हनुमंत सद्गुरुराये नवल केले । अबोल वदविले निजकृपे ।।
(दागा १३४०.१-२),

२) साधनाचे अभंग करी । रामानंद बोले कुसरी ।।
राम सांगे तयाप्रती । असो आशीर्वाद प्रीती ।।
हनुमंत सद्गुरुकृपे । घडे अशक्य अपापे ।।
हनुमंत कृपा वाणी । बोल बोलविले वदनी ।।
दासराम कर जोडून । लेई लेणे सद्गुरुवचन ।।
(दागा ६७५.१-५)

(आणखी एका प्रसंगी रामानंदमहाराज खटावकर श्रीदादांना म्हणाले :-)

आत्मसिद्धांत हा अभंग विवरी । बोलती कुसरी रामानंद ।। (दागा १३२३.१)

(या वचनाला अनुसरून श्रीदादांनी ''चिन्मय सिद्धांत दर्शन'' या शीर्षकाखाली विवरण केले. दासरामगाथा या ग्रंथात हे अभंग १२९७ ते १३२४ असे आहेत.)

(७)

(लहानपणी श्रीदादांनी कुंभक करायचा अभ्यास सुरू केला होता. त्यामुळे एकदा काय घडले हे दि. ३१/३/१९८३ च्या कीर्तनात त्यांनी पुढील प्रमाणे सांगितले :-)

लहानपणी मी श्वास रोखून कुंभक साधण्याचा प्रयत्न करीत असे. एके दिवशी रात्री सौ. आई, मी व मामा असे तिघे जेवावयास बसलो असताना, माझा श्वास जो वर गेला तेथेच कुंभक होऊन, तो काही केल्या खालीच येईना. हातात घेतलेल्या अन्नाच्या घासासह माझा हात तसाच राहिला. आता काय करावे हे मला काहीच सुचेना. तितक्यात आई म्हणाली, '' रामजी, असे काय करतोस ? काय झाले तुला ?'' आईचा प्रश्न मला ऐकू आला पण माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडेना. तेव्हा मलाच काय वाटले कुणास ठाऊक ! मी पाटावरून चटकन उठलो व बाहेर येऊन अंथरूणावर पडलो. माझे अंग गार पडू लागले. आई आणि मामा दोघेही माझ्या मागोमाग आले. मला काय होत आहे हे त्यांनाही कळेना. त्यांची तारांबळ उडाली. ती मला दिसत होती, परंतु मी काहीच करू शकत नव्हतो. चिंताग्रस्त झालेल्या मामांनी तत्काळ मारुति मंदिराजवळ रहाणाऱ्या पटवर्धन डॉक्टरांना श्रीमती माई भागवत यांचेकडून बोलावणे पाठविले. डॉक्टर

E/Atmcrita maste setting 1 (18)

१३४०.१); स्वप्नामाजी तुज अभंगप्रसाद । दिलासे आनंद नित्य सेवी ।। (दागा ६९७.१).

(श्रीदादा सातारा येथे असतानाच त्यांना आणि एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात तात्यासाहेब कोटणीसमहाराज व आणखी एक सत्पुरुष दिसले. या दुसऱ्या सत्पुरुषांनी श्रीदादांना म्हटले :-)

निंबरगीकर महाराज निंबरगीकर महाराज असे ज्यांना तुम्ही म्हणता तोच मी आहे.

(नंतर निंबरगीकर महाराज श्रीदादांना म्हणाले)

रामा, तुझे हे सद्बोध[३] दशक जो कोणी भाविक वाचेल तो भगवद् भक्त होईल (दामच, पृ. ३५)

(यथासमय श्रीदादा साताऱ्याहून सांगलीस परत आले. त्यानंतर श्रावण वद्य अष्टमी, गोकुळ अष्टमी, इ.स. १९३७ रोजी पहाटे ५-५ ।। च्या सुमारास श्रीदादांना एक स्वप्न पडले)

स्वप्नात श्रीतात्यासाहेब कोटणीस महाराजांचे दर्शन झाले. त्यांना साष्टांग प्रणिपात (मी) केला. त्याचवेळी मला कोटणीसमहाराजांची आरती[४] स्फुरली. ती म्हणत मी महाराजांची आरती केली. त्यावर हास्यवदन करून कोटणीस-महाराजांनी मजकडे पाहिले.

(२)

(इ.स. १९३८ चे सुमाराम श्रीदादा सिटी हायस्कूलमध्ये शिकत होते. त्यावेळी त्यांनी काही दिवस डायरी लिहिण्याचा उपक्रम केला होता. त्यापैकी एका डायरीत पुढील नोंदी आहेत) (लोकमान्य विद्यार्थी डायरी, १९३९ (वही १६)

(१) सहावी इयत्ता उत्तीर्ण होऊन सातवीत गेलो. (२) सकाळी अभ्यास, नंतर तुकाराम महाराजांचे बारा अभंग म्हणणे. त्यानंतर शिकवणी, मग जेवण आणि झोप. दिवसात वेळ सापडला की जप करणे. (३) यावर्षी परीक्षेत यश आले नाही. (४) मी, मामा व गंगाधरराव दीक्षित कोल्हापूर जवळील सिद्धगिरीवरील काडसिद्धांचे दर्शनास गेलो. त्यावेळी अमृतपिंडीतून काडसिद्धप्रभूंची मूर्ति प्रगट झाली. त्यांना नमस्कार केला. काडसिद्धांनी सर्वतोपरी अभय व आशीर्वचन दिले. काडसिद्धांच्या चरणांवर लोळण घेतली. त्यानंतर काडसिद्धप्रभु अदृश्य झाले. (५) मामांच्या आज्ञेने गंगाधर सिंगांबरोबर पुनः



**टीपा**

१. आणखी पहा :- गोविंदजी ऐसे पिता । (श्रीमुप्र, हृद्गत, पृ.१२); गोविंदराया पोटी बहुता पुण्ये आलो । (दागा ६८६.३); त्यांचे (=हनुमंतांचे) शिष्य ते गोविंद । तयापोटी जन्म माझा । (दागा ११५४.३); नमो मातृदेवा नमो पितृदेवा । इंदिरा माय गोविंद देवा ।। (दा.गा. ८४७.ध्रु).

२. ''तुम्ही'' हा शब्द गोविंद पिताजींना उद्देशून आहे.

३. महादेव हे सौ. इंदिराबाईंचे मामा होते. पहा :-

मम मातेचे मामा । असती कुरुंदवाड ग्रामा ।। (गोद,६)

४. नारायणमहाराज मळणगावकर हे सांगलीत होऊन गेलेले एक साधु होते.

५. नरसोबावाडीजवळ औरवाड हे गाव आहे. तेथे वजीरबाबा नावाचे एक अवलिया संत रहात होते.

६. म्हणजे वजीरबाबांच्या वचनानुसार श्रीदादांचा जन्म झाला. म्हणून श्रीदादा म्हणतात :- वजीरबाबांचिया कृपे जन्म झाला (दागा ५६९.१). (तसेच वजीरबाबांचे वरून केलेल्या आरतीत श्रीदादा सांगतात :-) केवळ तव कृपे । दासराम जन्मा आला (आरतीसंग्रह, पृ. ४४). ''माझे प.पू. पितृदेव श्रीमामा केळकर यांचे पोटी माझा औरवाड येथील विदेही साधु श्रीवजीरबाबा यांचे आशीर्वादाने जन्म झाला.'' (नीभाच, आशीर्वाद, पृ.३).

७. दासराम ही मुद्रिका श्रीदादांची त्यांच्या लेखनात आढळते.

८. पहा :- हनुमंतराये स्वये अंगीकार केला (दागा ६५५.४); दासरामा कृपाकर माथा दिला (दागा १४८४.४); घेवोनिया मांडीवरी ते आपण । कृपा कर पूर्ण दिला माथा ।। (दागा ६५३.२).

९. श्रीगुरुलिंगजंगम हे निंबरगीकरमहाराजांचे नाव होते.

१०. आणखी पहा :- आमुचाची आहे हा कृपा पूर्ण । अंताजींना पाहून म्हणाले वो ।। (दागा ६५३.३). अगदी लहानपणी श्रीतात्यासाहेबमहाराजांचा कृपाशीर्वाद लाभला (सातु, पृ.२९).

११. आणखी पहा :- राम सद्गुरुचा लाडका । शुद्ध बोध झाला निका ।। (दागा ६८०.५); बोधीयेले बोधा पेटविली ज्योती । गुरुनाथ चित्ती ठसावला ।। (दागा ६५३.५); हनुमंत सद्गुरुराव । प्रगटविले त्यांनी गूज ।। (दागा ६८७.३); धन्य हनुमंत सद्गुरु । कृपावंत परमेश्वरू ।। त्यांनी केली स्वये कृपा । पेटविले आत्मदीपा ।। (दागा ६७७.५-६); हनुमंत प्रभु वोळले (दागा ६९०.३); माझेवरी वोळला । देवराय हनुमंत ।। (दागा ६८४.९) हनुमंत सद्गुरु देव । त्यांनी दिधली निज ठेव ।। (दागा १७५९.३); हनुमंतराय कृपा । दासरामा पंथ सोपा (दागा १४७८.४); सहज साधन प्रसादे लाभले (दागा६९४.४),

१२. आणखी पहा :- जन्मा येवोनि धन्य झालो । गुरुचरणा संनिध आलो । आत प्रगटले कीर्तन ।। (दागा ६८०.१-२); म्हणोनि निर्लज्ज करितो कीर्तन । अभंग म्हणोन नाचतसे

E/Atmcrita maste setting 1 (19)

।। (दागा ६५३.६).

१३. रामजी म्हणजे श्रीदादा. श्रीमामा व सौ. इंदिरा हे मातापिता, श्रीदादांना रामजी या नावावे हाक मारीत.

१४. आणखी पहा :- बालभागवत प्रल्हाद । संबोधिती रामानंद ।। (दागा १७६९.३); तया संबोधिले प्रल्हादचि ।। (दागा ६६७.५); प्रल्हादचि ऐसा म्हणती रामानंद ।। (दागा ६७६.१); बालाचे कीर्तनी डोल घेती रामानंद । प्रेमे हाक देती कवतुकाने या प्रल्हाद ।। (दागा ६५५.२)

१५. आणखी पहा :- तेची नागाप्पाण्णा वदले । आशीर्वाद संती दिधले ।। (दागा ६८७.२); नागाप्पाण्णा सद्‌गुरु बोलिले हा प्रल्हाद ।। (दागा ६७६.३).

१६. पाटील महाराज हे सांगलीत रहाणारे एक विदेही साधु होते.

१७. हे साधनाचे अभंग ''श्रीदासरामगाथा'' मध्ये पृ. ३६९-३७२ वर आलेले आहेत.

१८. बाबूरावजी, दादासाहेब कोटणीसमहाराज आणि दादामहाराज कोटणीस म्हणजेच तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव रघुनाथ हणमंत कोटणीस.

१९. कारण यावेळी तात्यासाहेब कोटणीसमहाराज विद्यमान नव्हते.

२०. साधन चालिले कैसे ते रघुनाथे । मजलागी निरुते सांगितले ।। (दागा ५६९.३).

B B B

# ५. सातारा येथे गमन, विवाह, इत्यादि

(श्रीदादांचा जन्म सातव्या महिन्यात झाला होता. त्यामुळे त्यांची शरीर-प्रकृति बालपणापासून अशक्त होती. तेव्हा, श्रीदादांच्या पिताजींचे स्नेही व्यायामपटु श्री. गंगाधरराव सिंग यांनी मामांच्या संमतीने श्रीदादांचेकडून व्यायाम करवून घेऊन, श्रीदादांची प्रकृति सुदृढ करण्याचे ठरविले. तेव्हा घडले ते असे :-)

(१)

मला व्यायामाची व फिरण्याचीसुद्धा आवड नव्हती. पण काही सूर्यनमस्कार व एक जोर आणि दोन बैठकांपासून दीडशे जोर व तीनशे बैठकापर्यंत सुमारे चार महिने या गंगाधररावांनी मजकडून व्यायाम करवून घेतला. श्री. पंढरीनाथ मणेराजुरीकर हेही मजबरोबर व्यायाम करण्यास येत असत. कृष्णामाईचे स्नान करून आम्ही दोघे व्यायामास जात असू. यानंतर दोनशे जोर व चारशे बैठका जेव्हा त्यांनी (= गंगाधररावांनी) मला काढण्यास सांगितल्या तेव्हापासून व्यायाम हा शब्ददेखील आपण[१] काढला नाही. कारण तो व्यायाम मला पेलवणे शक्य नव्हते. (सांमा, पृ.७)

(इ.स. १९३७ च्या जानेवारी महिन्यापासून श्रीदादांची प्रकृति बरी नव्हती. डॉ. देसाई यांच्या औषधाने श्रीदादांना बरे वाटले. डॉक्टरांनी हवापालट करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार नारायण व हरि या आपल्या आतेबंधूंसह श्रीदादा सातारा येथे हवापालटास गेले. तेथे असताना दि. २१-५-१९३७ रोजी रात्री श्रीदादांना स्वप्न पडले. स्वप्नात काय घडले ते श्रीदादा असे सांगतात :-)

नुकताच अरूणोदय झाला आहे. आपण एका डोंगराच्या पायथ्याशी उभे आहोत. डोंगराच्या बाजूवर गाई चरत आहेत. त्याचवेळी श्रीतुकाराम महाराज हे डोंगराचे माथ्यावरून खाली उतरून येत आहेत (असे दिसले). त्यांना नमस्कार करून मी त्यांचेपुढे हात जोडून उभा राहिलो. तुकाराम महाराजांनी एक अभंग उच्चारून[२] मला बोध केला (दामच, आवृत्ति पहिली, पृ. ३३-३४)

(या अभंगाचा निर्देश श्रीदादांच्या अन्य अभंगांत पुढील प्रमाणे येतो :-)

तुकाराम वाणी बोलियेले वाणी । येवोनिया स्वप्नी पतिताचे ।। दागा ६९७.२); तुकाराम वाणी स्वप्नात येवोनी । आनंद देवोनी गेले मज ।। (दागा

E/Atmcrita maste setting 1 (20)

रेवणसिद्धांनी केली ऐसी कळा । जाणे तो आगळा भक्तराव ।।३ ।।
पौष शुद्ध प्रतिपदेचे दिवशी । केली ऐसी मात[८] सिद्धानी ।।४ ।।
दासरामा हृदयी सिद्धांची[८] वसती । सापडले चित्ती पाय त्यांचे ।।५।।
(दागा ११९२. १-५)

(इ.स. १९४२ च्या उन्हाळ्यात श्रीदादांचा विवाह झाला. इचलकरंजी येथील गोवंडे कुटुंबातील मालती ही वधू होती. लग्नानंतर तिचे सीता असे नाव ठेवण्यात आले. सर्वजण त्यांना वहिनी, सीतावहिनी म्हणत. आपल्या पत्नीबद्दल श्रीदादा असे सांगतात :-)

या केळकराचे घरात त्यांनी (=सौ. सीतावहिनींनी) किती कष्ट उपसले त्याला सीमाच नाही. त्या एकट्याने जे काही करीत होत्या ते आज शंभरांचे हातून होणार नाही, ही अगदी सत्य परिस्थिती आहे (निपा पृ १७७)

घरातील आणि येणाऱ्याजाणाऱ्यांचे मनाप्रमाणे वागून, कोणालाही आपल्या आयुष्यात न दुखावता, सर्वांशी चांगले वागून, त्यांनी मोठेपणा मिळविला (निपा पृ १७७)

माझेसाठी तर त्यांनी काय काय केले हे शब्दाने सांगणेच कठिण आहे आणि ते न सांगितलेलेच बरे (निपा, पृ १७७)

भगवान् श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकर महाराज यांचे कृपेतील माझ्या पत्नी सौ. सीताबाई केळकर यांनी नित्यनेमाने साधना आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत अक्षरशः साधली (निपा, पृ. १७७).

(इ.स. १९३९ पासून श्रीदादांना गुरुलिंगगीतेतील पदे श्रुत होत होती. त्यावेळी मामांचे एक भक्त श्री. गणपतराव कानिटकर हे श्रीदादांच्या घरीच रहात होते. पुढे ते औदुंबरला रहाण्यास गेले. इ.स. १९४३ चे सुमारास ते श्रीदादांना घेऊन औदुंबरला निघाले. त्या काळी भिलवडी स्टेशनवर उतरून औदुंबरला जावे लागे. भिलवडी स्टेशनवर श्रीदादांना श्रीरामू माळी या संतांचे दर्शन झाले)

दर्शन हे जहाले रामू माळियाचे । समाधान साचे वाटे मज ।।१ ।।
भिलवडी माझारी स्टेशनात जाता । नवल हे कथा घडो आली ।।२ ।।
माझे खिशातोनी एक आणा[१०] घेती । भक्त ते म्हणती भाग्य असे ।।३ ।।
जरी कोणी ठेवी रुपये हजार । नाही आण्यावर[१०] घेतलेसे ।।४ ।।



सिद्धगिरीला गेलो. काडसिद्धांच्या दर्शनाची उत्सुकता होती. त्यावेळी ''दर्शन देईल'' असे शब्द आम्हा दोघांना ऐकू आले. आम्ही दोघे ध्यानास बसलो. पुढे पुजाऱ्याचे आणि गंगाधररावांचे सांगण्यावरून काडसिद्धांची आरती केली. त्यावेळी सगळीकडे सुवास दरवळला होता. काडसिद्धांची पूजा चालू असल्याने मूळ पिंडी दिसली. नंतर मुखवट्यासकट काडसिद्धांचे दर्शन झाले. त्यानंतर पुरणपोळीचा प्रसाद मिळाला.

(३)

(इ.स. १९३९ साली दिवाळीमध्ये श्रीदादा हे वासुदेवराव अभ्यंकर इत्यादि काही मंडळीसह चिमड गावी साधुमहाराजांच्या रथोत्सवासाठी गेले होते. त्यावेळी तेथे श्रीदादांचे कीर्तन झाले. या कीर्तनास निंबरगीकर महाराजांचे नातू श्रीनागाप्पाण्णा महाराज, चिमड मठाचे अधिपती नारायणमहाराज यरगट्टीकर आणि चिमड महाराजांच्या अधिकारी पत्नी माईसाहेब उपस्थित होत्या. कीर्तन संपल्यावर - )

कीर्तन ऐकोनी नागाप्पाण्णा तोषले । अभ्यंकरा बोलिले काय ऐका ।।
प्रल्हादची आहे हा लाडका संताचा । संताची हे वाचा[९] एक झाली ।।
नारायण महाराज करिती कवतुक । स्वकीर्तनी देख गौरविती ।।
ऐसी या संतांनी पाठ थोपटली । आशीर्वाद बोलिली साधुमाय ।।
माईसाहेबांना झाले समाधान । ऐकोनी कीर्तन बालाचे ते ।।
(दा. गा. ६८६.७-११)

(श्रीदादांचे वरील कीर्तन ऐकल्यावर)

धन्य नागाप्पाण्णा नारायणराव । कवतुक अपूर्व केले त्यांनी ।। (दा.गा. ६६७.७)

(४)

(चिमडच्या श्रीदादांच्या वरील मुक्कामात श्रीनागाप्पाण्णामहाराज श्रीदादांना म्हणाले की निंबरगकीकरमहाराज स्वत:च तुम्हाला बोध करतील. त्यानुसार श्रीदादा सांगलीस परत आल्यावर, पौष शुद्ध नवमीपासून निंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांना बोध करण्यास सुरवात केली. असे अनेक अभंग श्रीदादांना श्रुत झाले. त्यातील काही सातारच्या हंस नामक साप्ताहिकात प्रसिद्ध झाले. पुढे या अभंगांचे पुस्तकही निघाले. त्याचे नाव श्रीगुरुलिंगगीता. या गुरुलिंगगीतेच्या बाबतीत श्रीदादा सांगतात.)

E/Atmcrita maste setting 1 (21)

(अ)

१) श्रीनागप्पाण्णांचे वचनावरूनच दासरामास श्रीगुरुलिंगगीता प्रसाद मिळाला (नामनि पृ.७)

२) नागाप्पाण्णावचे गुरुलिंगजंगम । बोधिले परम प्रगटोनी ।। (दागा ५६९.३)

३) नागाप्पाचे वचनापरी । येवोनी माझे घरी ।। आपुला प्रसाद मेवा । दिला आम्हा जी बरवा ।। (दा.गा. ७९२.१-२)

४) श्रीनागाप्पामहाराजांच्या वचनाप्रमाणे श्रीनिंबरगीकरमहाराजांनी कायेच्या वाचेच्या मनाच्या पलीकडचे नाम, त्याचा बोध श्रीगुरुलिंगगीतेच्या श्रुतिरूपाने १९३८ साली केला (सा.तु. पृ.२९);

गुरुलिंगजंगमे बोधवचन । प्रगटोनी दिधलेसे ।। (गोद ८७)

(आ)

(पूर्वी रामानंदमहाराजांचे पुढे चाललेल्या श्रीदादांच्या कीर्तनात निंबरगीकरमहाराज हे सिद्धानंदरूपाने प्रगट झाले होते. गुरुलिंगगीतेतील काही पदे निंबरगीकरमहाराजांनी सिद्धानंदरूपाने प्रगट होऊन श्रीदादांना श्रुत केली. म्हणून श्रीदादा म्हणतात :-)

तारावया मतिमंद । अवतार सिद्धानंद ।। (दागा १८२०.१)
नागाप्पाण्णा बोलियेले तैसे । सिद्धानंदे केले ।। (दागा ६९०.१)

(गुरुलिंगगीतेचा पहिला अभंग श्रुत झाल्यावर श्रीदादांना काय वाटले ते पुढील अभंगावरून कळते.)

१) कानडी अभंग योगियांचा प्रसाद । देता हे आनंद[६] नारायण ।।१ ।।
नारायणराव[६] सिद्ध ते समर्थ । पुरविती आर्त जीवीचे या ।।२ ।।
अभंग उमटला माझिये श्रवणी । दर्शन देवोनी पुनीत केले ।।३ ।।
कानडीचा नसता मजसी संस्कार । अंतरी विचार दाखविला ।।४ ।।
पौष शुद्ध[७] नवमी सुवर्णाचा दिन । कानडा भरून राहिलासे ।।५ ।।
ईश्वर कानडा भक्ताही कानडा । किंकर कानडा दासराम ।।६।।
(दागा ७९४.१-६)

२) किती कनवाळू[६] नारायणराव । पाहोनिया भाव हृदयीचा ।।
धावोनिया आले भक्ताचिया घरी । बोधामृत सत्वरी पाजियेले ।।
(दागा ११२५.१-२)



(गुरुलिंगगीतेविषयी श्रीदादांनी सामान्यपणे असे म्हटले आहे :-)

गुहेमाजी नारायणे । दिधली अंतरीची वचने ।। (दागा ७०२.१); गुहेमाजी नारायणे । दिली अंतरीची वचने ।। काय अभंगी प्रसाद । केला कानड्याने बोध ।। (दागा ७०२.२); केला कानड्याने बोध । झाला अभंगी प्रसाद ।। (दागा)

(गुरूलिंगगीतेतील पदे जसजशी श्रीदादांना श्रुत होत गेली तसतशी श्रीदादा ती रोज म्हणू लागले. श्रीदादा रोज पहिली ६६ पदे म्हणत)

आपुलिया प्रसादवचना । नित्य गाते नारायणा ।। (दागा १८१३.१)

(५)

(एकदा गुरुदेव रानडे श्रीमामामहाराजांना भेटण्यास श्रीमामामहाराजांचे घरी आले होते.)

गुरुदेव रानडे हे आमचे घरी आले असता..... गुरुदेवांनी मला प्रश्न केला ''रामभाऊ तुम्हाला (दासबोधातला )कोणता समास आवडतो ?'' यावर ''मला वायुदेवाचा समास आवडतो'' असे मी उत्तर दिले. (संपा पृ.१७)

(इ.स. १९४१ चे सुमारास पंडितराव या आपल्या मामासह श्रीदादा विटेजवळील रेवणसिद्धांचे दर्शन घेऊन आले. परत आल्यावर रेवणसिद्ध श्रीदादांच्या स्वप्नात आले. या संदर्भात श्रीदादा म्हणतात.)

योगिराव[८] स्वप्नामाजी प्रगटला । भक्तावरी वोळला पूर्णपणे ।।१ ।।
हनुमंतसद्गुरुरायाचे वचन । आलेती म्हणोनी स्वप्नामाजी ।।२ ।।
माझिये कपाळी विभूती लाविली । पूर्ण खूण दिली[८] योगियाने ।।३ ।।
आता ते राहिली करणीची कळा । सिद्ध[८] तो तोषला कृपावंत ।।४ ।।
कैवल्यपाठाचे[९] केले कवतूक । घातलीसे भीक आनंदाची ।।५ ।।
भव्य तेजोमय कैची[८] सिद्धमूर्ती । दासराम चित्ती प्रसन्न झाला ।।
(दागा १५२७.१-६)

(दादा आणखी सांगतात :-)

अंगारा तो अंगी लाविला[८] सिद्धांनी । मुद्रा ते नयनी उमटली ।।१ ।।
मस्तकी लाविली रूपाची विभूती । तेणे सर्वाभूती नम्र झालो ।।२ ।।

E/Atmcrita maste setting 1 (22)

यांचे रूप धरून प्रगट झाले.

१५. गोविंदनाथ / गोविंदपंत घोसरवाडकर हे हालसिद्धनाथांचे निःसीम भक्त होते.

१६. दत्तोपंत हे व्यंकटेशांचे चिरंजीव. व्यंकटेश हे गोविंदनाथ घोसरवाडकर यांचे चिरंजीव.

१७. शंकर म्हणजे शंकरमामा शिपुरकर. हे गोविंदनाथांचे दुसरे चिरंजीव.

१८. व्यंकटेशअण्णा हे गोविंदनाथ घोसरवाडकरांचे चिरंजीव.

१९. दत्तात्रेय हे व्यंकटेअण्णांचे चिरंजीव.

B B B



ज्याचा आणा[१०] घेती तयाचे कल्याण । निश्चये करून होत असे ।।५।।
रामू माळियाचा असाची लौकिक । विदेहीच एक आत्मज्ञानी ।।६।।
रामा[११]लागी गीता[१२] दिली असे कोणी । गणपतरावांनी विचारले ।।७।।
शंभूने[१३] दिली ऐसे रामू बोले । रातिचिया वेळे म्हणा म्हणती ।।८।।
हृद्गद कळले गणपतराव यासी । आनंद मानसी दासरामा ।।९।।
(दागा ५७२.१-९)

(६)

(इ.स. १९४३ साली श्रीदादांची साधनसिद्धता होऊन ते सिद्धपदवीस पोचले. साधनप्रक्रियेत आलेले काही अनुभव श्रीदादांच्या काही अभंगात व्यक्त झाले आहेत. स्वतःचा उल्लेख करून त्यांचे जे अभंग आहेत त्यातील काही पुढे दिले आहेत :-)

१) हनुमंत प्रभूच्या दाराशी । राम बाळ आनंदेशी ।
मौक्तिकाचा चुरा हाताशी । जाताचि आला ।। (गोद,३)

२) झालो त्यांचा द्वारपाल । डोळा देखिला घननीळ ।। (दागा ६५६.६)

३) दासराम द्वारी उभा । पाहे समचरणाची शोभा ।। (दागा ६५७.५)

४) आमुची देवावरी सत्ता ।। (दागा ६५७.२)

५) देखिले लावण्य स्वरूप गोजिरे ।। (दागा ६७२.४)

६) अवघा दशदिशा हरी झाला ।। (दागा ६७४.१)

७) दासा नुरेचि बंधन ।। (दागा ६८१.५)

८) सकळी स्वयमेव दासरामी राम रे ।। (दागा ६७९.३)

९) चिद्वस्तु प्रचीती दासरामी ।। (दागा ७०३.४)

१०) आत्माराम माझा कैचा प्रगटला । स्मरणातु आला सगुणरूपे ।। (दागा ७०४.१)

११) दासरामी देखता डोळ्याचा देखणा । भक्तीचा हा राणा अद्वयेची ।। (दागा ७०४.५)

१२) कोठेही जावोनी धुंडोनी पाहिले । तव ते आपुले रूप तेथे ।। (दागा ७२०.१)

१३) दासरामा नामी आत्मरूप दर्शन ।। (दागा ७२०.४)

E/Atmcrita maste setting 1 (23)

(७)

(घोसरवाड या गावातील सिद्धनाथ या देवस्थानाच्या स्थापनेचा ''द्विशत सांवत्सरिक सोहळा'' इ.स. १९४७ च्या सुमाराम झाला. त्या निमित्ताने या देवस्थानात श्रीदादांचे कीर्तन झाले. त्यावेळी गोविंदपंत घोसरवाडकर यांचे चिरंजीव शंकरमामा शिपुरकर हे कीर्तनास उपस्थित होते. या प्रसंगीचा श्रीदादांचा अभंग असा :-)

घोसरवाडी[१४] माझे जहाले कीर्तन । मागील ते लोण पुढे आले ।।१।।
द्विशत सांवत्सरिक सोहळा । जहाला आगळा काय सांगो ।।२।।
धन्य ते सावित्री[१४] धन्य गोविंदनाथ[१५] । परंपरा पंथ चाली लीले ।।३।।
दत्तोपंत[१६] व्यंकटेश आठवण । ते तरी तल्लीन सिद्धरूपी ।।४।।
हरिकीर्तन हे आमुची मिराशी । महाद्वारी कैसी सेवा झाली ।।५।।
शंकरेची[१७] केले थोर कवतुक । भक्ती प्रेम भीक घातलीसे ।।६।।
दासरामा ऐसे लाभले वतन । पूर्ण समाधान दिले देवे ।।७।।
(वही १०३)

(घोसरवाड गावात हालनाथ या देवाची पालखी निघते. तिचा मार्ग ठरलेला आहे. एका दसऱ्याचे दिवशी गजाननमास्तर उदगावकर, तात्या कुंभोजकर, दत्तोपंत घोसरवाडकर यांचे सह श्रीदादा या पालखी समारंभात उपस्थित होते. त्यावेळी घडले ते असे :-)

देवाची पालखी घेवोनी गिरकी । आलीसे तिरकी आम्हाजवळी ।।१।।
सोहळा पहावया गेलो दसऱ्यास । ते दिनी विशेष घडो आले ।।२।।
गजानन मास्तर तात्या कुंभोजकर । घोसरवाडकर दत्तोपंत ।।३।।
मजसवे सारे उभेची बाजूस । चमत्कार खास देवे केला ।।४।।
घोसरवाड ग्रामी दाविली चुणूक । दासरामा भीक प्रेमाचिये ।।५।।
(वही ११३)

(एकदाव्यंकटेश अण्णा यांनी श्रीदादांना भंडारा दिला. त्याचे महत्त्व श्रीदादा पुढील अभंगात सांगतात :-)

व्यंकटेश[१८]अण्णांनी भंडारा तो दिला । जपोनि ठेविला आम्ही घरी ।।१।।
जपोनि ठेविला म्हणुनी सांगितले । तव ते म्हणाले अवचित ।।२।।
जपोनी ठेवेल म्हणोनिया दिला । प्रेमाचा मामला ऐसा असे ।।३।।
वेगळीच असे प्रेमाची ये जाती । आता ते प्रचीती दत्तात्रे[१९]यासी ।।४।।



दासराम तरी प्रेमगंगे नहाला । म्हणोनी वेळोवेळा आठवण ।।५।।
(वही १०३)

**टीपा**

१. (यानंतर श्रीदादांनी व्यायामाला कायमचा रामराम ठोकला. कालांतराने काही दिवस श्रीदादा फिरावयास जाऊ लागले. पुढे) ''चि. बाळू गोखले बरोबर गणपती बागेत काही दिवस फिरावयास जात होतो,'' तेही बंद झाले (सांगली-माहात्म्य, पृ.७)
२. हा अभंग ऐकता ऐकता श्रीदादांना पाठ झाला. जागे झालेवर त्यांनी तो लिहून ठेवला. ''करितो वंदन विठ्ठल चरणा'' असा प्रारंभ असणारा हा अभंग आहे. हा संपूर्ण अभंग दासरामगाथा, पृ.३७७ वर आलेला आहे.
३. स्वप्नात श्रीदादांना तुकाराममहाराजांनी एका अभंगाद्वारे बोध केला. त्यानंतर श्रीदादांच्या मनात आले की इतर काही संतांनीही आपणांस बोध करावा. त्याप्रमाणे नऊ संतांनी श्रीदादांना बोध केला, तोही अभगांतच. तेव्हा हे बोधाचे एकूण दहा अभंग झाले. त्यांना श्रीदादांनी ''सद्बोध दशक'' असे नाव दिले. या सद्बोध दशकाचा उल्लेख निंबरगीकर महाराजांनी केला आहे. हे सद्बोध दशक दासरामगाथा पृ. ३७६-३७९ पानांवर आलेले आहे.
४. ''सद्गुरुभक्तीचा डंका गाजवुनी'' असा आरंभ असणारी ही आरती आहे. ही अनेक ग्रंथात प्रकाशित झाली आहे. ही आरती मामामहाराजांना फार आवडली. म्हणून त्यांनी आपल्या नित्यकीर्तनाच्या अंतीच्या आरत्यांमध्ये तिचा समावेश केला.
५. पूर्वी रामानंद महाराज खटावकर या संतांनी श्रीदादांना प्रल्हाद म्हटले होते. आता नागाप्पाण्णा महाराज या संतांनीही श्रीदादांना प्रल्हाद म्हटले. अशाप्रकारे दोन संतांची वाचा एक झाली.
६. म्हणजे निंबरगीकरमहाराज; नारायण हे त्यांचे नाव होते.
७. पौष शुद्ध नवमी दिवशी निंबरगीकरमहाराज श्रीदादांचे सांगलीतील घरी त्यांचे पुढे साक्षात् प्रगट झाले आणि त्यांनी ''येनू इल्लदानू'' हे पद श्रीदादांना श्रुत केले. निंबरगीकरमहाराजांची मातृभाषा कानडी होती. श्रीदादांना कानडी येत नव्हते; त्यांची मातृभाषा मराठी होती.
८. योगीराव, योगी, सिद्ध या शब्दांनी रेवणसिद्ध अभिप्रेत आहेत.
९. कैवल्यपाठ हा श्रीदादांचा स्फुरलेल्या अभंगांचा समूह आहे. तो दासरामगाथा, पृ. ४१०-४१९ वर आहे.
१०. ''आणा'' हे पूर्वी चालू असलेले चार पैशांचे एक नाणे होते.
११. राम म्हणजे राम गोविंद केळकर उर्फ दासराम उर्फ श्रीदादा.
१२. गुरुलिंगगीता
१३. भगवान् शंभु महादेव शंकर
१४. घोसरवाड या गावात सावित्री नावाच्या भक्त स्त्रीसाठी रेवणसिद्ध हे हालसिद्ध/हालनाथ

E/Atmcrita maste setting 1 (24)

(श्रीदादांचे तृतीय चिरंजीव अनल यांचा विवाह झाल्यावर, श्रीदादा आपल्या सर्व कुटुंबासह हालसिद्धनाथांचे दर्शन घेण्यास, बुधवार दि. ८-१२-१९७६ रोजी, अप्पाचे वाडी येथे गेले. येथे देवाला कौल लावण्याची पद्धत आहे. कौल लावण्याचे दिवस आणि वेळ ठरलेली आहे. श्रीदादा गेले तो बुधवार दिवस हा कौल लावण्याचा दिवस नव्हता. तथापि श्रीदादांचेसाठी शंकरमामा शिपुरकरांनी कौलाची वेळ नसतानाही कौल लावला अणि ते म्हणाले, ''देवा आज तुझा कौलाचा वार नाही. आज येथे रामभाऊ केळकर आले आहेत. त्यांचेसाठी मी कौल लावला आहे. रामभाऊंचेवर तुझी कृपादृष्टि आहेच. त्यांचेकडून भक्ती वाढू दे. त्यासाठी तुझा आशीर्वाद आहे हे इतर सर्वांना कळावे म्हणून मी आत्ता कौल लावला आहे.'' सर्व उपस्थित माणसांच्या देखत देवाने अनुकूल कौल दिला.

अप्पाचेवाडी येथे एका घुमटीत हालसिद्धनाथांची संजीवन समाधि आहे. श्रीदादा आणि त्यांचे बरोबर आसणारी पुरुष मंडळी यांना घेऊन शंकरमामा घुमटीत शिरले. तोच एक दिव्य सुगंध घुमटीत पसरला. तो सर्वांना जाणवला. हालसिद्ध अदृश्य रूपाने प्रगटले होते, याचा निदर्शक तो सुवास होता. श्रीदादा घुमटीत होते तोपर्यंतच तो सुगंध टिकून होता. श्रीदादा घुमटी बाहेर येताच तो सुवास संपला होता. या सर्व प्रसंगाचे संदर्भात श्रीदादा म्हणतात :-)

''बुधवार मार्गशीर्ष वद्य २, शके १८९८, ता. ८-१२-७६ रोजी अप्पाचे वाडीतील दासरामास सिद्धांचा झालेला साक्षात्कार'' असे लिहून श्रीदादांनी वही क्रमांक १२२ मध्ये पुढील अभंग लिहिलेले आहेत :-

(१)

ऐसा पाहिला घुमट । सुगंधाचा घमघमाट ।।१ ।।
सिद्धनाथांची[१०] वसती । दर्शनेची चारी मुक्ती ।।२।।
गोविंदनाथांची[११] विश्रांती । सर्व सिद्धी वोळंगती ।।३।।
शंकरांचे[१२] प्रेमबळे । सिद्धलीले[१०] घडो आले ।।४।।
अप्पाचिये वाडी । आली प्रचीती रोकडी ।।५ ।।
भक्तिप्रेमाचा सोहळा । दासराम पायी धाला ।।६ ।।

(वही १०३)

(२)

भक्तिप्रेमा वंशवेल । सदा फुलावा केवल ।।१।।
सिद्धनाथासी[१०] शंकर[१२] । विनविती जोडुनी कर ।।२।।

# ६. संतांची दर्शने

(इ.स. १९५९ च्या सुमारास श्री. कुपवाडकर यांनी श्रीदादांना तासगावी नेले होते. तेथे महादुबूवा या संतांची व श्रीदादांची भेट झाली.)

तासगावी असे गणपतीचा रथ । तेथेचि बैसत महादूबुवा ।।१ ।।
गुंडुबुवा[१] म्हणती महाद्बुवा श्रेष्ठ । वजीर[२]बाबा श्रेष्ठ म्हणे[१] गुंडा ।।२ ।।
कुपवाडकरामुळे गणेश दर्शन । जाहाले कीर्तन माझे तेथे ।।३ ।।
महादूबुवा मुक्त हास्य ते करिती । पाहोनिया चित्ती समाधान ।।४ ।।
गुंडुबुवा जेव्हा जाहले अदृश्य । तेव्हाचि अदृश्य महादूबुवा ।।५ ।।
दासरामा घडले संतांचे दर्शन । त्याची आठवण होत असे ।।६ ।।

(दागा ५७७.१-६)

(इ.स. १९५९-१९६० चे सुमारास श्रीदादा पुण्याला गेले होते. एस्.टी. ने ते सांगलीस परत येत होते. वाटेत एस.टी. ही इस्लामपूर बस स्टँडवर थांबली होती. तेथे बस स्टँडवर श्रीदादांना इस्लामपुरात रहाणारे संत धोंडीराममहाराज दिसले. त्यांना नमस्कार करण्यास श्रीदादा एस.टी.तून खाली उतरले. त्यांनी धोंडीराम महाराजांना नमस्कार केला. हा प्रसंग वर्णन करणारा श्रीदादांचा अभंग असा आहे :-)

ईश्वर[३]पुरामाजी धोंडीराम सिद्ध । जाहले प्रसिद्ध सर्वत्रची ।।१ ।।
तहानभुकेची जया शुद्ध नाही । देहीच विदेही पूर्णपणे ।।२ ।।
गटारीचे पाणी पिवोनिया तृप्त । मेहेरबाबा[४] चकित पहाता भले ।।३ ।।
पुण्यपत्त[५] नेसी जाता येता सहज । गुळवणी[६]महाराज दर्शन घेती ।।४ ।।
पुण्याहूनि येता धोंडीरामचरण । धरोनी नमन केले रामे[७] ।।५ ।।
धोंडीरामे आपुले हात वर धरून । दिले आशीर्वचन हास्यमुखे ।।६ ।।
कधी नाही घडले ऐसे भक्त म्हणती । नवलाव चित्ती दासरामा ।।७ ।।

(दागा ५७१.१-७)

(इ.स. १९५९-६० चे सुमारास श्रीदादा कोल्हापूरला गेले होते. तेथील कुंभार स्वामी हे साधु ज्या तेलिणीच्या घरी रहात असत, त्या तेलिणीने श्रीदादांना कीर्तनास येण्याचे आमंत्रण दिले. तेथे देवाच्या शेजघरात श्रीदादांचे कीर्तन झाले. या संदर्भात श्रीदादा लिहितात)

कुंभारस्वामीनी घेतली सेवा । दिला असे मेवा प्रसादाचा ।।१ ।।

E/Atmcrita maste setting 1 (25)

तेलीण बोलवी कराया कीर्तना । आनंद तो मना झाला असे ।।२।।
शेजघरी माझे जहाले कीर्तन । स्वामीही[८] प्रसन्न नवल झाले ।।३।।
सुगंध सुटला सर्वा जाणवला । दासराम झाला शरणागत ।।४।।
(दागा ५७५.१-४)

(इ.स. १९६२ साली श्रीदादांचे पिताजी मामामहाराज निजधामी गेले. मामांना कोटणीसमहाराजांनी नित्य कीर्तनाची आज्ञा दिली होती. हे कीर्तन आपल्या कुळातील पुरुषांनी पुढे चालवावे अशी मामांची धारणा होती. तशीच धारणा श्रीदादांचीही होती. म्हणून कीर्तनाची परंपरा आमच्या घरी आली असे श्रीदादा म्हणतात :-)

कीर्तनाची परंपरा । आली माझिया घरा ।। (दागा ६५९.१, ६५४.१)

(कोल्हापूर येथे दादामहाराज किर्लोस्कर नावाचे साधु होते. त्यांचे एक दत्त मंदिर होते. त्या दत्तमंदिरीत कीर्तन करण्यास किर्लोस्करांनी श्रीदादांना आमंत्रण दिले. ते स्वीकारून श्रीदादांनी कीर्तन कले. कीर्तनास किर्लोस्करमहाराज उपस्थित होते. या संदर्भात श्रीदादांनी असे लिहिले आहे :-)

कोल्हापूर ग्रामी । वसती दत्तगुरु स्वामी ।।१।।
दत्तमंदिर लहान । तेथे जहाले कीर्तन ।।२।।
महाराज किर्लोस्कर । मुखी सदा दिगंबर ।।३।।
एका वेळी अंबा[६]लयी । आणि मठी दिसती पाही ।।४।।
ऐसा ज्यांचा अधिकार । संतोषले ते अपार ।।५।।
कीर्तनी आल्हाद ।दासरामासी आनंद ।।६।।(दागा५७६.१-६).

(इ.स. १९६४-६५ साली श्रीदादांना असे दिसले :-)

स्वप्नात भजन करीत आकाशातून खाली उतरणारी संतमंडळी आणि त्यांचे पुढे विठोबा (देव) दिसला. विठोबा मजपुढे येऊन उभा राहिला. मी त्याला नमस्कार केला. तेव्हा विठोबा म्हणाला, ''रामा, या कलियुगात जाधव नावाच्या कुळात सातार्‍याकडच्या बाजूला मी अवतार घेणार आहे. तत्पूर्वी तुला दर्शन द्यावे म्हणून मी आलो आहे''. आनंदित होऊन मी विठोबा व संतमंडळी यांच्या पायांवर मस्तक ठेवले. इथे स्वप्न संपले.



(श्री ज्ञानेश्वरमहाराजांचा ''ॐकार अक्षर'' या शीर्षकाचा एक प्रदीर्घ अभंग आहे. त्याचा गद्य भावार्थ श्रीदादांनी रविवार दि. १४-४-१९६८, चैत्र वद्य प्रतिपदा, शके १८९० रोजी पूर्ण केला. त्या संदर्भात श्रीदादा म्हणतात :-)

प्रेरणा माऊलीची, सत्ता महाराजांची, कृपा तात्यासाहेबांची व प्रेमवात्सल्य कै. परमपूज्य पितृदेवांचे; त्यामुळे त्यांनी या अर्भकाकरवी हा भावार्थ आपल्या कृपेने लिहून घेतला. त्यांचे अनन्य भावाने स्मरण करून व गुरुपरंपरेला आणि गुरुपीठांना प्रणाम करून हा भावार्थ श्रीज्ञानराज माऊलीचे चरणी समर्पण करीत आहे. (सिसं, सप्टेंबर व डिसेंबर, १९७२).

(शिरगुप्पीकर नावाचे हालसिद्धांचे एक भक्त होते. त्यांना देवाने कॅन्सरमधून बरे केले होते. ते एकदा शंकरमामा शिपुरकपरांना म्हणाले, ''मामा मला काही केल्या समाधान वाटत नाही. आपण काहीतरी उपाय सांगा.'' तेव्हा शंकरमामा म्हणाले, ''चिमड संप्रदायात आता रामभाऊ केळकर महाराजांच्या सारखा दुसरा कोणी सत्पुरुष नाही. ते सांगलीत असतात. तू त्यांच्याकडे जा. त्यांच्याकडे गेल्यावर तुला समाधान लाभेल.'' त्याप्रमाणे शिरगुप्पीकर सांगलीस श्रीदादांच्याकडे आले. या संदर्भात श्रीदादांचा एक अभंग असा आहे, :-)

शिरगुप्पीकरांना देवे पाठविले । समाधन केले ज्याचे त्यांनी ।।१।।
स्वये श्रीशंकर[१] घेवोनिया आले । सवेची आणिले नारायणा ।।२।।
मधुकर[२] दाजी आणि गजानन[३] । सिद्धकथे[४] भान हारपले ।।३।।
सिद्ध[४]नाथे केली ऐसी पाठवण । झाली आठवण चिमडाची ।।४।।
प्रेमप्रतीतीने करावा सांभाळ । मागे लडिवाळ दासराम ।।५।। वही १०३)

(श्रीदादांचे ज्येष्ठ चिरंजीव चंद्रशेखर यांना प्रथम कन्या झाली. तिचे नाव ज्योति असे ठेवण्यात आले. ती सतत ''सद्गुरुनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी'' हे भजन म्हणत असे. तिच्यावर श्रीदादांची मर्जी होती. दिनांक १७-१२-१९७४ रोजी ती अकाली दिवंगत झाली. तिचे गुणवर्णन करणारा श्रीदादांचा श्लोक असा :- )

हासत नाचत प्रेमे वैकुंठा पातली स्वये ज्योती ।
सद्गुरुनाथा प्रार्थुनी न कळे पायी कधीच ठेली ती ।।

टीपा
१. श्रीशंकर = शंकरमामा शिपुरकर.
२. मधुकर हे शंकरमामांचे चिरंजीव.
३. गजानन म्हणजे गजानन मास्तर.
४. सिद्ध, सिद्धनाथ, देव म्हणजे हालसिद्धनाथ.

E/Atmcrita maste setting 1 (26)

शंकरांनी[२४] ऐसे केले कवतुक । मार्गशीर्ष देख अमावास्या ।।२ ।।
शीर्ष मार्गे जाता साक्षात्कार झाला । दिवस लाभला सोनियाचा ।।३ ।।
सोन्याचा दिवस मधुकर[२५] बोले । दासरामे नमिले सिद्धपद[२६] ।।४ ।।
ऐसे हे घडले अप्पाचिये वाडी । दासरामा आवडी सिद्धपदी ।।५ ।।

(दामच, पृ. १४४)

(विश्वनाथमहाराज रुकडीकर यांचे पुण्यतिथी प्रसंगी, माधवनाथ सांगवडेकर यांचेकडे कोल्हापूरास श्रीदादांचे कीर्तन झाले. या प्रसंगाची नोंद श्रीदादांनी अशी केली आहे :-)

कोल्हापूर येथे श्रीमाधवनाथ सांगवडेकर यांचेकडे प.पू. विश्वनाथ महाराज रुकडीकर यांचे पुण्यतिथि महोत्सव प्रसंगी मला अगत्याचे बोलावणे होते, म्हणून गेलो असता, स्वरूपाचा आनंद या अभंगावर[२७] माझे निरूपण झाले. अभंग कीर्तनाचे वेळीच स्फुरला...... कीर्तनोत्तर माझी व स्वामी अमलानंदांची झालेली भेट अपूर्वच ठरली. स्वामी स्वरूपानंदांचे आदेशाप्रमाणे त्यांनी माझे गळ्यात पुष्पहार घालून दृढ आलिंगन दिले. (संपा, पृ.३५)

**टीपा**

१. गुंडा / गुंडुबुवा हे बुधगाव येथील विदेही साधु
२. औरवाड येथे रहाणारे वजीरबाबा हे अवलिया संत होते.
३. ईश्वरपुर म्हणजे इस्लामपूर
४. अहमदनगरजवळ वास करून असणारे एक साधू.
५. पुण्यपत्तन म्हणजे पुणे हे शहर.
६. गुळवणी महाराज हे पुणे येथे रहाणारे योगी साधु होते.
७. राम म्हणजे दासराम अथवा श्रीदादा.
८. कुंभारस्वामी
९. अंबालय म्लणजे कोल्हापूर येथील अंबाबाई महालक्ष्मीचे देवालय.
१०. हालसिद्धनाथ
११. गोविंदनाथ घोसरवाडकर हे हालसिद्धांचे भक्त.
१२. शंकरमामा शिपुरकर
१३. गुरुवार आणि रविवार हे कौल लावण्याचे ठरलेले दिवस आहेत.
१४. कौल लावण्याची वेळ सकाळची असते.
१५. श्रीदादा बुधवारी सकाळी अप्पाचे वाडीस पोचले. त्यानंतर दुपारी १२ नंतर देवाला शंकरमामांनी कौल लावला.



नाही वेळ नाही वार । कौल द्यावा जी सत्वर ।।३।।
तोचि झाला चमत्कार । सिद्धनाथे दिला वर ।।४।।
पहाता सारे चाकाटती । तया प्रेमा नाही मिती ।।५।।
दासराम पायी लीन । तया देवाचे वरदान ।।६ ।।

(वही १०३)

(३)

नाही गुरुवार[१३] नाही शनिवार[१३] । असोनी बुधवार कौल दिला ।।१।।
सकाळची[१४] वेळ तेही गा नव्हती । तरी चमत्कृती दोन[१५] प्रहरी ।।२।।
शंकरानी[१२] स्वये लावियला कौल । तया प्रेमा मोल नाही जगी ।।३ ।।
भक्ती वाढो ऐसा थोर आशीर्वाद । देती हालसिद्ध दासरामा ।।४।।

(वही १०३)

(४)

सुगंध[१६] पहाता दरवळला असे । परी फूल ऐसे नाही जगी ।।१ ।।
कोणते अत्तर सांगताचि येना । धूप उदी म्हणा तेही नव्हे ।।२ ।।
सहस्रमुखाचा वर्णिता माथा । डोल तया आला स्वानंदेची ।।३ ।।
माझे श्रीशंकर[१२] झालेती तटस्थ । बैसलेची स्वस्थ भक्त सारे ।।४ ।।
गोविंदसुता रामा दावी योगी खुणा । हालसिद्ध राणा वोळलासे ।।५ ।।

(वही १०३)

(५)

सुगंधसागर माझा[१७] सिद्धेश्वर । नाम घेता फेर चुकताती ।।१ ।।
अप्पाचियेवाडी ऐसे घडो आले । अबोलची ठेले शब्दापैल ।।२ ।।
सिद्धेश्वर[१७] ऐसे म्हणताचि वाचे । परिपूर्ण त्याचे समाधान ।।३ ।।
दासराम प्रेमे गाई सिद्धेश्वर । आनंद अपार भरला दिसे ।।४ ।।

(वही १०३)

(वरील सर्वाचा भावार्थ असा की श्रीदादांचेवर हालसिद्धनाथांची कृपा होती. गोविंदनाथ, बाबूराव अण्णा आणि शंकरमामा यांच्यामुळे श्रीदादा अप्पाचेवाडीस हालसिद्धांचे दर्शनास गेले. म्हणून श्रीदास म्हणतात :-)

E/Atmcrita maste setting 1 (27)

गोविंदनाथ अण्णा शंकरमामांचेनी ।
वोळले ते झणी हालसिद्ध ।।

(दागा ५६९.४)

(इ.स. १९७७ च्या चैत्र वद्य दशमी दिवशी, सकाळचे वेळी, श्रीदादांना एका सत्पुरुषाचे दर्शन झाले. त्यांचे नाव श्रीदादांनी नोंदलेले नाही. तथापि या सत्पुरुषाच्या दर्शनाचा उल्लेख श्रीदादांच्या पुढील अभंगात आहे :-)

शालीवाहन शके १८९९ । सकाळचे नऊ आणि दोन ।।१।।
चैत्र वद्य दशमी आणि बुधवार । आलासे समोर महापुरुष ।।२।।
उंचा पुरा गोरा...[१८] शीस । जया अंगी सदरा पायी लुंगी ।।३।।
''महाराज, बरे आहे ना'' म्हणोनी । पुसले तयांनी मजलागी ।।४।।
अनोळखी परी भेटविती वाटे । ऐसे प्रेम कोठे नातुडेची ।।५।।
दोन्ही हस्त वर केले हो तयांनी । दासराम मनी नमन करी ।।६।।

(वही ११५)

(सोमवार, चैत्र वद्य द्वादशी, इ.स. १९७७ साली सांगलीतील बरडे यांचे विठ्ठल मंदिरात श्रीदादांचे काल्याचे कीर्तन चालू होते. त्यात नामदेवांच्या कीर्तनात पांडुरंग नाचला हा विषय चालू होता. तितक्यात पखवाज वाजविणारा पुरुष श्रीदादांना म्हणाला,'' महाराज, तुमच्या कीर्तनातही आता विठ्ठलाची मूर्ती नाचली आहे,'' असे म्हणून त्याने विठ्ठल मूर्तीकडे बोट दाखविले. सर्वांनी विठ्ठलाच्या मूर्तीकडे पाहिले. विठ्ठलाच्या गळ्यात घातलेला हार सरकून एकाच खांद्यावर आलेला दिसला. याची नोंद श्रीदादा अशी करतात :-)

बरडे विठ्ठल मंदिरी झाला हरिकीर्तन गजर ।
सप्त्याची समाप्ती काला रंगला अपार ।।ध्रु।।
नामया[१९] कीर्तनी रंग भरे अनिवार ।
विषय ओघे आला कीर्तनी या साचार ।।१।।
पखवाजी तो अभंग बोले[१८] ... परी कर ।
म्हणे नाचता देवाजीचा गळला पीतांबर ।।२।।
जानव्यापरी तोचि जाहला विठोबाचा हार ।
गाभाऱ्यातची पाहाता नवल करती[२०] नारीनर ।।३।।
प्रभाकर महाराजा अर्पियेला हार ।
एका बाजुसी रुळे सारे म्हणती चमत्कार ।।४।।



चैत्र वद्य द्वादशीसी आला सोमवार ।
दासरामे सेवा केली प्रेमे सादर ।।५।।

(वही११६)

(गोविंदनाथ घोसरवाडकर हे हालद्धिांचे भक्त होते. त्यांचे अंगामध्ये हालसिद्धांचा संचार होत असे. असाच हालसिद्धांचा संचार गोविंदनाथांचे चिरंजीव बाबूराव अण्णा यांचे ठायी होत असेक. एकदा गोविंदपंतांचे पुण्यतिथी दिवशी श्रीदादा बाबूरावजी अण्णांचेकडे गेले असता, त्यावेळी काय घडले याची नोंद श्रीदादांनी अशी केली आहे :-)

बाबूरावालागी झालासे संचार । मजला सत्वर बोलाविले ।।१।।
हातीचा भंडारा काढोनी दिधला । शिक्कामोर्तब केला तयावरी ।।२।।
भक्ति वाढवावी ऐसा आशीर्वाद । देवोनी आनंद केला देवे ।।३।।
कारीकोळ[२१] राणा आमुचे वाड्यात । आलासे धावत काय सांगो ।।४।।
गोविंदपंतांचे पुण्यतिथी दिवशी । दिली खूण ऐसी दासरामा ।।५।।

(वही १२९)

(पुढे काही काळानंतर बाबूरावजी अण्णांना अंतिम आजार झाला. श्रीदादा त्यांना भेटण्यास गेले होते. त्या समयी असे घडले :-)

''तुम्ही येता येथे नव नारायण । ठाकले आपण मजपुढे'' ।।१।।
ऐसे म्हणोनिया बैसले उठोनी । अत्यवस्थ असूनी काय सांगो ।।२।।
कुरुंदवाड ग्रामी अण्णाकडे[२२] गोष्टी । अण्णांचिया[२२] पोटी प्रेम भारी ।।३।।
गजाननासवे[२३] भेटुनिया आलो । सारेची रंगलो भेटीमाजी ।।४।।
दासरामालागी होय आठवण । काय काय म्हणून सांगू तरी ।।५।।

(वही १०३)

(अप्पाची वाडी या गावी देवाचे मंदिरापुढे सभामंडप बांधण्याचे शंकरमामा शिपुरकर यांनी ठरविले. त्या कामाचा शुभारंभ श्रीदादांचे हस्ते करण्याचे त्यांनी ठरविले व तसे आमंत्रण त्यांनी श्रीदादांना दिले. बुधवार दि. १९-१२-१९७९, मार्गशीर्ष अमावस्या शके १९०१ या दिवशी श्रीदादांच्या हस्ते हा समारंभ झाला त्यानंतर तेथेच श्रीदादांचे कीर्तन झाले. या संदर्भात श्रीदादा सांगतात :-)

सभामंडपाचा शुभारंभ केला । देवाच्या प्रेमाला सीमा नाही ।।१।।

E/Atmcrita maste setting 1 (28)

दुर्मती नामे संवत्सर हे । सन्मति स्मृति राहिली ।।२२।।
सूरदास बहु भक्त गर्जती । ज्ञानेश्वर माऊली ।।२३।।
रेखांाकित प्रतिमा यापरी । दासरामी झळमळी ।।२४।।

(वही १२९)

(श्रीमहादबामहाराज पाटील हे विदेही संत कधी कधी श्रीदादांचे कीर्तनास येत. पुढे ते नरसोबावाडीस राहू लागले. एकदा श्री. बापूसाहेब चाफळकरांनी श्रीदादांना नरसोबावाडीस नेले. तेथे पाटीलमहाराजांचे समोर श्रीदादांचे कीर्तन झाले. ते ऐकल्यावर संतुष्ट झालेल्या पाटीलमहाराजांनी श्रीदादांना प्रल्हाद या नावाने हाक दिली. या संदर्भात श्रीदादा म्हणतातः- )

राजयोगी असोनी सर्वदा विदेही । असोनी विदेही राजयोगी ।।१।।
पाटील महाराज ऐसे थोर संत । अंगारा लावीत कल्याणाचा ।।२।।
बोलावे ते होते ऐसा अनुभव । अनेकांचा भाव त्यांचे पायी ।।३।।
आयुवरी वारी नृसिंहवाडीची । तेथे विश्रांतीची जागा केली ।।४।।
चाफळकर योगे जाहले कीर्तन । जाहले प्रसन्न रामावरी[1] ।।५।।
प्रल्हाद या नामे हाक दिली निकी । दोनी हाती शेखी कवटाळिले ।।६।।
रामा[2]नंदापरी मारताची हाक । वाटले कौतुक दासरामा ।।७।।
(अशाप्रकारे ) श्रीपाटीलमहाराज यांनी माझे कौतुक केले

(नीभाच, आशीर्वाद, पृ.३)

(श्रीदादांचे नातेवाईक श्री.बापूमायदेव यांना आपल्या आजरे गावात स्वतःच्या शेतात विहिर खणावयाची होती. त्या संदर्भात त्यांनी श्रीदादांना प्रश्न केला. ''तेव्हा कुठेही खणा, पाणी लागेल'' असे श्रीदादा म्हणाले. त्याप्रमाणे बापूंनी विहिर खणून घेतली. विहिरीला उत्तम पाणी लागले. तसे बापूंनी कळविताच, श्रीदादा उद्गारले :-)

बापू, तुमच्या विहिरीत चिमडची ताप[3]नाशी आली आहे.

(दामच, पृ. १५७)

(फाल्गुन शुद्ध द्वादशी दि. ७-३-१९८२ रोजी सांगलीतील खणभागातील एका मंदिरात श्रीदादांच्या हस्ते तुकाराम महाराजांच्या मूर्तीची स्थापना झाली. त्यावेळी श्रीदादांना स्फुरलेला अभंग :-)

सांगली क्षेत्र हे पावन झाले ।।ध्रु।।
जगदाळे[4] जमदाडे पोवार । भोसले हरणे आले ।।१।।



१६. श्रीदादा, शंकरमामा व इतर हे हालसिद्धांचे घुमटीत शिरताच एक अपूर्व सुगंध सुटला .
१७. म्हणजे हालसिद्धनाथ
१८. इथली अक्षरे न कळल्याने टिंबे दिली आहेत.
१९. म्हणजे नामदेव महाराज
२०. कीर्तनात उपस्थित असणारे स्त्रीपुरुष श्रोते.
२१. कारीकोळ या गावी हालसिद्धनाथांचे एक स्थान आहे.
२२. बाबूरावअण्णा घोसरवाडकर हे गोविंदनाथांचे चिरंजीव
२३. गजानन मास्तर उदगावकर
२४. शंकरमामा शिपुरकर
२५. मधुकर हे शंकरमामा शिपुरकरांचे चिरंजीव
२६. हालसिद्ध
२७. सोहं तोचि सद्गुरुराव इत्यादि कीर्तनाचा अभंग होता.

B B B

E/Atmcrita maste setting 1 (29)

# ७. साठीशांति

(श्रीदादांचा जन्म इ.स. १९२० साली झाला. १९८० साली त्यांना साठावे वर्ष लागत होते. तेव्हा श्रीदादांची साठी-शांति करण्याचे, त्यांचे घरची मंडळी व त्यांचे भक्तजन यांनी ठरविले. माघ महिना, पौर्णिमा, शके १९०१, गुरुवार दि. ३१/१/१९८० रोजी, गुरुपुष्य-अमृत-योगावर हा सोहळा पार पडला. या संदर्भात श्रीदादांचे मत काय होते, हे पुढील अभंगात व्यक्त झाले आहे :-)

जरी का झाली साठी । साठी तरी कशासाठी ।।१ ।।
जरी व्यक्तिचिये साठी । तरी व्यक्ती काय मोठी ।।२ ।।
व्यक्तिमत्त्व जेथे नाही । तेथे व्यक्ति तरी काई ।।३ ।।
अशांतता जेथे नाही । तरी शांती कैसी होई ।।४ ।।
जेणे योगे हे घडले । त्याचे महत्व कळले ।।५ ।।
तयाचिये म्हणू शांती । तरी त्याचे वय किती ।।६ ।।
महाराजांनी कवतुक केले । सकळा समाधान झाले ।।७ ।।
श्रद्धा आणि भक्ती । हीच साठीची संगती ।।८ ।।
ऐसा गोडचि संकेत । दासराम हा निवांत ।।९ ।।

(दामच, पृ. १४८)

(आळंदीत श्रीमामांना ज्ञानेश्वर महाराजांचे साक्षात दर्शन झाले. त्यावेळी मामांनी ज्ञानेश्वर महाराजांचे रेखाचित्र काढले होते. त्या चित्रावरून श्री. मधुकर वैकर यांनी ज्ञानेश्वर महाराजांचे एक सुंदर चित्र तयार करून घेतले (इ.स. १९८१ चा सुमार). त्या संदर्भात श्रीदादा लिहितात :-)

श्रीमामांनी काढलेल्या (ज्ञानेश्वर महाराजांच्या) या चित्रावरून वालचंदनगरचे श्रीज्ञानेश्वरभक्त श्री. मधुकरपंत वैकर यांनी सुंदर चित्र तयार करून घेतले. त्यांना ही स्फूर्ती नाशिकचे विद्यावाचस्पति श्रीरामबुवा गोसावी, पुण्याचे श्री. शांताराम आठवले, इ. संतसज्जनांनी या चित्राबद्दल जी आपली आत्मीयता पुस्तकातून मासिकातून प्रगट केली आहे, त्यावरून आली (अवा, प्रकाशकाचे मनोगत, पृ. ५१)

(या चित्राचे महत्त्व श्रीदादांच्या मनावर फार परिणाम करून गेले होते. इतके की या चित्राचे वर्णन करणारा त्यांचा एक श्लोक असा आहे :-)

काषायांबर पादुकाही चरणी मंदील श्रीमस्तकी ।



चरणी कुंडल नी गळ्यात झळके रुद्राक्षमाळा निकी ।
हातामाजी कमंडलू नि बरवा शोभे भला दंड तो ।
गोविंदापुढती प्रकाशरूप जे त्या ज्ञानिया वंदितो ।। (अमृतवाणी)

(खेरीज वरील प्रसंगाशी आणि चित्राशी निगडीत अशी अनेक पदे श्रीदादांच्या वह्यांत सापडतात. त्यातील एकच पद / अभंग पुढे दिला आहे :-)

ज्ञानेश्वर माऊली ग माय माझी । ज्ञानराज माऊली ।।ध्रु ।।
गोविंद पितया दर्शन देऊनी । रेखांकित जाहली ।।१ ।।
शक अठराशे सव्वीस माजी । मात आळंदी भली ।।२।।
श्रीगोविंदे सकृती ऐसी । बहु गुप्तचि राखिली ।।३ ।।
श्रीराम बुवा गौरवताती । मासिकातून भली ।।४ ।।
जिवाजीपंते जीव ओतुनी । पुनरपि ही सजविली ।।५ ।।
मामा केळकर विशेष अंकी । रायकरे घेतली ।।६ ।।
शांतारामे ग्रंथी दाविली । कैसी होती माऊली ।।७ ।।
सरस्वती आणि वालदासजी । संतजनी देखिली ।।८ ।।
मधुकर वैकर नगरकरांनी । ही छाया घेतली ।।९ ।।
भाविक भक्ती पत्रोपत्री । परोपरी प्रार्थिली ।।१० ।।
ज्ञानदासजी गोळे म्हणती । दुर्मिळ परी लाभली ।।११ ।।
कल्याण शेटी चित्रकार परी । बुद्धि चकित जहाली ।।१२ ।।
विश्वस्तांनी आळंदीसही । कार्यालयी ठेविली ।।१३ ।।
कृष्णाजीनी शामाकरवी । धातुमूर्त केली ।।१४ ।।
आण्णाप्पांनी रंगीत ऐसी । प्रतिकृति करविली ।।१५ ।।
चित्रांचे संशोधन करूनी । केशवेची वर्णिली ।।१६ ।।
आताची कोठे कळली कोणा । कुठे कुठे स्थापिली ।।१७ ।।
आप्पाजीनी आपुल्या हस्ते । कैसी रेखाटली ।।१८ ।।
या रेघेची महती ऐसी । दृष्टीने देखिली ।।१९ ।।
निंबरगी आणि जुनोनी मठी । सातारी राहिली ।।२० ।।
भोसले भले पाडव्यासी या । प्रतिमा भूषविली ।।२१ ।।

E/Atmcrita maste setting 1 (30)

नाम[२७]सप्ताहाचा शुभारंभ झाला । आनंद वाटला[२७] शिरोळात ।।१ ।।
निंबर्गी (चे महा–) निर्वाण शता[२८]ब्दीचे वर्ष । प्रगट पुरुष गुरु[२४]लिंग ।।२ ।।
उभा वीणा केला पारायण सोहळा । बोलिलो समयाला चार शब्द ।।३ ।।
फुलाचिया परी बरगे[२९] यांनी केले । दर्शन जहाले तेली[३०] यांचे ।।४ ।।
निंबरगी महाराजे योग हा आणिला । पुढे उभा केला नामपंथ ।।५ ।।
घेवा[३१]री यांची इच्छा पूर्ण झाली । प्रेमे संतोषली संतमाता ।।६ ।।
तात्यामहाराजे दिलीसे सुपारी । प्रेमे धरली करी दासरामे ।।७ ।।

(वही १५८)

(सर्व साधक भक्तांना साधन प्रक्रियेत उपयोगी पडेल असा एक लेख श्रीदादांनी लिहिला. त्याचे नाव '' पवन स्मरणी.'' हा लेख[३३] सायक्लोस्टाईल करून भक्तांना वाटण्यात आला) (दामत्र, पृ. १८०)

**टीप**

१. दासरामावर
२. रामानंदमहाराज खटावकर
३. चिमड गावी चिमड मठाजवळ ज्या विहिरीत साधुमहाराजांची देव म्हणून स्थापना झाली, त्या विहिरीला तापनाशी हे नाव आहे.
४. या सर्व सद्गृहस्थांच्या प्रयत्नाने तुकारामांचे मंदिर उभे राहिले.
५. हे महाराज या समारंभात उपस्थित होते.
६. तुकाराममहाराजांची मूर्ती
७. यावेळी सौ. सीतावहिनींना धाप लागली होती.
८. आपखी पहा :– मी कोणाचेही वाईट केले नाही. मग मला देव का त्रास देत आहे. हे सौ. सीताबाई केळकर यांचे आयुष्यातील शेवटचे शब्द. (संपा पृ. १४–१५)
९. सौ. सीतावहिनींनी श्रीदादांचेकडून उपदेशानुग्रह घेतला असल्यामुळे श्रीदादा त्यांचे सद्गुरु होते.
१०. गुरुपुष्य योगावर सौ. सीतावहिनींचे निर्वाण झाले.
११. श्रीदादांची भार्या म्हणजे सौ. सीतावहिनीं
१२. सौ. सीतावहिनींच्या तळपायाचे ठसे श्रीपतराव घोंगडे यांनी कागदावर घेतले. हे ठसे जपून ठेवण्यात आले आहेत.
१३. सौ. सीतावहिनींचे परगावचे चिरंजीव यावयाचे असल्याने, निर्वाणानंतर सौ. सीतावहिनींचा



सहकारी अधिकारी यांचे । सत्कार्यी मन रमले ।।२ ।।
बोरगाव[५]कर महाराजांनी । शुभ चिंतन केले ।।३ ।।
सुमनहार हा वहाता तु[६]कया । नामी मन रंगले ।।४ ।।
दासराम हा वंदन करितो । तुक[६]याची पदकमळे ।।५ ।।

(फाल्गुन शुद्ध दशमी, गुरुपुष्यामृत योग, गुरुवार दि. २४–३–१९८३ रोजी श्रीदादांच्या पत्नी सौ. सीतावहिनी यांचे निर्वाण झाले. श्रीदादांना आपल्या पत्नीच्या कर्तबगारीचे कौतुक होते. सौ. सीतावहिनींच्या निर्वाणानंतर हे कौतुक पुढील प्रमाणे व्यक्त झालेले आहे :–)

भगवान् श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे कृपेतील माझ्या पत्नी सौ. सीताबाई केळकर यांनी नित्य नेमाने साधना आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत अक्षरशः साधली आणि फाल्गुन शुद्ध दशमीस, गुरुपुष्यामृत योगावर, माझे प.पू. पितृदेव श्रीमामा केळकर यांचे जयंतीस दुपारी १ ला दहा मिनिटे असताना, आपल्या आयुष्याचे सोने केले.

घरातील आणि येणाराजाणारांचे मनाप्रमाणे वागून, कोणालाही आपल्या आयुष्यात न दुखवता, सर्वांशी चांगले वागून भलेपणा मिळविला.

या केळकरांचे घरात त्यांनी किती कष्ट उपसले त्याला सीमा नाही. त्या एकट्या जे काही करीत होत्या, ते आता शंभरांचे हातूनही होणार नाही, ही अगदी सत्य स्थिती आहे. माझेसाठी तर त्यांनी काय काय केले हे शब्दाने सांगणे कठिण, आणि ते न सांगितलेलेच बरे. एवढे मात्र निश्चित अगदी हसत खेळत त्यांनी वीज चमकण्यास जेवढा वेळ लागेल, तेवढ्याच वेळात जगाचा निरोप घेऊन, त्या देवाघरी गेल्या.

''मी कोणाचेही वाईट केले नाही मग[७] मला देव का त्रास देत आहे,'' हेच सौ. वहिनींचे शेवटचे उद्गार आहेत.

मला अखेरचा नमस्कार[९] करण्यास (त्या) उठू लागल्या, पण त्यांना उठू दिले नाही. ''तुझा नमस्कार मला पोचला,''असे (मी त्यांना) सांगितले आणि कोणत्याही मायापाशात न गुरफटता त्या आपले बहिणीचे म्हणजे सौ. अंबुताई भावे यांचे मांडीवर डोके ठेवून स्वरूपाकार झाल्या, अमर झाल्या.

(नित्यपाठामृत, पृ. १७७)

E/Atmcrita maste setting 1 (31)

सौ. वैनींना त्यावेळी (अंतकाळी) श्वासोच्छ्वास करणेच कठीण झाले होते. देव त्यांना आपल्या स्वरूपात मिसळून घेत होता. ते दृश्य नुसते आठवले तरी अंतःकरण अगदी हेलावून जाते. (संपा, पृ. १५)

वीज लखलखून जावी येवढ्या अल्प काळातच सौ. वैनी फाल्गुन शुद्ध १०, शके १९९४, गुरुवार, इ.स. १९८३ रोजी स्वरूपाकार झाल्या आणि सर्वांत विशेष म्हणजे त्यांची साधना शेवटच्या दिवसापर्यंत त्यांनी साधली होती (संपा, पृ.१५)

(सौ. सीतावहिनींच्या निर्वाणानंतर फाल्गुन शुद्ध दशमी, गुरुवार, रामनवमी, शके १९०५ रोजी श्रीदादांना सौ. सीता वहिनींचे संदर्भात पुढील अभंग स्फुरला :-)

आजि सोनियाचा दिवस । घरी आले गुरु[१०]पुष्य ।।१ ।।
ठेवुनी सौभाग्य सुहटा । भा[११]र्या गेली आत्मपीठा ।।२ ।।
चरणठसे घेऊ[१२] म्हणती । पाच तास[१३] बरी होती ।।३ ।।
पाय कागदी धरूनी । नवल केले[१४] श्रीपतींनी ।।४ ।।
सकळा आश्चर्य वाटले । पाहुनी सौभाग्य[१२] पाऊले ।।५ ।।
गुरुलिंग जंगम नाथा । दासराम वंदी माथा ।।६ ।।

(श्रीदादांचे विवाहापूर्वी त्यांचे मातापिता त्यांची काळजी घेत. विवाहानंतर त्यांचे जोडीने सौ. सीतावहिनी श्रीदादांची काळजी घेत. आता सौ. वहिनींचे निर्वाणानंतर श्रीदादांची काळजी कोण घेते ? याचे उत्तर श्रीदादा असे देतात :-)

त्यांचेनंतर (सौ. सीतावहिनींचे नंतर) चि. चंद्रशेखर[१५], चि.सौ. रोहिणी, चि.अनिल व चि.सौ. अपर्णा यांनी माझी देवासारखी सेवा आजतागायत चालविली आहे. चि.सूर्यकांत आणि अनल हे दोघे परगावी असतात. तरी त्यांचेही मजवर लक्ष आहे. चि.सौ. सुनीता आणि चि.सौ. अर्चना यांनीही कधीही तसूभरही कसर केलेली नाही, हे मला येथे नमूद केल्याशिवाय राहवत नाही (निपा, पृ. १७८).

(श्रीदादांच्या पुत्रांनाही मुलेबाळे झाली. ते सर्व परमार्थी व्हावेत असे मागणे श्रीदादांनी मागितले आहे :-)



नातू आणि पणतू परमार्थी व्हावी । हेच असे जीवी माझ्या देवा ।।१ ।।
मागणे मागतो तुजला मी देवा । केशवा माधवा नारायणा ।।२ ।।
दासरामाचे हे ऐकोनी वचन । जाहले प्रसन्न पितृदेव ।।३ ।।
(दागा १८३७.१-३)

(श्रीदादा हे चिमड संप्रदायातले. चिमड संप्रदायातील संतांचे तत्वज्ञान आणि साधन हे एकदा श्रीदादांच्या मनात प्रगट झाले. ते त्यांनी तसेच अभंगात नोंदले व त्या अभंग समूहाला सांप्रदायबोध असे नाव दिले. हा सांप्रदायबोध गुरुवार दि. १२-७-१९८४ रोजी पुस्तकरूपाने प्रकाशित झाला.)

(श्रीदादांना निंबरगीकरमहाराजांचे विषयी अत्यंत आदर होता. इ.स. १९८५ मध्ये त्यांची शशतसांवत्सरिक पुण्यतिथि होती. ती साजरी करण्याचे एक अंग म्हणून श्रीदादांनी संतसहस्रनाम तयार करवून घेतले. मंगळवार दि. २-४-१९८५ रोजी, निंबरगीकर महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी, आपल्या घरी व अन्य ठिकाणी संतसहस्रनाम पठणाचा सामुदायिक कार्यक्रम पार पडला. त्या समयी श्रीदादांना जे पद स्फुरले ते असे :-)

सत् संतांचे सहस्रनाम । श्रीराम जयराम जय जय राम ।।१।।
प्रेरक श्रीनारायण नाम । श्रीराम जयराम जय जय राम ।।२ ।।
दा.[१६] वि. दावी सहस्रनाम । श्रीराम जयराम जय जय राम ।।३ ।।
मुकुंद[१७] सुचवी सहस्रनाम । श्रीराम जयराम जय जय राम ।। ४।।
केश[१८]व गाई नारायण नाम । श्रीराम जयराम जय जय राम ।। ५।।
अनु[१९]राधा श्रीधर[२०] करी काम । श्रीराम जयराम जय जय राम ।। ६।।
बापू[२१] समर्पी सहस्रनाम । श्रीराम जयराम जय जय राम ।। ७।।
......... देतो चंद्र[२२] विराम । श्रीराम जयराम जय जय राम ।। ८।।
सहस्र[२३]पठती सहस्रनाम । श्रीराम जयराम जय जय राम ।। ९।।
गुरु[२४]लिंग महावीर स्फुरवी नाम । श्रीराम जयराम जय जय राम ।।१० ।।
बेल तुळस फूल वहात राम[२५] । नारायण[२६]पदी दासराम ।।११।।

(संतसहस्रनाम पठणाचा कार्यक्म्रम झाल्यावर, १९८५ साली, श्री. बरगे यांनी श्रीदादांना शिरोळ नावाच्या गावी नेले. तेथे तेलीमहाराज नामसप्ताह सुरू करणार होते. त्यासाठी वीणा उभा करण्याचे वेळी श्रीदादा थोडे प्रास्ताविक बोलले. तेलीमहाराजांनी श्रीदादांना एक सुपारी प्रसाद म्हणून दिली. या प्रसंगाचे संदर्भात श्रीदादा नोंद करतात :-)

E/Atmcrita maste setting 1 (32)

ठीक आहे. पण आता वय वाढले असल्यामुळे पूर्वीप्रमाणे कीर्तने होत नाहीत.'' यावर मामा म्हणाले, ''रामजी[५], यापुढे तुझी कीर्तने पूर्वीप्रमाणे होतील.'' मी विचारले, ''चंद्रशेखरची[७] कीर्तने कशी होतील ?'' यावर मामा म्हणाले, ''रामजी, काळजी करू नकोस. चंद्रशेखरची कीर्तने तुझ्या सारखीच होतील.'' पुढे मामा म्हणाले, ''सौ. रोहिणी[८] इत्यादींना माझा आशीर्वाद सांग. भजन[९] स्पर्धेत रोहिणीला यश मिळेल.''(लेजर क्रमांक २,पृ.५७/अ-५८). (५) (दि. २३-८-१९९३) प.पू. गुरुवर्य [१०]दादामहाराज कोटणीस स्वप्नामध्ये आले आणि म्हणाले, ''तुमची प्रकृती पहाण्यासाठी आलो आहे. यापुढे तुमची कीर्तने चांगली होतील, असा माझा व भगवान् तात्यासाहेबमहाराज यांचा आशीर्वाद आहे. परंपरा पुढे चालू राहील अशी खात्री आहे.'' (लेजर क्रमांक २, पृ. २२९). (६) दि. ५-१-९५ आज संध्याकाळी नेमास बसलो असता, एकाएकी निर्विचार मनःस्थितीत नीलबिंदू [११] दिसला (लेजर क्रमांक ३, पृ.६५). (७) दि. २९-१-१९९५. आज सकाळी रविवारी आठ वाजता जवळच असलेल्या भगवान श्रीसद्गुरु दत्तप्रभूंचे[१२] दर्शनास गेलेवेळी त्यांचे पुढे एक पावली ठेवली. ती ठेवली मात्र ती स्वतः भगवंतांनी प्रगट होऊन आपल्या हाताने आपण होऊन स्वीकारली. (लेजर क्रमांक ३ पृ.३, ५). (८) याच रविवार दि. २९-१-१९९५ रोजी असे घडले :- ''शांती ब्रह्म पूर्ण ब्रह्म पूर्ण ब्रह्म तेजाचे'' ही एकच ओळ जवळजवळ दहा मिनिटे ऐकू येत होती. बहुधा प.पू. भगवान पूर्वज[१३] शांडिल्य ऋषींनी ही ओळ गुणगुणली असावी असे वाटते. बरे हे सारे स्वप्नात नसून प्रत्यक्षात घडले म्हणून नवल (लेजर क्रमांक ३ पृ. ५).

(इ.स. १९९५ साली श्रीदादांना पंचाहत्तरावे वर्ष लागत होते. यापूर्वी श्रीदादांचा एक अमृतमहोत्सव त्यांच्या सत्तराव्या वर्षी झाला होता. आता १९९५ साली पुनः एकदा श्रीदादांचा अमृतमहोत्सव साजरा करण्याचे ठरवून दि. २-५-१९९५ रोजी हा पंचाहत्तरीचा अमृतमहोत्सव संपन्न झाला. यावेळी रविवार दि. १-५-१९९५ रोजी श्रीदादांना पुढील अभंग[१४] स्फुरला :-)

पंचाहत्तरी कशासाठी । सांगा सांगा जी[१५] धूर्जटी ।।१।।
काय केले समाजकारण । काय केले राजकारण ।।२।।
दासराम म्हणे देवा । घडवून घ्यावी सेवा ।।३।।



देह पाच तास घरातच होता.

१४. श्रीपती धोंगडे हे श्रीदादांचे एक भक्त.

१५. चंद्रशेखर, सूर्यकांत, अनल आणि अनिल हे श्रीदादांचे चार सुपुत्र आणि सौ. रोहिणी, सौ. अपर्णा, सौ. सुनीता आणि सौ. अर्चना या श्रीदादांच्या चार सुना. आपले पिताजी मामा यांना उद्देशून असणाऱ्या एका अभंगात श्रीदादा म्हणतात :-

चंद्र सूर्य अनल अनिल तुमचे । पौत्र कीर्तनाचे प्रेम तया ।। दा.गा. ८२३.२

१६) प्रा.डॉ. दा. वि. कुलकर्णी यांनी सहस्रनाम रचले होते.

१७) मुकुंदराव सहस्रबुद्धे

१८) प्रा. डॉ. के. वा. आपटे

१९) प्रा.डॉ. सौ. अनुराधा कुलकर्णी या प्रा.डॉ. दा. वि. कुलकर्णी यांच्या पत्नी.

२०) श्रीधर सहस्रबुध्दे

२१) बापूसाहेब चाफळकर

२२) चंद्र म्हणजे चंद्रशेखर. हे श्रीदादांचे ज्येष्ठ चिरंजीव

२३) सहस्र म्हणजे सहस्रनामपठण करणारे सहस्र भक्त.

२४) गुरुलिंग जंगम उर्फ निंबरगीकर महाराज

२५) म्हणजे श्रीदादा उर्फ दासराम

२६) नारायण निंबरकीकरमहाराज

२७) शिरोळ गावातील नामसप्ताह

२८) निंबरगीकरमहाराजांच्या निर्वाण शताब्दीचे वर्ष १९८५

२९) बरगे यांनी स्पेशल मोटारीतून श्रीदादांना शिरोळला नेले होते.

३०) तात्या महाराज तेली हे शिरोळातील संत

३१) घेवारी हे तेलीमहाराजांचे भक्त

३२) संतमाता म्हयाजे येथे तेलीमहाराज

३३) हा लेख श्रीदासराममहाराज चरितामृत या ग्रंथात पृ. १८० - १८२ वर मुद्रित झालेला आहे.

B B B

E/Atmcrita maste setting 1 (33)

# ८. पंचाहत्तरी

**(१)**

(इ.स. १९८६ साली रामकृष्ण परमहंस यांची जन्मशताब्दी होती. ती श्रीदादांनी दिनांक १२-३-१९८६ रोजी साजरी केली. त्या निमित्ताने श्रीदादांचे मनात रामकृष्ण परमहंस यांचाच विचार येऊ लागला. अशा स्थितीत :-)

रविवार दि. ४-५-१९८६ रोजी आमचेकडे नित्य कीर्तनास येणाऱ्या, श्रीनिंबरगीकर महाराज यांचे कृपेतील, सौ. श्यामला कृष्णराव पटवर्धन यांचे जवळ अध्यात्म चर्चा चालू असतानाच, सहजपणे श्रीरामकृष्ण, विवेकानंद आणि भगिनी निवेदिता यांचा हृदयस्पर्शी असा विषय निघाला आणि त्यानंतर आश्चर्य असे :- मजसमोर सारखे रामकृष्णच उभे राहिले (सं. पा., पृ. ३). श्रीतात्यासाहेब व भगवान् श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे केवळ परम कृपेने रामकृष्ण समोर उभे राहिले. त्यांनी दोन्ही हात वर केले आणि आशिर्वाद दिला (सं. पा., पृ. ४). भगवान् रामकृष्ण उभे आहेत आणि त्यांनी दोन्ही हात वर केले आहेत. जणू ते आशीर्वाद देत आहेत असेच ते दृश्य होते (सं. पा., पृ. ३). त्यांचे ठायी मन जडून गेले (सं. पा., पृ. ४) आणि त्या अवस्थेत मला श्रीरामकृष्णांचेवर अभंग स्फुरू लागले. कीर्त[1]नाची वेळ झालेली,कीर्तनातच चि. यशवंत[2] आपटे यांस काही (अभंग) सांगत होतो, तो लिहीत होता. असे एक-दोन अभंग झाले. कीर्तनात आतून तीच एक धूम होती आणि[3] कीर्तन, रामपाठ, पंचपदी झाल्यावर, एका बैठकीतच पुढे अठरा अभंग लिहून झाले, खाणेपिणे हे भानही नव्हते. आतून एक आनंद होत होता. ते हे २६ अभंग आहेत[4]. हे जे अभंग मला स्फुरले किंवा ऐकू आले त्याची पावतीच रामकृष्णांनी दिली याचीही मौज वाटते (सं.पा., पृ. ३). भगवान श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज व भगवान रामकृष्ण परमहंस हे दोघे एकरूप आहेत अशी खात्री पटली (सं.पा., पृ. २).

(पुढें रामकृष्णांचा एक भक्त श्रीअम्मा श्रीदादांच्याकडे आल्या होत्या. श्रीदादा सांगतात :-)

आजच आमच्या येथे शनिवार दि. १०-१०-१९८७ रोजी, पौष शुद्ध ११, शके १९०८ रोजी, ... श्रीरामकृष्ण परमहंस (यांच्या) कृपांकित, देवतास्वरूप, चित्शक्ती अम्मा आल्या असता, मला रामकृष्णांचे दर्शन झाले



व दोन हात वर करून त्यांनी आशिर्वाद दिला. (सं.पा. पृ.१०)

(त्यानंतर श्रीमामांच्या जन्मशताब्दीचे वर्ष असल्याने, दि. १७-२-१९८८ रोजी सांगलीच्या दैनिक केसरी या वृत्तपत्राने ''कै.मामामहाराज केळकर जन्मशताब्दी महोत्सव '' या शीर्षकाखाली एक पुरवणी काढली. या पुरवणीत श्रीकांत देशपांडे या श्रीदादांच्या भक्ताने घेतलेली श्रीदादांची मुलाखत होती. या मुलाखतीतील मनोगतात नाम आणि नामस्मरण या विषयीचे श्रीदादांचे विचार व्यक्त झाले होते. हे विचार श्रीदासराममहाराज चरितामृत या ग्रंथात पृ. १९८-२०२ वर आलेले आहेत).

**(२)**

(श्रीदादांना वयाचे सातवे वर्षीच काव्यस्फूर्ति झाली होती. त्यांचे बरेच काव्य होते. त्यातील बरेचसे अप्रकाशित होते. उपलब्ध झालेल्या श्रीदादांच्या अभंगांचा ग्रंथ छापून घेण्याचे कार्य सौ. श्यामला पटवर्धन या श्रीदादांच्या अनुगृहीत शिष्येने केले. फाल्गुन शुद्ध दशमी, शके १९१०, शनिवार दि. २७-२-१९८८ रोजी दासरामगाथा प्रकाशित झाला. या संदर्भात श्रीदादा लिहीतात :-)

कीर्तनास नित्यनेमाने येणाऱ्या सौ. श्यामला कृष्णराव पटवर्धन, शिक्षिका, या श्रीमामांचे जन्मशताब्दीनिमित्त श्रीदासरामगाथा प्रकाशित करीत आहेत (दामच, पृ. २०२).

**(३)**

(गेल्या काही दिवसांपासून काही नोंदी श्रीदादा लेजर वहीत करीत होते. लेजर क्रमांक १-३ मध्ये त्यांच्या स्वतःविषयाच्या काही नोंदी आहेत. त्या अशा :-)

(१) गुरुवार दि. ३१-१२-१९९२ या दिवशी स्वप्नात श्रीसेनामहाराजांचे दर्शन झाले (लेजर क्रमांक १). (२) दि. १२-१-१९९३ या तात्यासाहेबमहाराज कोटणीसांच्या पुण्यतिथि दिवशी रामनिकेतनमध्ये प्रगट झालेले मारुतिराय दिसले (लेजर क्रमांक १). (३) जुलै १९९३ चे सुमाराम साधनाचे वेळी श्रीनिंबरगीकर महाराज प्रगट झाले. त्यांनी हाक मारली. त्यांच्या पायांवर डोके ठेवले. ''वंशपरंपरा कीर्तन चालावे, भक्ती चालावी, नामस्मरण चालावे'' असा वर मागितला. ''तथास्तु'' असे म्हणून निंबरगीकरमहाराज अदृश्य झाले (लेजर क्रमांक २). (४) शनिवार दि. १०-७-९३ रोजी पहाटे ४ वाजता स्वप्न पडले. स्वप्नात आई व मामा दिसले. ते दोघे म्हणाले, ''रामजी[5], तुझी प्रकृति[6] पहाण्यास आम्ही आलो आहोत.'' मी म्हटले, ''माझी प्रकृति

E/Atmcrita maste setting 1 (34)

## परिशिष्ट १

# स्वतःच्या लेखनाविषयी श्रीदादांचे निवेदन

(श्रीदादांचे काही लेखन त्यांना ज्ञानेश्वरमहाराजांनी स्फुरविले. उदा. चांगदेवपासष्टी एक नामकळा, अमृतानुभव मंगलाचरण. बरेच लेखन त्यांना तात्यासाहेब महाराजांनी स्फुरविले. उदा. निवृत्तिपाठ, श्रुतिपाठ. श्रीदादांचे असे काही लेखन आहे की ते त्यांनी करावे असे इतरांनी सुचविले. या उत्तरोक्त लेखनाबद्दल श्रीदादांचे निवेदन आता दिले आहे).

### (१) रामदासबोध

संतवचनांचे हृद्गद । बोले म्हणती रामानंद[१] ।। (दागा १७५९.१) (आणि मग) भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या परम कृपेने अगदी लहानपणी माझे हातून लिहिला गेलेला श्रीरामदासबोध (हा ग्रंथ आहे). (रामदासबोध, आशीर्वाद, पृष्ठ क्रमांक नाही). सद्गुरुंची करणी अगाध । म्हणोनी मम वाचे रामदासबोध । माझे वयाचे नववे वर्षी अगाध । सद्गुरुंनी प्रकटविला ।। (रादाबो, १३.१२)

### (२) साधनाचे[२] अभंग

रामानंद[१] महाराज बोधिती माते । करी अभंग साधनाचे ।। (दागा १३४०.१); साधनाचे अभंग करी । रामानंद[१] बोले कुसरी ।। राम सांगे तयाप्रती । असो आशीर्वाद प्रीती । हनुमंत सद्गुरुकृपे । घडे अशक्य अपापे ।। हनुमंत कृपावाणी बोल बोलिले वदनी ।। (दागा ६७५.१-४)

### (३) आत्मसिद्धांत[३] अभंग विवरण

आत्मसिद्धांत हा अभंग विवरी । बोलती कुसरी[१] रामानंद ।।१।। राम सांगे काय तया साधुप्रती । आशीर्वाद प्रीती असो माते ।।२।। हनुमंत सद्गुरु माऊलीचे कृपे । अशक्य अपापे सहज घडे ।।३।। हनुमंतराय कृपेची ही वाणी । बोलिला वदनी बोल बरा ।।४।। दासराम उभा दोनी कर जोडून । सद्गुरुवचन लेणे लेई ।।५।। (दागा १३२३.१-५).

### (४) श्रीज्ञानदेव तेहत्तिशीवरील सानंद टीका

इ.स. १९४३ साली श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांचे सांप्रदायिक शिष्य ह.भ.प. पांडुरंग महाराज ताम्हनकर यांनी, "तुम्ही कोणत्या तरी ग्रंथावर



श्रीमामांचा प्रसाद मेवा । थोडा तरी आम्हा द्यावा ।।४।।
श्रीमामांचे कीर्तन । दासरामा द्यावे आपण ।।५।।

(ले.३, पृ. १०३).

दि. २५-७-९७ या दिवशी देवासमोर ध्यान करीत असताना श्रीराममूर्तीच्या जागी प्रत्यक्ष महान स्वरूपात श्रीगणपती दिसला. हा सर्व महिमा केवळ महाराजांच्या कृपेचा आहे हे विसरून चालणार नाही.(लेजर ६, पृ. ८१).

दि. १९-८-९७. मला साधनात केवळ श्रीमहाराजांचे कृपेने नीलबिंदु[११] एकदा दिसला (लेजर ६, पृ. ८९).

### (४)

(श्रीदादांच्या नित्याच्या हरिकीर्तनाला माघ शुद्ध दशमी, इ.स. १९९८ रोजी छत्तीस वर्षे पूर्ण होत होती. त्यावेळी त्यांच्या कीर्तनाचा त्रितपमहोत्सव साजरा झाला. यावेळी श्रीदादांना आपल्या चिमड संप्रदायाची आरती स्फुरली ती अशी :-)

आरती सांप्रदाया[१६] । प्रेमभावे वंदूनिया ।
ओवाळीन संतराया । विनवोनी सदया ।।ध्रु।।
अगाध[१७] काडसिद्धा । शिवस्वरूप[१७] प्रसिद्धा ।
माया[१७] ही मर्दियेली । काय वानू महासिद्धा[१७] ।।१।।
जय जया[१८] नारायणा । जीवीचिया जीवना ।
साकार ब्रह्मतनू । गुरुलिंगा[१८] निधाना ।।२।।
लक्षुमी अका[१९] भली । आदिशक्ती शोभली ।
आहार निद्रा नाही । नामी रंगली माऊली ।।३।।
रघुनाथप्रिय[२०] साधू । गुरु आज्ञे करी बोधू ।
ब्रह्मचारी त्यागमूर्ती । थोर सामर्थ्य सिंधू ।।४।।
धन्य धन्य रामचंद्र[२१] । महाविष्णू अवतार ।
साधन सांप्रदाय । गुरुभक्ती बडिवार ।।५।।
नारायण[२२] गुरुपीठ । हनुमंत[२३] वरिष्ठ ।
गोविंदसुत रामी । नामावली[२४] चोखट ।।६।।

E/Atmcrita maste setting 1 (35)

**टीपा**

१. श्रीदादांच्या नित्य कीर्तनाची संध्याकाळची वेळ.
२. श्रीदादांच्या नित्य कीर्तनास जाणारा एक भक्त.
३. श्रीदादांचे नित्याचे कीर्तन झाल्यावर रामपाठ व पंचपदी म्हटली जाते.
४. रामकृष्ण परमहंसावर एकूण २६ अभंग श्रीदादांना स्फुरले. या अभंगांना श्रीदादांनी ''संजीवनपाठ'' असे नाव दिले. पुढे या अभंगाच्या गद्य अर्थासह हा संजीवनपाठ इ.स. १९८७ मध्ये प्रकाशित झाला.
५. श्रीदादांना ''रामजी'' असे त्यांची आई व वडिल म्हणत.
६. इ.स. १९९० पासून श्रीदादांची प्रकृति बरीच खालावली होती. ते व्यवहारात तसेच कीर्तनात फारसे बोलत नसत.
७. चंद्रशेखर हे श्रीदादांचे ज्येष्ठ चिरंजीव.
८. सौ. रोहिणी ही चंद्रशेखरची पत्नी आणि दादांची सून.
९. सौ. रोहिणीने सुरू केलेले भजनी मंडळ भजन स्पर्धेत भाग घेत असे.
१०. म्हणजे तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे चिरंजीव रघुनाथ हणमंत कोटणीस.
११. नीलबिंदु दर्शन म्हणजे निर्गुण परमात्म्याचे सिद्धांना होणारे दर्शन.
११. श्रीदादांच्या रामनिकेतनच्या उत्तरेस पुढील भागात बापटांचे दत्तमंदिर आहे.
१३. श्रीदादांचे गोत्र शांडिल्य. शांडिल्य हे या गोत्राचे प्रवर्तक.
१४. या अभंगाचे लेखनात थोडा फरक असा आहे :– पहिला चरण ध्रुवपद म्हटला आहे.

काय केले राजकारण । काय केले समाजकारण ।।१।।
आहो पांडुरंगा । मला याचे कारण सांगा ।।२।।

असा अर्धवट अभंग, लेजर क्रमांक ३ पृ. ९५ वर आहे. तर अन्य ठिकाणी ''पंचाहत्तरी कशासाठी । सांगा सांगा धूर्जटी ।।'' असा जी नसणारा चरण आहे.

१५. भगवान् शंकर.
१६. चिमड सांप्रदाय.
१७. काडसिद्ध हे निंबरगीकरमहाराजांचे गुरु. ते शंकरस्वरूप मानले जातात. त्यांनी करवीर क्षेत्री मायेचे मर्दन केले अशी आख्यायिका आहे. ते महासिद्ध होते.
१८. नारायणराव निंबरगीकरमहाराज उर्फ गुरुलिंगजंगमस्वामी.
१९. लक्ष्मीबाई अक्का या निंबरगीकरमहाराजांच्या परमाधिकारसंपन्न शिष्या.
२०. रघुनाथप्रिय साधुमहाराज हे निंबरगीकर महाराजांचे पट्टशिष्य.
२१. रामचंद्रमहाराज यरगट्टीकर उर्फ चिमड महाराज.
२२. नारायणमहाराज यरगट्टीकर हे चिमड महाराजांचे चिरंजीव.
२३. हनुमंत पांडुरंग उर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस.
२४. इ.स. २००० मध्ये श्रीदादांना ८० वे वर्ष लागले. त्यांचा सहस्रचंद्रदर्शन सोहळा साजरा करण्यात आला. त्यानंतर त्यांची प्रकृति खालावत गेली. इ.स. २००१ च्या श्रावण महिन्यातील बुधवार दि. २५-७-२००१, पंचमीयुक्त षष्ठी या दिवशी संध्याकाळी ७-४० चे सुमारास, कीर्तनाचा ध्यास घेत, श्रीदादांची जीवनज्योती अत्यंत शांतपणे परमात्मज्योतीत मिळून गेली.



B B B

E/Atmcrita maste setting 1 (36)

नाही. सारे काही त्या देवस्वरूप महात्म्यांचे (सातु, पृ.२८)

**टीपा**

१. चौदा दिवसांचा बालराम

२. कथा म्हणजे हरिकीर्तन

B B B



टीका लिहा'' असे प्रस्तुत लेखकास सहज सुचविले व त्यामुळेच श्रीज्ञानदेवतेहत्तीशी या छोट्या ग्रंथावर टीका लिहिण्याची प्रस्तुत लेखकास कल्पना आली

(ज्ञानते निवेदन, पृ. २)

### (५) श्रीज्ञानदेव मुद्राप्रकाश

मराठी साहित्य संशोधन । पत्रिका[४] केशवे आणून । मुद्राक्रम दाखवून निवेदिले मज ।।३४।। यावरी टीका लिहावी । म्हणोनिया ग्रंथ गौरवी । मला वाटले ती पहावी । प्रकरणे ।। केशवामुळे[४] घडली सेवा ।। (श्रीज्ञानदेव मुद्राप्रकाश, हृद्गद), केशवा[४]चिया बोली । सहज सेवा घडो आली । चित्तवृत्ती आकळिली । मुद्राक्रमाने ।। (ज्ञामुप, ५.२६, पृ.१९)

### (६) श्री ज्ञानेश्वरी चिंतन स्तोत्र आणि श्री ज्ञानेश्वरी नामसंकीर्तन स्तोत्र

ज्ञानेश्वरीचे चिंतन सतत रहावे याकरिता परमप्रिय श्री. किसनराव भिडे यांनी सुचविल्यानुसार,श्री ज्ञानेश्वरीतील काही ओव्यांचे संकलन करून, भावार्थांसह दिले आहे, ''त्यास श्री ज्ञानेश्वरी चिंतन स्तोत्र'' असे नामाभिधान केले आहे. तसेच श्री ज्ञानेश्वरीतील कीर्तनावरील ओव्यांचे संकलन करून ''श्री ज्ञानेश्वरी नाम संकीर्तनस्तोत्र'' (भावार्थासह) या पुस्तकात दिले आहे. (ज्ञाचिंस्तो, पृ.४)

**टीपा**

१. रामानंदमहाराज खटावकर.

२. साधनाचे अभंग दासरामगाथा ग्रंथात पृ. ३६९-३७२ वर आहेत.

३. आत्मसिद्धांत या नावाचा अभंग उपलब्ध नाही. ''अभंगात आत्मसिद्धांत सांग'' असा अर्थ असावा. पण हे अभंग कोणते हे कळत नाही. बहुधा दासराम गाथ्यात ''आत्मसुधा'' या शीर्षका खालील, पृ. १४७-१५४ वरील अभंग असावेत.

४. प्रा.डॉ. केशव वामन आपटे.

B B B

E/Atmcrita maste setting 1 (37)

## परिशिष्ट २

# श्रीदादांना कीर्तनाचा आशीर्वाद आणि कुळात आलेली कीर्तन परंपरा

### (अ)

(कुरुंदवाड गावी श्रीदादांना चौदावे दिवशी अनुग्रह दिल्यानंतर तात्यासाहेब कोटणीस महाराज म्हणाले की हा राम बालपणापासून कीर्तन करू लागेल. या गोष्टीचा स्पष्ट आणि अस्पष्ट असा निर्देश श्रीदादांच्या लिखाणात सापडतो. ही स्थळे अशी :-)

### स्पष्ट निर्देश

(१) भगवान् श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराज यांच्या अमृत कृपाहस्ताच्या सामर्थ्यामुळे अगदी लहानपणापासून कीर्तन होऊ लागले. (सातु, पृ.२८). (२) ''हा अगदी लहानपणापासून कीर्तन करू लागेल'' असा कृपाशीर्वाद दिला. (सातु,पृ. २८). (३) हनुमंत सद्गुरुरायांचे वचन । करील कीर्तन बालराम ।। (दागा ६७६.५). (४) हनुमंतराय बोलिले वचन । करील कीर्तन बालराम ।। (दागा ६५३.१). (५) हनुमंत सद्गुरु संतोषले कृपाघन । बोलिले वचन बालराम करील कीर्तन ।। (दागा ६५५.३). (६) हनुमंत सद्गुरु बोलिले वचन । करील कीर्तन बालराम ।। (दागा ६६७.३, ६८६.४).

### अस्पष्ट निर्देश

(१) हरिकीर्तनाचे ओपिले हृद्गद । होवोनि सद्गद निजकृपे ।। (दागा ६६५.५). (५) अजाण लेकरू[१] अज्ञान पामरू । कथेचा[२] बडिवारू[३] संती दिला।। (दागा ६६७.२). (३) तुम्ही संत[३] दयाघन । दिला कीर्तनाचा मान ।। (दागा ६६०.३). (४) तुम्हा संतांचे[३] वचन । केली आज्ञा ते प्रमाण । म्हणोनी कीर्तन । सभारंगी करीतसे ।। (दागा ६८९.२). (५) कीर्तन करतो तव आज्ञेने । लेकरू दीन भोळा ।। (दागा ६९८.२). (६) जाणेनिया अंतरभावा । आम्हा दिली कीर्तन सेवा ।। (दागा ६६१.२). (७) महाराजांची[३] आम्ही लेकुरे । नाचू कीर्तनी बडिवारे ।। (दागा ६६१.१). (८) सेवा करू हे कीर्तन । (दागा६६०.१).



### (आ)

(तात्यासाहेब कोटणीस महाराजांनी श्रीदादांचे पिताजी मामा यांना नित्य कीर्तन करण्याची आज्ञा दिली. ''ही जी कोटणीस महाराजांनी आज्ञा दिली तिचा अर्थ असा की यापुढे केळकर कुळात नित्य कीर्तन करण्याची परंपरा आली,'' अशी मामांची धारणा होती. म्हणून श्रीदादांनी कीर्तन करावे असे मामा सांगत. अशीच धारणा श्रीदादांचीही होती. म्हणूनच त्यांनी आपले चिरंजीव चंद्रशेखर यांना नित्य कीर्तन करण्याची आज्ञा दिली.

कोटणीस महाराजांनी आपल्या कुळाला कीर्तन परंपरा दिली अशी जी दादांची धारणा होती ती त्यांच्या लेखनात विविध प्रकारे पुढीलप्रमाणे प्रकट झाली आहे.)

(१) हनुमंत भगवान आज्ञापिती आपण । ते हे हरिकीर्तन आमुचे वंशी ।। (वही क्रमांक १०३). (२) कीर्तनाची परंपरा । आली घरा माझिया ।।१ ।। ते हे सद्गुरु हनुमंत । स्वये देत गोविंदा ।।२ ।। (दागा ६५४.१-२; ६५९.१-२). (३) कीर्तनाची परंपरा । आली घरा दासरामी ।। (दागा १५५४.४).

(म्हणून श्रीदादा कीर्तनाचे वतन, मिराशी असे शब्द वापरून हीच गोष्ट अशी सांगतातः-)

(१) हरिभक्त कीर्तनकार । धन्य आम्ही केळकर ।। (दागा ६८५.१); गुरु आज्ञेचे कीर्तन । ब्रह्मानंदाचे वतन ।। (दागा ६८५.४). (२) दिली परंपरा नाम संकीर्तन । जुनाट वतन साधुसंती ।। (दागा १३८५.३). (३) हरीभक्तीचे वतन । करितो सुखाने कीर्तन ।। (दागा ६९३.१). (४) दासरामा ऐसे लाभले वतन । (वही १०३). (५) हरिकीर्तन हे आमुची मिरासी । (वही १०३). (६) हरिकीर्तन हे आम्हांसी साधन । दिलेसे वतन भोगवटा ।। (वही १२२).

(मामांचे नंतर आपले नित्य कीर्तन कसे चालू आहे या संदर्भात श्रीदादा सांगतात :-)

माझ्या पितृदेवांनी त्यांची अखेरची इच्छा म्हणून, ''रामजी तू पाच मिनिटे का होईना नित्यनेमाने कीर्तन करीत जा'' असे सांगितले. तेव्हापासून त्यांच्याच कृपेने हे अखंड कीर्तन चालले आहे. (सातु, पृ.२८)

''मी कीर्तन करतो'' ही भावना माझ्या मनात अद्यापि नाही. चालले आहे ते आमच्या श्रीमामांचे, श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे, माझे काहीही

E/Atmcrita maste setting 1 (38)

धन्य ते सद्‌गुरु हनुमंत सिद्ध । जेणे ब्रह्मानंद प्रगट केला ।। (दागा ६६५.८)

(श्रीदादांच्या मते :- )

श्रीमारुतिरायांचा अवतार श्रीतात्यासाहेब होते (निपा, पृ.९८). तात्यासाहेब महाराज म्हणजे प्रत्यक्ष मारुतीचा अवतार असे ब्रह्मचैतन्य महाराज म्हणत असत (सातु, पृ.९).

(अशा थोर सद्‌गरूंजवळ श्रीदादांनी जे मागणे मागितले ते असे :-)

अनंत अपराधी मी द्वारा । आलो असे गुरुदातारा ।।१।।
पतित पावन आपण । मी तो दुर्बलचि जाण ।।२।।
आपण उदार अति थोर । अनंत वैभव भांडार ।।३।।
म्हणोनी ह्या पदरी भक्ता । धन्य धन्य हनुमंता ।।४।।
बालक रामासी हनुमंता । तुम्ही दर्शन द्यावे आता ।।५।।

(दागा ६७१.१-५)

(आ)

(तात्यासाहेब कोटणीस महाराजांनी श्रीदादांना केलेल्या अनुग्रहाचे दृढीकरण तात्यासाहेबमहाराजांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ चिरंजीव रघुनाथ हणमंत उर्फ बाबूरावजी कोटणीस यांनी केले. म्हणून श्रीदादा त्यांनाही गुरुस्थानी मानीत. त्यांच्याबद्दल श्रीदादा सांगतात :-)

१) धन्य रघुनाथ । गुरुपुत्र आणि भक्त ।।१।। पहाता भाग्यवंत । पिता जया हनुमंत ।। (दागा ७८२.१-२). २) हनुमंतराय उदार उदार ।। धन्य रघुनाथा परमार्थ दिला । सारिखाची केला आपुलिया ।। (दागा ७३६.१-२). ३)रघुनाथराया गोविंद पितया[१] । केली कृपा छाया हनुमंते ।।२।। दिली परंपरा नामसंकीर्तन ।। (दागा १३८५.२-३).४) जय रघुनाथा गुरु रघुनाथा । नमितो तव कीर्तनी तुला ।।ध्रु।। निशिदिनी रमसी कीर्तनरंगी उधळुनी देसी रंगाला ।। (दागा ७३५, ध्रुवपद १)

(रघुनाथांनी श्रीदादांच्या साधनबोधाचे दृढीकरण केले :-)

साधन चालिले कैसे ते रघुनाथे । मजलागी निरुते सांगितले ।।(दागा ५६९.२); रघुनाथ भक्त थोर । करिती कीर्तन गजर । ठेविला कृपा कर ।



३. येथील संत म्हणजे तात्यासाहेबमहाराज कोटणीस.

### परिशिष्ट ३

## गुरु गौरव

(श्रीदादांना आपल्या वयाच्या चौदाव्या दिवशी तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांनी दृष्टिद्वारा अनुग्रह केला. त्याचे दृढीकरण पुढे रघुनाथ हणमंत कोटणीस यांनी केले दोघांबद्दलही श्रीदादांना आदर असल्याने, त्यांनी त्या दोघांचाही गौरव आपल्या लेखनात केला आहे. त्यांनी तात्यासाहेब महाराजांचे चरित्रही स्वतंत्रपणे लिहिले आहे.)

(अ)

(१) धन्य हनुमंत[१] सद्‌गुरु । कृपावंत परमेश्वरू ।।(दागा ७७४.१). (२) नमो धन्य धन्य संत गुरु हनुमंत ।। (दागा ७६३.१). (३) हनुमंत सद्‌गुरु देव । त्यांनी दिधली निज ठेव ।। (दागा १७५९.३). (४) धन्य हनुमंत सद्‌गुरु दातार । सखा रघुवीर त्यांचा झाला ।।(दागा १२३७.१). (५) दासराम हनुमंत सद्‌गुरूंचा । बोले त्याची वाचा रघुपती ।। (दागा ६८३.१३; ६६७.८). (६) संतराज श्रीसद्‌गुरूहनुमंता । अखंड चरणी ठेवितो माथा । कृपाशीर्वाद चित्ता । लाधलासे ।। (सा.च.क., १.४२). (७) कल्पतरू चिंतामणि । परीस कामधेनू जाणी । तात्यासाहेबमहाराज संतमणी । मजलागी जाहले ।। (आबोप्र, ५३).

(आ)

(तात्यासाहेबमहाराज मुधोळ गावी असताना त्यांना रामचंद्र महाराज यरगट्टीकर उर्फ चिमड महाराज यांचा कृपानुग्रह लाभला)

(१)

(१) हनुमंतराय सिद्ध थोर । सद्‌गुरु ज्यांचे रामचंद्र । गुरु आज्ञे परमार्थ विस्तार । केला असे सांगलीसी ।। (सिकसा ८.१८). (२) गुरु रामाचे लागले पिसे । धन्य धन्य ।। (सिकसा, ३.२०).

(२)

(मुधोळात असताना कोटणीसमहाराजांनी चिमडमहाराजांना आपल्या घरी भोजनास बोलाविले. त्यावेळी असे घडले :-)

भगवान सद्‌गुरुराय हनुमंत । परम रामभक्त धन्य धन्य ।।१।।
मुधोळामाझारी रामराय सद्‌गुरू । परम आदरु भेटियेले ।।२।।

E/Atmcrita maste setting 1 (39)

भोजनासी यावे ऐसी तळमळ । जाणे दीनदयाळ आत्माराम ।।३।।
शिष्याचिये घरी भोजना सत्वरी । राम[१]राय निर्धारी आले प्रेमे ।।४।।
भोजन झालिया महिन्याचा पगार । महाराजा[२] सत्वर अर्पिलासे ।।५।।
सर्वस्व अर्पिले सिद्ध[२]पुरुषासी । जाणिली हे ऐसी निष्ठा गुरूंनी ।।६।।
बावीस रुपये पगार[३] दिधला । विचार न केला चरितार्थाचा ।।७।।
रामचंद्रराये हनुमंतालागून । दिले रुपये दोन अविनाशी ।।८।।
साधु[४]महाराजांचा दिलासे प्रसाद । पूर्ण कृपाशीर्वाद बोलियेले ।।९।।
प्रपंच परमार्थ साधेल संपूर्ण । होसी कीर्तिमान दिगंतरी ।।१०।।
सद्गुरुवचन झाले परिपूर्ण । स्वये हनुमान रामरूप ।।११।।
भगवंत राम हनुमंत राम । तिथे दासराम जडला असे ।।१२।।
(दागा १२६६.१-१२)

(३)

(कोटणीस महाराज सांगलीत रहात असताना)

आमचे भगवान् श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराज यांचेवर कोणी(तरी) विषप्रयोग केला. पण श्री चिमडचे महाराजांचे कृपेने त्यातून श्रीतात्यासाहेब हे पूर्णपणे निभावले (निपा, पृ. १६२)

(४)

(आणखी असेः-)

आमचे श्रीतात्यासाहेबमहाराज हे देव वकिल होते. त्यांची वकिली भगवंतानेच केली हे निर्विवाद आहे. श्रीतात्यासाहेबांनी संसाराला लक्ष रुपये मिळविले असतील पण त्यांनी आपल्या आत्मस्वरूपावरचे लक्ष क्षणभरही ढळू दिले नाही. हे एक ध्यानात घेणेसारखे आहे (निपा, पृ.१०५).

(अशाप्रकारे-)

धन्य संतराज सद्गुरु हनुमंत । प्रपंची पूर्ण केला परमार्थ ।।
(सिकसा, ३.१७).

श्रीतात्यासाहेबमहाराज श्रीचिमडचे महाराजांचे आज्ञेने अनुग्रह देत. पण हा अनुग्रह साधु[४]महाराजांचा आहे, आपले करवी तेच सर्व काही करीत आहेत,



अशीच तात्यासाहेबांची धारणा होती (निपा, पृ.४३)

(५)

(चिमड महाराजांच्या आज्ञेनुसार तात्यासाहेब नित्य कीर्तन करीत :-)

गुरु आज्ञे छत्तीस वर्षे । कीर्तनी रंगले अमृतरसे ।। (सिकसा, ३.२०)

चिमड संप्रदायाचे कळस भगवान् सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांनी सांगलीस अखंड साधनेबरोबर अखंड कीर्तन करून, हा निर[५]पवाद धर्म जगापुढे आदर्श म्हणून ठेवला आहे. (संसना, मनोगत, पृ. बारा). श्रीतात्यासाहेब महाराज यांचेकडे गुरुदेव रानडेसाहेबांचेसारखे फार थोर तत्वज्ञ येत असत व त्यांना आमचे श्रीतात्यासाहेब हे 'One God, One Law and One Element' हे तत्त्व पुनः पुन्हा प्रतिपादन करून सांगत, याचे त्यांना फार मोठे आश्चर्य वाटे. सांगली विलिंग्डन कॉलेज[६]मध्ये ते प्राध्यापक असताना त्यांनी श्रीतात्यासाहेबांचे कीर्तनाचा लाभ बरेच वेळा प्रत्यक्ष हजर राहून घेतल्याचे, त्यांनीच "कैवल्य[७]वैभवा" चे प्रस्तावनेत नमूद केले आहे. (संसना, मनोगत, पृष्ठ तेरा).

(एकदा तात्यासाहेब महाराज उत्सव काळात चिमड मठात कीर्तन करीत होते. त्यावेळी त्यांना रेवणसिद्धांचे दर्शन झाले. श्रीदादा सांगतात :-)

कीर्तनी रेवणसिद्ध समर्थ । प्रगटले ।। (सिकसा, ३.१७)

(६)

(हनुमंत सद्गुरु यांचे कृपेने आपले बरेच लेखन झाले आहे असे श्रीदादांनी वरचेवर नोंदवून ठेवले आहे. ते म्हणतात :-)

गुरु हृदयी प्रगटले । ज्ञानी ज्ञान जागृत केले ।।१।।
मजकरवी ते बोलविले । जे का न मिळेचि मोले ।।२।।
माझी काय ती योग्यता । त्यांनी बोलविले[८] तत्त्वता ।।३।।
(दागा ६७.१-३)

(असे सद्गुरु हनुमंत हे - )

दास म्हणे जगी हनुमंत थोर । शांतीचे सागर नाम गाती ।। (दागा ५३३.११); रामभक्त हनुमंत । धन्य संत तिही लोकी ।। (दागा १५५४.१);

E/Atmcrita maste setting 1 (40)

खणताना पाणी लागले, त्या पाण्याभोवती विहिर बांधून[६] विहिरीचे मध्ये देवालय बांधण्यात आले)

साधुमहाराजांचे देवालयाचा खर्चही खुद्द निंबरगीकर महाराजांनी केल्याचा कागद आज चिमड मठात उपलब्ध आहे (निपा, पृ.९७)

(४)

(दिवाळीतील साधुमहाराजांचा उत्सव निंबरगीकर महाराजांनी सुरू केला)

गुरुद्वादशी ते पांडवपंचमी असा एक भक्तिसोहळा निंबरगीकर महाराज यांनी (चिमड) या पवित्र स्थानी सुरू केला (निपा, पृ. ९७)

श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचा पांडवपंचमीचा रथोत्सव (निंबरगीकर महाराजांनी) सुरू केला व साधुमहाराज यांचे रथोत्सवास आपण असेपर्यंत (निंबरगीकर महाराज) उपस्थित राहिले (संसना, मनोगत, पृष्ठ दहा ते अकरा)

(आणखी असे :- साधुमहाराजांच्या निर्वाण दिनी त्यांची आराधना करण्याची पद्धत निंबरगीकर महाराजांनी सुरू केली. दादा सांगतात :-)

शके अठराशे चार, पाच आणि सहा अशी तीन वर्षे श्रीसाधुमहाराज यांचे आराधनेस निंबरगीकर महाराज येत होते. आराधनेचे[७] हे अभंग निंबरगीकर महाराज यांनी चिमड महाराजांना दिले (निपा, पृ.९७)

(५)

देह ठेवण्यापूर्वी (निंबरगीकर महाराजांनी) चिमड येथील तापनाशी[६] तीर्थाचे पाणी एका तत्राणीमधून आणणेस गुरुसिद्धप्पा जाड या नावाचे शिष्यास पाठवून, ते तीर्थ आपण प्राशन करून, सूर्यप्रकाशाइतके त्या चिमड येथील तीर्थाचे महत्त्व जगाला दाखवून दिले. (संसना, मनोगत, पृष्ठ दहा).

"माझा जीव चिमड येथे राहील"असे पूर्ण आश्वासन (निंबरगीकर महाराजांनी) दिले (संसना, मनोगत, पृष्ठ १०).

(असे चिमड हे क्षेत्र व तापनाशी तीर्थ महत्त्वाचे असल्याने, श्रीदादा[७] म्हणतात :-)

चिमड ते क्षेत्र करीते पुनीत । जेथे विराजीत साधुराय ।। (दागा ११२६.१)



दीनाचिये मस्तकी ।। (दागा ६८४.११); सद्गुरुपदस्थ धन्य रघुनाथ । गुरुपदी शोभत सकळाते ।। (दागा ७५५.१).

(आनंद देणारे असे रघुनाथ धन्य आहेत, असे श्रीदादा म्हणतात :-)

धन्य रघुनाथ गोविंद[९] । दिला आनंदी आनंद ।। (दागा ६५७.४)

**टीपा**

१. हणमंत पांडुरंग कोटणीस महाराज हे मूळ मुधोळ गावचे. पुढे तेरदाळ, बेळगांव येथे वास्तव्य करीत, ते सांगलीत येऊन स्थायिक झाले. त्यांचा वकिली हा व्यवसाय होता. त्यांनी प्रपंचात राहूनच परमार्थाचे परमोच्च पद गाठले. दररोज रात्री नित्य हरिकीर्तन करून त्यांनी परमार्थाचा प्रचार केला.
२. राम, रामचंद्र म्हणजे रामचंद्रमहाराज यरगट्टीकर उर्फ चिमड महाराज.
३. मुधोळ सरकारच्या नोकरीत त्यावेळी कोटणीस महाराजांचा असणारा पगार.
४. साधुमहाराज म्हणजे चिमडमहाराजांचे गुरु रघुनाथप्रिय साधुमहाराज.
५. म्हणजे निंबरगीकरमहाराजांनी सांगितलेला धर्म.
६. गुरुदेव रानडे काही काळ सांगलीतील विलिंग्डन कॉलेजमध्ये तत्त्वज्ञान या विषयाचे प्राध्यापक होते.
७. कैवल्यवैभव हा कोटणीसांनी प्रसिद्ध केलेला ग्रंथ आहे.
८. आणखी पहा :- दागा ११२७, ११९३, १२२०, १२३९, १२५६, १२९६, १४१४, १४५७, १४९३, १५९२, १६५०, १७२२, १७७२, १८०३ इत्यादि अभंग.
९. गोविंद हे श्रीदादांच्या पिताजींचे नांव.

B B B

E/Atmcrita maste setting 1 (41)

### परिशिष्ट ४

# चिमड संप्रदाय, परंपरा आणि चिमड हे देवस्थान आणि उत्सव

(अ)

(श्रीदादा हे चिमड संप्रदायातले श्रेष्ठ संत होते. चिमड संप्रदायाचे मूळ भगवान् शंकरापर्यंत जाते, तसा निर्देश श्रीदादा करतात. भगवान् शिवापासून – सोमेश्वरापासून – रेवणसिद्ध झाले. म्हणून कधी रेवणसिद्धांपासून संप्रदाय सुरू झाला आहे असे श्रीदादांनी म्हटले आहे. रेवणसिद्धांचे शिष्य मरुळसिद्ध व मरुळसिद्धांचे शिष्य काडसिद्ध. या काडसिद्धापासून परंपरा सुरू झाली असेही श्रीदादांनी कथन केले आहे. काडसिद्धांचे शिष्य निंबरगीकरमहाराज. निंबरगीकरमहाराजांपासून चिमड संप्रदायाची परंपरा सुरू झाली असेही श्रीदादा सांगतात.)

(१) आमचा चिमड संप्रदाय हा स्वरूप सांप्रदाय आहे (सातु, पृ.२९). (या संप्रदायाची परंपरा ) शिवापासोनिया आली परंपरा । (दागा १४५५.८).

(२) (चिमड संप्रदाय हा) रेवणसिद्धापासून सुरू झाला (सातु, पृ.२९). शिवपिंडी पासुनिया रेवणसिद्ध जाहले (दागा ७४५.१)/(आणि मग) रेवणसिद्धांनी उभारोनी हात दावियेला पंथ स्वरूपाचा ।। (दागा १५८३.१), [१]परंपरा आली तेथोनिया निकी । (दागा १५८३.२).

(त्यानंतर) रेवणांचे करस्थळी मरुळसिद्ध जन्मले (दागा ७४६.१);
मरुळसिद्ध करस्थळी काडसिद्ध जन्मले । (दागा ७४७.१)

(३) ऐका गुरु परंपरा ऐका गुरु परंपरा ।। आदिपीठ काडसिद्ध ते ।।
(७५१.१-२)

(४) (काडसिद्ध यांनी निंबरगीकरमहाराजांचे घरी जाऊन त्यांना अनुग्रह दिला :-)
ना[१]रायणा भेटी देई ।। (दागा ७४९.१). तयांचे (= काडसिद्धांचे) शिष्य निंबरगीकर । तयांचे शिष्य[२] साधुमहाराज । तयांचे शिष्य रामभाऊ महाराज । तयांचे शिष्य हनुमंतराज ।। (दागा ७५१.३-६)

(संक्षेपाने सांगायचे झाल्यास :- प्रथम शंकर, मग रेवण्यसिध्द, नंतर)
मरुळसिद्ध, काडसिद्ध आणि आमचे निंबरगीचे महाराज की ज्यांनीया



चिमड सांप्रदायाची चिमड येथे मुहूर्तमेढ रोवली. पुढे रघुनाथप्रिय साधुमहाराज, चिमडचे रामभाऊमहाराज, तात्यासाहेबमहाराजानंतर आमचे श्रीमामा[३] अशी परंपरा आहे (सातु, पृ.२९).

(आ)

(रघुनाथप्रिय साधु महाराज यांचे निर्वाणापूर्वी आणि चिमड मठ होण्यापूर्वीच चिमड येथे निंबरगीकर महाराजांनी)

काही वर्षापूर्वी रुईचे बी पेरून व कापूर लावून, "या जागेत तुला आणि रामभाऊला[४] पुढे राहावयाचे आहे," अशी आपली भविष्यवाणी आपल्या अधिकारी शिष्या श्रीलक्ष्मीबाई अक्कांचे जवळ प्रकट केली (होती) (संसना, मनोगत, पृष्ठ दहा).

(त्यानंतर) श्रीनिंबरगीकर महाराज यांनी या (चिमड संप्रदायाच्या) भक्तिमार्गाची मुहूर्तमेढ चिमड येथे श्रीरामचंद्रावजी[४] महाराज यांचे हस्ते उभी करून, आपण त्याला खतपाणी केले. आपल्या कृपाकटाक्षाखालीच (त्यांनी) हा (चिमड) संप्रदाय सुरू केला व तो "गुप्त रीतीने चालवावा" अशी प्रेमळ सूचनाही दिली आणि ती श्री चिमडचे[४] महाराज यांनी तंतोतंत[५] पाळली हे खरे विशेष आहे ( निपा, पृ.९७)

( ३ )

(निंबरगीकर महाराजांचे शिष्य रघुनाथप्रिय साधुमहाराज; साधुमहाराजांचे शिष्य चिमडमहाराज. साधुमहाराजांचे निर्वाणानंतर चिमडमहाराजांनी साधुमहाराजांचे देवालय चिमडला बांधण्याचे ठरविले. त्यात साधुमहाराजांची देव म्हणून स्थापना झाली. हा सर्व भाग श्रीदादा असा सांगतात :-)

चिमड सांप्रदायाची स्थापना श्रीक्षेत्र चिमड येथे करून आपले देखरेखीखालीच श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज या सत्शिष्यांनी देह ठेवल्यावर,

श्रीरामचंद्रावजी महाराज यरगट्टीकर यांचेकडून स्थापन करून, (निंबरगीकर महाराजांनी) साधुमहाराज यांना देव करून बसविले. (संसना, मनोगत, पृष्ठ दहा).

(चिमड महाराजांनी साधुमहाराजाचे देवालय बांधण्याचे ठरविले. त्यासाठी पाया

E/Atmcrita maste setting 1 (42)

योग्यता होती. (तत्रैव, पृष्ठ अकरा).

(निंबरगीकर महाराजांची योग्यता सांगण्यास शब्द अपुरे आहेत, असे श्रीदादा म्हणतात :-)

''आंग आंगाते वरी । पवनाते पवन धरी । ऐसी अनुभवाची उजरी । होचि लागे'' ही ज्या महात्म्यांची प्रचीति होती, आणि असे प्रचीतीचे पुरुष ज्या महात्म्याने निर्माण केले, त्यांची थोरवी कोणत्या शब्दांत वर्णन करता येईल ? (संसना, मनोगत, पृष्ठ अकरा)

## (२) महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का

(लक्ष्मीबाई अक्का या निंबरगीकरमहाराजांच्या शिष्या. निंबरगीकरमहाराजांचे निर्याणानंतर त्या चिमडास रहाण्यास आल्या. चिमडमहाराजांचे निर्याणानंतर त्यांनी आपल्या निर्वाणापर्यंत चिमड संप्रदायाची धुरा सांभाळली. त्यांची माहिती श्रीदादांनी सिद्धकथामृतसार या ग्रंथात दिली आहे. श्रीदादा सांगतात :-)

महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का, चित्शक्तीचे सगुण रूप (मलअ पृ.४). श्रीलक्ष्मीबाई अक्का या साक्षात चित्शक्तीच भूलोकी अवतीर्ण झाल्या असून, ईश्वरी योजनेप्रमाणे भगवान् सद्गुरु निंबरगीकरमहाराज यांचा त्यांना कृपानुग्रह लाभला होता (तत्रैव, पृ.४).

धन्य अक्का लक्ष्मीबाई । जैसी मीरा मुक्ताबाई ।।
साधन ते खडतर केले । गुरुराय तोषविले ।। (दागा ७४४.१-२).

## (३) रघुनाथप्रिय साधुमहाराज

(श्रीदादा सांगतात) सोनगी गावी श्रीक्षेत्र निंबरगीजवळ (साधुमहाराज) आले असता, श्रीनिंबरगीकरमहाराज यांची गाठ पडल्यावर, खरा देव कोण आहे, हे साधुमहाराजांना उमगले. त्यांनी महाराजांचे पायावर लोळण घेतली. महाराजांचा त्यांना वरदहस्त प्राप्त होऊन अनुग्रह झाला. त्यांनी अखंड साधना केली. मूर्तिमंत साक्षात्कार आणि साधना म्हणजे साधुमहाराज असेच ते एक समीकरण आहे (निपा, पृ. ९५).

धन्य साधुराज साधियेले काज । नामे देवराज जोडियेला ।। (दागा ७६७.५) (इतकेच नव्हे तर) साधुमहाराज देव होऊनिया ठेले (दागा ७६५.३)



**टीपा**

१. नारायण म्हणजे निंबरगीकरमहाराज.

२. आणखी पहा :- (निंबरगीकर महाराजांनी -) धन्य साधुराज दासा उद्धरिले ।। (दागा ७४९.२); पिढीसी परमार्थ दिला रामराया ।। (दागा ७४९.३); गुरु रामराये प्रसाद पादुका । दिधल्यासे देखा हनुमत् शिष्या ।। (दागा ७४९.३).

३) चिमड संप्रदायाची परंपरा श्रीदादांचे पर्यंत अशी :- सोमेश्वर, रेवणसिद्ध, मरुळसिद्ध, काडसिद्ध, निंबरगीकरमहाराज, रघुनाथप्रियसाधुमहाराज, चिमडमहाराज, कोटणीसमहाराज, श्रीदादा. या संप्रदायातले अन्य महत्त्वाचे संत असे :- निंबरगीकरमहाराजांचे नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज, चिमडमहाराजांचे चिरंजीव नारायणमहाराज, नारायणमहाराजांचे शिष्य श्रीमामा, कोटणीसमहाराजांचे चिरंजीव रघुनाथ. लक्ष्मीबाई अक्का या निंबरगीकरमहाराजांच्या शिष्या. या सर्वांचा उल्लेख श्रीदादांच्या पुढील पद्यात आहे :-

रेवणसिद्ध मरुळसिद्ध काडसिद्ध प्रभु शिवसदया ।
गुरुलिंगजंगम अका माऊली साधुराज रघुनाथप्रिया ।।१ ।।
रामचंद्र प्रभु हनुमंत सद्गुरु नागाप्पा ते नारायण या ।
रघुनाथ गोविंद गुरुजनाते कीर्तनकाळी मनी नमूया ।। (दा.गा. पृष्ठ १)

४. म्हणजेच रामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर.

५. आणखी पहा :- श्रीरामचंद्रावजीमहाराज यांचेकडून आपली परमार्थ परंपरा आपल्या हयातीत सुरु केली. (संसना, मनोगत, पृष्ठ दहा).

६. चिमडला ज्या विहिरीत साधुमहाराजांचे देवालय आहे, त्या विहिरीला चिमड महाराजांनी ''तापनाशीतीर्थ'' असे नाव दिले.

७. आराधनेच्या वेळी प्रारंभी जे तुकाराम महाराजांचे ''निजधामाचे'' अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत ते म्हटले जातात.

८) (एकंदरीत :-) धन्य धन्य धन्य हनुमंत सद्गुरु । तेणे हा विस्तारू बोध केला ।। रामचंद्र माऊली परमची गुरु । स्थापियेला भारू निजधर्म ।। चिन्मयाचा धर्म देवाजीचे नाम । सकळा सुगम धर्मपाठ ।। रघुनाथप्रिय साधू भगवान । तेणे दिली खूण रामचंद्रा ।। गुरुलिंग जंगम रघुनाथप्रिया । बोधिती सदया निज धर्म ।। काडसिद्ध बोळले गुरुलिंगजंगमा । दाविले ते वर्मा पूर्ण कृपे ।। मरुळसिद्धांनी काडसिद्धा बोधिले । मरुळसिद्धा दाविले रेणाईने ।। शिवापासोनिया आली परंपरा । केलेसे विस्तारा हनुमंते ।। धन्य रघुनाथ धन्य ते गोविंद। कीर्तनी आनंद स्वधर्माचा ।। गुरुलिंगजंगमे लावियले रोप । दाविले स्वरूप सत्य सत्य ।। ऐकोनी पडसाद लिहिली अक्षरे । दासराम सत्वरे शरण झाला ।। (दागा १४५५.१-११).

B B B

E/Atmcrita maste setting 1 (43)

## परिशिष्ट ५

# चिमड संप्रदायातील श्रेष्ठ संतांचा गौरव

(श्रीदादा हे चिमड संप्रदायातले. या चिमड संप्रदायात अनेक महान् श्रेष्ठ संत झाले. साहजिकच त्यांचा गौरव श्रीदादांनी लेखनात केला यात नवल नाही. श्रीदादांचे हे गौरवोद्गार पुढे दिले आहेत.)

### (१) निंबरगीकरमहाराज

(निंबरगीकरमहाराजांना श्रीदादांचे विषयी फार प्रेम होते. तर निंबरगीकरमहाराज हे श्रीदादांना ''सगुणब्रह्म'' वाटत. निंबरगीकरमहाराजांचे चरित्र श्रीदादांनी सिद्धकथामृतसार या ग्रंथात ओवीबद्ध केले आहे. निंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांना गुरुलिंगगीता श्रुत केली. त्यांचे विषयी श्रीदादा लिहितात :-)

श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी शालिवाहन शके १७११ त, नीलवाणी[१] जातीत, मिसलकर यांचे घराण्यात, मातुलगृही, सोलापूर येथे चैत्र शुद्ध पौर्णिमेस, श्रीहनुमान जयंतीस, पंचपंच उषःकाली, अवतार घेतला. भागवत धर्माचे कळस (असे) श्रीतुकाराममहाराज पुनरपि जगाच्या कल्याणासाठी या (निंबरगीकर महाराजांचे) रूपाने अवतीर्ण झाले (संसना, मनोगत, पृष्ठ नऊ).

वयाची पहिली ३१ वर्षे प्रपंचात घालविल्यावर, परमार्थाचे रहस्य जाणून घेण्यासाठी त्यांनी पुढील ३६ वर्षे अहर्निश नामसाधनात घालविली (संसना, मनोगत, पृष्ठ नऊ).

निंबरगीसी रानी एकांती साधन । करिती आपण धन्य धन्य ॥
मेंढरे शेतात चरायाच्या मिषे । लटकले पिसे हरिनामी ॥
(दागा १२६५.२-३).

साधनसिद्धता झाल्यावर, त्यांचे सद्गुरु श्रीकाडसिद्ध यांचे आज्ञेने त्यांनी शेवटची २८ वर्षे परमार्थ काय आहे हे जगाला दाखवून दिले
(संसना, मनोगत, पृष्ठ नऊ-दहा).

(निंबरगीकरमहाराजांचे रघुनाथप्रियसाधुमहाराज हे पट्टशिष्य होते)

आपल्या (साधुमहाराज या) शिष्यास देव करून (चिमडगावी)



बसवणारा हा महात्मा, हे जगातील एकमेव एक उदाहरण आहे असे म्हटले तर मुळीच अतिशयोक्ती होणार नाही असे मला वाटते (निपा, पृ. ९५).

(साधुमहाराज यांच्या आराधनेची पद्धत चिमडमहाराजांना सांगून, त्यांनी साधु महाराजांचा रथोत्सव सुरू केला)

भगवान् श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी तर आपले हयातीत श्रीक्षेत्र चिमड येथे श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराज यांचा रथोत्सव सुरू केला आहे (निपा, पृ. ९५). (तसेच) साधुमहाराज यांचे पुण्यतिथीस आराधनेची पद्धती आणि रथोत्सवाची आखणी ज्या महात्म्याने केली, असे न भूतो न भविष्यति (असे) एकमेव उदाहरण म्हणजेच भगवान् श्रीसद्गुरु श्रीनारायणराव भाऊसाहेब ऊर्फ श्रीगुरुलिंगजंगम स्वामी निंबरगीकर हे होत. ते एक चालते बोलते ब्रह्म होते (संसना, मनोगत, पृष्ठ अकरा). (असे हे) भगवन्नारायण गुरुलिंग जंगम । सद्गुरु परम सिद्धराज । (दागा १२६५.१) (होते).

(नागाप्पाण्णामहाराज यांचे वचनानुसार)

भगवान् सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी मला [२]कानडीचा गंध नसताना श्रुतिरूपाने बोध केला (नीभाच, आशिर्वाद, पृ. ३).

(श्रीनिंबरगीकरमहाराजांचे कार्य श्रीदादा असे नोंदतात :-)

''धर्म स्थापनेचे तर । ते ईश्वराचे अवतार'' या श्रीसमर्थोक्तीप्रमाणे ते (निंबरगीकरमहाराज) महान् अवतारी पुरुष असल्याने, त्यांनी दिलेली आध्यात्मिक शिकवण ही लाखमोलाची ठरली. ''स्वरूपानुसंधानात उभे आयुष्य व्यतीत करणेसारखा या जगात दुसरा धर्म नाही, आत्मस्वरूप सर्वत्र पहाणेसारखी दुसरी भक्ति नाही[१], नामरूपाचा लाभ घडवून देणाऱ्या पंथासारखा दुसरा पंथ नाही'', ही अनुभूती काडसिद्धांचे परम कृपेने संपादन करून त्यांनी अहर्निश साधना करून जगाचे परम कल्याण केले (संसना, मनोगत,पृष्ठ दहा).

(निंबरगीकरमहाराजांची योग्यता श्रीदादा अशी सांगतात :-)

''ते चालते बोलते ज्ञानाचे बिंब । तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ । येर ते माणूसपण भाव । लौकिक भाग'' अशी त्यांची (=निंबरगीकरमहाराजांची)

E/Atmcrita maste setting 1 (44)

# संदर्भ-ग्रंथ-सूची


- अमृतवाणी, प्र.रा.गो. केळकर, सांगली, १९८१
- आत्मबोधप्रत्ययामृत, (परमार्थसार व अन्य ग्रंथ, सं.आपटे) सांगली, प्रथम आवृत्ति, २००२
- आरती संग्रह, सं. के. वा. आपटे, सांगली, आवृत्ती पहिली, २००२
- गोविंदचरितमानस, न. दा. दिवेकर, सांगली, आवृत्ती पहिली
- गोविंददर्शन, दासराम, सांगली, १९८८
- चांगदेव पासष्टी आणि इतर ग्रंथ, सं. के. वा. आपटे, सांगली, प्रथम आवृत्ती, २००२
- चांगदेव पासष्टी - एक नामकळा, प्र. न. ना. गोखले, सांगली, १९९९
- चिन्मय नित्यपाठ, आवृत्ती चौथी, सांगली, २००८
- चिमडमहाराज, के. वा. आपटे, पुणे, पुनर्मुद्रण, १९९९
- तात्यासाहेबमहाराज कोटणीस, दासराम, पुणे, प्रथमावृत्ती, १९८३
- तुकाराममहाराज नित्यपाठ, दासराम, सांगली, १९८९
- तुकाराममहाराज नित्यपाठ, दासराम, कन्नूर, २००३
- दासराम गाथा, प्र. श्यामला पटवर्धन, सांगली, १९८८
- दासराममहाराज चरितामृत, के.वा.आपटे,सांगली प्रथम आवृत्ति,२००३
- दीपलक्ष्मी (मासिक), मामामहाराज केळकर विशेषांक, प्र.रायकर, मुंबई,१९७१
- नमन स्तोत्र, दासराम, सांगली, प्रथम आवृत्ति, १९७२
- नागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर, दासराम, सांगली (प्रकाशन वर्ष दिले नाही)
- नित्यपाठामृत, दासराम, सांगली, १९८७
- नीलकंठ भारती चरित्र, श्याम पवार, आंबवडे (विठ्ठलवाडी), प्रथमावृत्ति, १९८८
- पद्यावली, प्र. रा.गो.केळकर, सांगली, १९७३
- परमार्थसार आणि अन्य ग्रंथ, सं.के.वा.आपटे,सांगली, पहिली आवृत्ती,२००२




**(४) चिमड महाराज**

(चिमडमहाराजांचे गुरु साधुमहाराज आणि साधुमहाराजांचे गुरु निंबरगीकरमहाराज . श्रीदादा सांगतात :-)

श्रीनिंबरगीकरमहाराज व श्रीसाधुमहाराज हे दोन आहेत असे चिमडचे श्रीरामचंद्रावजी यांना कधी वाटलेच नाही. (चिम, गगनं गगनाकारं, पृष्ठ नाही). श्रीनिंबरगीकरमहाराज यांची शिकवण आचरणात आणून, तेच ज्ञान, तीच भक्ति, तोच धर्म, तोच पंथ, यथायोग्य रीतीने श्रीचिमडचे श्रीरामचंद्रावजी महाराज यांनी, चिमडची वेस न ओलांडता, चिमड येथेच राहून, मोठ्या गुप्तपणाने राखला. ''हा एकनाथ म्हणून गुरूला किती भीत आहे पहा'' या शब्दांत खुद्द श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी चिमडमहाराज यांचा मोठा गौरव केला आहे. (संसना, मनोगत, पृष्ठ बारा).

**(५) श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर**

(हे चिमडमहाराजांचे चिरंजीव ते चिमड मठाधिपति होते. त्यांचे चरित्रही श्रीदादांनी लिहिले. चिमड मठात झालेल्या श्रीदादांचे कीर्तनाचे कौतुक त्यांनी केले. दादा म्हणतात.)

धन्य नागाप्पाण्णा नारायणराव । कवतुक अपूर्व केले त्यांनी ।। (दागा ६६७.७)

**(६) डॉ.विष्णुपंत आपटे**

(हे चिमडमहाराजांचे शिष्य. ते कोल्हापूरला डॉक्टर होते. त्यांचे चरित्र प्रा. विजापूरकर यांनी लिहिले आहे)

श्री विष्णुपंत आपटे हे देव डॉक्टर श्रीचिमडमहाराज यांचे शिष्य झाले. त्यांनी साधनात फारच काळ व्यतीत केला. त्यांना चैतन्याची नाणी आणि शाश्वत, चिरंतन टिकणारी संपत्ति चिमडचे महाराजांनी दाखविली (निपा, पृ. १५३).

**(७) मामामहाराज केळकर आणि र. ह. कोटणीसमहाराज**

(या दोघांचेबद्दल श्रीदादा लिहितात :-) श्रीहनुमंत[७] रघुनाथ[८] कृपेने । धन्य गोविंद[९] आशीर्वादे ।। करितो जागर हरिकीर्तन ।। (सिकसा,७०.८-९);

E/Atmcrita maste setting 1 (45)

धन्य रघुनाथ[८] पिताजी गोविंद ।। भोगिती जे स्वरूपानंद ।। (सिकसा, ७.२८; ८.२०); धन्य हरिभक्त रघुनाथ[८] गोविंद[९] । भोगिती जे स्वरूपानंद ।। (आबोप्र, ५९).

(श्रीदादा सांगतात :-) श्रीतात्यासाहेबमहाराज[७], श्रीदादासाहेबमहाराज[८] आणि श्रीमामा[९] हे मला तरी कधी निराळे असे दिसलेच नाहीत. (संपा, पृ. ४२).

**टीपा**

१. नीलवाणी ही लिंगायत समाजातील एक उपजात आहे.
२. आणखी पहा :- गुहेमाजी नारायणे । दिली अंतरीची वचने।। काय अभंगी प्रसाद । केला कानड्याने बोध ।।
३. जसे :- रघुनाथप्रियसाधुमहाराज, लक्ष्मीबाई अक्का, चिमडमहाराज, श्रीदादा, इ.
४. मूळपीठ म्हणजे निंबरगी हे पीठ
५. म्हणजे काडसिद्ध.
६. चिमड मठात श्रीदादांचे कीर्तन झाल्यावर नागाप्पाण्णामहाराजांनी त्यांचे कौतुक केले आणि त्यांना प्रल्हाद म्हणून हाक मारली.
७. तात्यासाहेबमहाराज कोटणीस
८. रघुनाथ हणमंत उर्फ दादासाहेबमहाराज कोटणीस
९. गोविंद अनंत उर्फ मामामहाराज केळकर.

B B B



**परिशिष्ट ६**

## श्रीदादांची तेरा संस्मरणीय वचने

१) देहासाठी प्रपंच, आत्म्यासाठी परमार्थ.

२) प्रपंच व परमार्थ या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

३) सध्याची सुखाची साधने ही दुःखाकडे नेणारी आहेत.

४) अशांतता ब्रह्मदेवाला सुद्धा असते.

५) शाश्वत सुखाकरता जीव अंतर्मुख झाल्यास, त्याला मनःशांति निश्चित लाभेल.

६) भैतिक साधनांनी मनःशांति प्राप्त होणार नाही.

७) मन निर्विषय होणे हाच ब्रह्मानंद आहे.

८) साक्षात्कारामुळे जीवन व जीवन हाच साक्षात्कार.

९) चैतन्याचा स्रोत एकसारखा वाहात राहिला की प्रसन्नता निर्माण होते.

१०) चैतन्याशी जवळीक गुरुकृपेने साधता येते.

११) एका नामाने सारे काही होते.

१२) परमेश्वर हा प्रेमस्वरूप आहे.

१३) विशुद्ध आणि निर्हेतुक प्रेम म्हणजेच ईश्वराचे स्वरूप.

B B B

E/Atmcrita maste setting 1 (46)

## – श्रीनिंबरगीकरमहाराजांची आरती –

आरती नारायणा । धन्य जगज्जीवना । सगुण ब्रह्ममूर्ती । काय तपोनिधाना ।। ध्रु ।।

सद्‌गुरू काडसिद्ध । तुकाराम अवतार । साधन संप्रदाय । वाढविला बडिवार ।।१ ।।

गुरुलिंगजंगम नावे । जगप्रसिद्ध जाहला । दासराम शरण येता । अंतरीये बोध केला ।।२ ।।

## – श्रीतात्यासाहेबमहाराजांची आरती –

सद्‌गुरु भक्तीचा डंका गाजवुनी । कीर्तनी डोलविला गुरू राम ज्यानी ।।

संसारी दाविला सदाचार करुनी । गुरुरूपी तन्मय जहाले काया संहरुनी ।। १ ।।

जयदेव जयदेव जय गुरु हनुमंता । तारी जडजीवा या श्रीलक्ष्मीकांता ।। ध्रु ।।

राम लीन झाला धन्य तुझे चरणी । ओवाळी आरती तन मन वाहुनी ।।

माय बाप तुम्ही असता कैची दीन वाणी । उरेल माझेपाशी सांगा देव धणी ।।२ ।।

## – श्रीमामामहाराजांची आरती –

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा । सच्चिदानंद–कंदा । गुरुलिंग साधुबोधा ।। ध्रु ।।

हनुमंत–सद्‌गुरु–आज्ञे । केले अखंड कीर्तन । सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।१ ।।

ब्रह्मचैतन्यादि संत । भाऊराव समर्थ । रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।२ ।।

श्रीराम जयराम जयजयराम । तेरा अक्षरे परम । संदेश निर्वाणीचा । पायी लोळे दासराम ।।३ ।।

B B B




- पांडुरंग विजय, श्रीसमर्थ, न. दा. दिवेकर, सांगली, १९६६
- महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का, के.वा.आपटे, पुणे, पुर्नमुद्रण, १९९२
- रामदासबोध, दासराम, सांगली, १९९७
- रामपाठ, सं. के.वा.आपटे, मुंबई, आवृत्ती दुसरी, १९६३
- रामपाठामृत, दासराम, सांगली, १९८४
- लेजर - दासराम संगृहीत लेजर बुके
- वही - दासराम लिखीत वहीसमूह
- संजीवनपाठ, दासराम, सांगली, प्रथमावृत्ती, १९८७
- संतसहस्रनाम, सांगली, १९८५
- साधुचरितामृत कथासार (परमार्थ आणि अन्य ग्रंथ, सं.के.वा.आपटे) सांगली, प्रथमावृत्ती, २००२)
- साप्ताहीक तुतारी, प.पू.दासराम केळकरमहाराज विशेषांक, सांगली, १९८७
- सांगली माहात्म्य, दासराम, सांगली, १९८८
- सिद्धकथामृतसार, (परमार्थसार आणि अन्य ग्रंथ, सं. के.वा.आपटे) सांगली, प्रथमावृत्ती, २००२
- सिद्धगिरी संदेश (त्रैमासिक) सप्टेंबर आणि डिसेंबर, १९७२
- सिद्धस्तुती, दासराम, सांगली, १९७७
- ज्ञानदेव तेहत्तिशी, दासरामकृत सानंद टीका, सांगली, १९५२
- ज्ञानदेव मुद्राप्रकाश, दासराम, मुंबई, आवृत्ती पहिली, १९६८
- ज्ञानेश्वर स्तोत्र, दासराम, सांगली, १९७५
- ज्ञानेश्वरी चिंतन स्तोत्र, प्र.किसन भिडे, सांगली, १९७४


B B B

E/Atmcrita maste setting 1 (47)

# संक्षेप

- अवा — अमृतवाणी
- आबोप्र — आत्मबोधप्रत्ययामृत
- आसं — आरती संग्रह
- गोचमा — गोविंदचरितमानस
- गोद — गोविंददर्शन
- चांपा — चांगदेव पासष्टी आणि इतर ग्रंथ
- चांपाएना — चांगदेवपासष्टी, एक नाम कळा
- चिनि — चिन्मय नित्यपाठ
- चिम — चिमडमहाराज
- तात्या — तात्यासाहेबमहाराज कोटणीस
- तुनिपा — तुकाराममहाराज नित्यपाठ, दासराम, सांगली, १९८९
- तुनिपा — तुकाराममहाराज नित्यपाठ, दासराम, कन्नूर, २००३
- दागा — दासरामगाथा
- दामच — दासराममहाराज चरितामृत
- दील — दीपलक्ष्मी (मासिक) मामामहाराज केळकर विशेषांक,
- नस्तो — नमनस्तोत्र
- नामनिं — नागाप्पाण्णा महाराज निंबरगीकर
- निपा — नित्यपाठामृत
- नीभाच — नीलकंठ भारती चरित्र
- पद्यावली
- पसाअ — परमार्थसार आणि अन्य ग्रंथ
- पांवि — पांडुरंग विजय
- मलअ — महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का
- रादाबो — रामदासबोध
- रापा — रामपाठ (सं.आपटे), मुंबई, आवृत्ति दुसरी, १९६३



- रापात — रामपाठामृत
- लेजर — दासराम संगृहीत लेजर बुके
- वही — दासराम लिखित वही समूह
- संपा — संजीवनपाठ
- संसना — संतसहस्रनाम
- साचक — साधुचरितामृत कथासार
- सातु — साप्ताहीक तुतारी, प.पू.दासराम केळकरमहाराज विशेषांक
- सांमा — सांगली माहात्म्य
- सिकसा — सिद्धकथामृतसार
- सिसं — सिद्धगिरी संदेश(त्रैमासिक),सप्टेंबर व डिसेंबर,१९७२
- सिस्तु — सिद्धस्तुती
- ज्ञाचिंस्तो — ज्ञानेश्वरी चिंतन स्तोत्र
- ज्ञाते — ज्ञानदेव तेहत्तिशी
- ज्ञामुप्र — ज्ञानदेवमुद्राप्रकाश
- ज्ञास्तो — ज्ञानेश्वर स्तोत्र

B B B

E/Atmcrita maste setting 1 (48)